CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, २ जून २०२६ | वर्ष ४ थे अंक ८५ | पाने १२ | किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



विचार बोलणाऱ्याच्या दृष्टीपुढे संपूर्ण विचार असला तरी देशकाल परिस्थितीनुसार आवश्यक तेवढेच प्रकट करावे. आपली शक्ती वाढते तसतसे विचारांचे अधिक पैलू प्रकट होतात.

**- स्व. दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# महायुती-आघाडीत थेट लढत

## विधान परिषद निवडणूक: उमेदवारी अर्ज दाखल

◆ **मुंबई, १ जून**

राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होणारी निवडणूक आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला उमेदवारांचा हायव्होल्टेज ड्रामा अखेर संपला असून, महायुती आणि महाविकास आघाडी (मविआ) या दोन्ही प्रमुख आघाड्यांनी आपल्या उमेदवारांची अधिकृत घोषणा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर जाण्यासाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे.

गेल्या अडीच वर्षांपासून रिक्त असलेल्या १७ जागांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, नाशिक आणि अमरावती अशा महत्त्वपूर्ण ठिकाणच्या मतदारसंघांत ही लढत होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्याने आता चित्र स्पष्ट झाले आहे.

**पक्षांची रणनीती :**

**महायुती** : या निवडणुकीत भाजपाने ११, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) २ जागांवर आपले नशीब आजमावणार आहेत.

**महाविकास आघाडी** : काँग्रेस ९, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ३ जागांवर मैदानात उतरली आहे.

**काही जागांवर संघर्षाची ठिणगी**

पुणे आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन्ही आघाड्यांना अंतर्गत वादाचा सामना करावा लागला आहे. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उमेदवारीवरून बंडाळी पाहायला मिळाली, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीतच अधिकृत उमेदवार आणि बंडखोर यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे.



**विदर्भात पाच जागांसाठी २६ उमेदवारी अर्ज**

नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीसाठी सोमवार, १ जून रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत पाच उमेदवारांनी सहा नामनिर्देशनपत्रे दाखल केली. राजीव पोतदार (भारतीय जनता पक्ष), राजेश जंगले (अपक्ष), सुरेंद्र लोही (अपक्ष), दिनेश ढोले (इंडियन नॅशनल काँग्रेस), अतुल लोंढे (इंडियन नॅशनल काँग्रेस) या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत. भारतीय जनता पक्षाकडून डॉ. राजीव पोतदार यांनी दोन नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत.

नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीसाठी २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. छाननी मंगळवार, २ जून रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख गुरुवार, ४ जून आहे. या पोटनिवडणुकीसाठी गुरुवार, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मतमोजणी सोमवार २२ जून रोजी होईल. भंडारा-गोंदिया जागेसाठी सात अर्ज आले आहेत. यामध्ये काँग्रेस, भाजपसह पाच अपक्षांचा समावेश आहे. यवतमाळ जागेसाठी भाजपाच्या बंडखोर उमेदवाराने अर्ज सादर केला आहे. याशिवाय शिवसेना, काँग्रेस आणि दोन अपक्ष, असे पाच अर्ज आले आहेत. अमरावती मतदारसंघासाठीही पाच उमेदवारी अर्ज आले आहेत. यामध्ये भाजप, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि दोन अपक्षांचा समावेश आहे. चंद्रपूर-वर्धा-गडचिरोलीसाठी तीन अर्ज आले आहेत. यामध्ये भाजप, काँग्रेस आणि एका अपक्षाचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

## परिषदेसाठी महायुती-आघाडीचे उमेदवार

◆ **मुंबई, १ जून**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या १७ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी सर्वच राजकीय पक्षांसह काही अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले. महायुती आणि महाविकास आघाडीचे मोहरे मैदानात उतरले आहे. अनेक ठिकाणी अपक्ष आणि बंडखोरांनी अर्ज भरल्यामुळे निवडणुकीतील चुरस वाढली आहे. असे असले तरी मुख्य लढत महायुती विरुद्ध मविआ अशीच होणार आहे. सोमवारी १७ मतदारसंघांतील लढतींचे चित्र जवळजवळ स्पष्ट झाले आहे. सत्ताधारी महायुतीत भाजपा सर्वाधिक ११ जागांवर लढत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना चार जागांवर तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस दोन जागांवर निवडणूक लढवत आहे. तसेच महाविकास आघाडीत काँग्रेसने आठ जागांवर आपले उमेदवार दिले आहेत. शिवसेना (उबाठा) सहा जागांवर, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन उमेदवार रिंगणात आहे. (वृत्तसंस्था)

### महायुती

**भाजपा**
१. वर्धा : अरुण लखानी
२. भंडारा-गोंदिया : अविनाश ब्राम्हणकर
३. अमरावतीः प्रवीण पोटे पाटील
४. सांगली-साताराः धैर्यशील कदम
५. सोलापूरः राजेंद्र राऊत
६. अहिल्यानगर : प्राजक्त तनपुरे
७. छ. संभाजीनगर : सुहास शिरसाट
८. नांदेडः अमर राजूरकर
९. धाराशीव : बसवराज पाटील
१०. जळगावः नंदकिशोर पाटील
११. नागपूरः डॉ. राजीव पोतदार

**शिवसेना**
१. ठाणेः रवींद्र फाटक
२. नाशिकः नरेंद्र दराडे
३. परभणी-हिंगोलीः सईद खान
४. यवतमाळ- दुष्यंन्त चतुर्वेदी
५. छ. संभाजीनगर : समीर सत्तार

**राष्ट्रवादी काँग्रेस**
१, रायगड- अनिकेत तटकरे
२. पुणे- विक्रम काकडे

### महाविकास आघाडी

**काँग्रेस**
१. वर्धा : शैलेष देशमुख
२. अमरावतीः हर्षदीप देशमुख
३. यवतमाळ : साहेबराव कांबळे
४. नागपूरः अतुल लोंढे
५. भंडारा-गोंदियाः
६. लातूर : महेश देशमुख
७. सोलापूरः आदित्य फत्तेपूरकर


**शिवसेना(उबाठा)**
१. नाशिकः उमेदवार नाही
२. परभणी : डॉ. विवेक नावंदर
३. छत्रपती संभाजीनगर-जालनाः देवयानी कृष्ण पाटील डोणगावकर
४. जळगावः शरद तायडे
५. रायगड : सुरेंद्रनाथ माने

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)**
१. सांगली-साताराः
२. पुणेः श्रीकांत पाटील
३. ठाणे : अभिजित पवार

# मदरशात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीशी मौलानाने केले अश्लील चाळे

**'नई जिंदगी' येथील घटना**

**'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जून-**

मदरशामध्ये अरबी शिक्षण घेणाऱ्या एका १० वर्षीय अल्पवयीन मुलीबरोबर अश्लील चाळे केल्याची घटना सोलापूर शहरातील मुस्लिम बहुल भाग असलेल्या नई जिंदगी येथील एका मदरशामध्ये घडली. या प्रकारामुळे सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मोहम्मद उमर मोहम्मद हुस्सेन रझवी (वय-५३, रा. नई जिंदगी, सोलापूर. मूळ रा. जि. बहराईच, रा.उत्तर प्रदेश) असे त्या मौलानाचे नाव आहे. त्याच्या विरोधात एम आयडीसी पोलिस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली.

यातील पिडीत मुलगी नई जिंदगीतील एका अरबी मदरसा येथे धार्मिक शिक्षण घेण्यासाठी जात होती. यातील आरोपी मौलाना मोहम्मद उमर हा इतर मुलांना लवकर सोडून पीडित मुलीला एकटीलाच मदरशामध्ये थांबवून ठेवत तिच्याशी अश्लील चाळे करत होता.

याबाबत पीडित मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली आहे. आरोपी मौलवीने तिथे शिक्षणासाठी येणाऱ्या इतर मुलींनाही अशाच प्रकारे चुकीच्या पध्दतीने स्पर्श केल्याचे सांगण्यात येते. सहाय्यक पोलिस निरीक्षक राधिका केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरणीचे सत्र कायम

**मुंबई** : पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि आगामी रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, भारतीय शेअर बाजारात सोमवारी सलग चौथ्या सत्रात घसरण पाहायला मिळाली. अत्यंत चढ-उतारांच्या वातावरणात दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी कमावलेली सुरुवातीची तेजी गमावली आणि घसरणीसह बाजार बंद झाला. सोमवारी सकाळच्या सत्रात बाजाराने सकारात्मक सुरुवात केली होती मात्र, हा उत्साह फार काळ टिकला नाही. दुपारनंतर विक्रीचा दबाव मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे निफ्टीने २३,३५७.९५ या सत्रातील नीचांकी पातळीला स्पर्श केला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ५०८.४० अंकांच्या म्हणजेच ०.६८ टक्क्यांच्या घसरणीसह ७४,२६७.३४ वर स्थिरावला तर, निफ्टी १६५.१५ अंकांनी म्हणजेच ०.७० टक्क्यांनी घसरून २३,३८२.६० वर बंद झाला. बाजारात सोमवारी एकूण १५०५ समभागांमध्ये वाढ नोंदवली गेली.

# जेईई ॲडव्हान्स निकालात मुलींमध्ये पुण्याची आरोही अव्वल

## कोटाचा शुभम कुमार देशात टॉपर





◆ **पुणे, १ जून**

जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शुभम कुमार याने प्रथम स्थान पटकावले असून तो अखिल भारतीय रँकमध्ये पहिला आला आहे. तर, मुलींमध्ये आरोही देशपांडे हिने स्थान पटकावले आहे. हा निकाल अधिकृत वेबसाईटवर जाहीर करण्यात आला.

आयआयटी दिल्ली झोनच्या शुभम कुमारने जेईई ॲडव्हान्स २०२६ परीक्षेत अव्वल स्थान मिळवत अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक (ऑल इंडिया रँक १) पटकावला आहे. त्याने ३६० पैकी ३३० गुण (सीआरएल १) मिळवून ही कामगिरी केली आहे. जेईई ॲडव्हान्स परीक्षेत एकूण ५६ हजार ८८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले, त्यापैकी १० हजार १०७ मुली आहेत. या मुलींमध्ये, दिल्ली विभागातील विद्यार्थिनी आरोही देशपांडे हिने राष्ट्रीय परीक्षेत अव्वल स्थान पटकावले. तिने ३६० पैकी २८० गुण (सीआरएल ७७) मिळवून ही कामगिरी केली.

यावर्षी जेईई ॲडव्हान्ससाठी एकूण १ लाख ८७ हजार ३८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १ लाख ७९ हजार ६९४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि ५६ हजार ८८० विद्यार्थी पात्र ठरले. यापैकी ४६ हजार ७७३ विद्यार्थी तर १० हजार १०७ विद्यार्थिनी आहेत. जेईई ॲडव्हान्स आणि अंतिम उत्तरपत्रिका अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. तुम्ही थेट साइटला भेट देऊन स्कोअरकार्ड आणि अंतिम उत्तरपत्रिका डाऊनलोड करू शकतात.

पुण्याची रहिवासी असणाऱ्या आरोहीने ऑल इंडिया ७७ वी रँक मिळवण्यासाठी अभ्यासाचे उत्तम नियोजन केले होते. तिने दिल्ली झोनमधून जेईई ॲडव्हान्स परीक्षा दिली होती. तिला ३६० पैकी २८० गुण मिळाले आहेत. तिने जेईई मेन परीक्षेतही उत्तम यश संपादन केले होते, त्यादरम्यान तिची ऑल इंडिया रँक ९९ वी होती. आरोहीने आपल्या अभ्यासाच्या नियोजनाबबत सांगितले की, ती सुट्यांच्या दिवशी आणि रविवारी अतिरिक्त वेळ काढून आपला अभ्यासक्रम पूर्ण करीत असे. ज्या प्रकरणांचा अभ्यास करायचा राहून जायचा, त्यांच्यासाठी वेळ निश्चित करायची. नियमित उजळणीसोबत सातत्याने नोट्स तयार करण्यामुळे उजळणी करताना एकाच विषयाचे सातत्याने वाचन व्हायचे. त्यामुळे विषय लक्षात राहणे सोपे जायचे. कलर कोडींग तंत्राचा वापर करून केमिस्ट्रीच्या नोट्स तयार केल्या होत्या, असे ती सांगते.

मद्रास विभागात पात्र उमेदवारांची संख्या सर्वाधिक १४,१९४ होती. त्यानंतर १२,३८९ पात्र उमेदवारांसह मुंबई आणि १०,६९७ पात्र उमेदवारांसह दिल्लीचा क्रमांक लागतो. (तभा वृत्तसेवा)

**समाजमाध्यमांसह नकारात्मक बातम्यांपासून राहिलो दूर : शुभम**
(वृत्त पान २ वर)

### उत्तरप्रदेशात अतिरेक्याला अटक; एटीएसची कारवाई

**लखनौ** : पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टी आणि या देशाची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित असलेल्या दहशतवादी जाळ्यासाठी काम केल्याच्या आरोपाखाली उत्तरप्रदेशच्या दहशतवादविरोधी पथकाने आझमगढ येथील एका अतिरेक्याला अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. मोहम्मद शेख असे त्याचे नाव आहे. तो आझमगढ जिल्ह्यातील निजामबाद पोलिस ठाणे हद्दीतील खुदादादपूर गावाचा रहिवासी आहे, असे त्यांनी सांगितले. पाकिस्तानस्थित सूत्रधारांकडून भारतीय तरुणांना कट्टरपंथी बनवण्याचे आणि देशविरोधी कारवायांसाठी त्यांची भरती करण्याचे कथित प्रयत्न सुरू असल्याबाबत मिळालेल्या माहितीच्या आधारे त्याला अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पाकिस्तान-आयएसआय आणि दहशतवादी संघटनांच्या संगनमताने पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीच्या दहशतवादी जाळ्याचा वापर करून, समाज माध्यम मंचाद्वारे भारतीय तरुणांशी संपर्क साधत आहेत.

# पत्नीच्या निधनाची वार्ता ऐकताच पतीनेही सोडला प्राण

**मंद्रुप येथील घटना**



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१ जून-**

वृध्दापकाळाने ८० वर्षीय पत्नीच्या निधनाची वार्ता ऐकताच आजारी असलेल्या ८६ वर्षीय पतीने अंथरुणातच प्राण सोडल्याची घटना सोमवार, दि.१ जून २०२६ रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे घडली. पद्मावती लाड व रामण्णा लाड असे त्या पती-पत्नीचे नाव आहे. या पती-पत्नीचा एकाच दिवशी झालेल्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

लाड कुटुंब मूळचे कर्नाटक राज्यातील जिगजिणीचे रहिवासी. त्या भागातच रामण्णा लाड यांनी शिक्षकाची नोकरी केली. सेवानिवृत्त झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे स्थायिक झाले. लाड गुरुजी या नावाने परिचित होते. येथील हनुमान मंदिरात भजन-कीर्तन करायचे. दत्त मंदिरात पुजारी म्हणून काम पाहत होते. आठवड्यापूर्वी फरशीवरुन पाय घसरुन पडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते.

दरम्यान, त्यांची पत्नी पद्मावती ह्या वृध्दापकाळामुळे आजारी होत्या. प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांना घरी पाठविण्यात आले होते. सोमवारी सकाळी पद्मावती यांचे निधन झाले. त्यामुळे लाड यांच्या घरात पाहुणे व नातेवाईकांची वर्दळ पाहून लाड गुरुजींनी विचारणा केली असता त्यांची पत्नी पद्मावती यांचे निधन झाल्याचे सांगण्यात आले. ही वार्ता ऐकताच त्यांनी अंथरुणात प्राण सोडला. मंद्रुप येथील हिंदु स्मशानभूमी येथे लाड पती-पत्नीच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# भारत-अमेरिका व्यापार करार अंतिम टप्प्यात

## पीयूष गोयल यांची माहिती

### ९९ टक्के मुद्दे सुटले; उर्वरित एक टक्क्यावर आजपासून चर्चा



◆ **नवी दिल्ली, १ जून**

भारत आणि अमेरिका यांनी द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यातील बहुतांश बाबींना अंतिम रूप दिले आहे आणि आता वाटाघाटी केवळ काही किरकोळ मुद्यांवर होणार आहेत, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सोमवारी दिली.

द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याला अंतिम रूप देण्याबाबत चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे पथक येथे आले आहे. या वाटाघाटी मंगळवापासून गुरुवारपर्यंत होणार आहेत, असे गोयल यांनी सांगितले. दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय व्यापार आराखड्याची घोषणा ३ फेब्रुवारी रोजी केली होती.

अंतिम रूप देताना अमेरिकेत झालेले कायदेशीर बदल करारामध्ये कशा प्रकारे प्रतिबिंबित होतील आणि त्यानुसार नेमके कोणते बदल केले जातील, याचा विचार केला जाईल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अमेरिकेसोबतच्या द्विपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा आम्ही लवकरात लवकर पूर्ण करू, त्यावर स्वाक्षऱ्या करू, असा विश्वास आहे. त्यानंतर अधिक सर्वसमावेशक द्विपक्षीय करार कसा असावा, यावर पुढील चर्चा सुरू करू, असे गोयल यांनी येथे पत्रकारांना सांगितले.

### भारत-ओमान कराराची अंमलबजावणी

**भारत आणि ओमान यांच्यातील मुक्त व्यापार कराराची सोमवारी अंमलबजावणी करण्यात आली, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. भारत-ओमान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारामुळे (सीईपी) वस्त्रोद्योग, चामडे, प्लॅस्टिक, सागरी उत्पादने, वाहने, क्रीडा साहित्य आणि कृषी उत्पादने यासारख्या क्षेत्रांतील देशांतर्गत निर्यातदारांना लाभ होईल. कारण, या करारामुळे त्यांना प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत ओमानच्या बाजारपेठेत प्राधान्याने प्रवेश मिळेल, असे गोयल यांनी नमूद केले. या मुक्त व्यापार करारावर १८ डिसेंबर २०२५ रोजी मस्कत येथे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या**



### शेतातील शेततळ्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ जून**

स्वतःच्या शेतातील शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. कर्नाटक राज्यातील उमदी (सोनगी रोड ) येथे आज सोम वारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

रहिमान मुलाणी (वय ३, रा. गुरप्पा म्हेत्रे वस्ती, कुमठा नाका, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. मृत रहिमान हा आज सकाळी उमदी येथील स्वतःच्या शेताला गेला होता. तेथे तो पोहण्यासाठी शेततळ्यात गेला असता पाण्यात पडल्याने त्यातच बुडाला. ही घटना सकाळी नऊ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान नातेवाईकांनी इतरांच्या मदतीने बाहेर काढून बेशुध्दावस्थेत येथील शासकीय रुग्णालायत दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# म्यानमारच्या भूमीचा वापर भारताच्या विरोधात नाही

## हलाईंग यांचे मोदींना आश्वासन

◆ **नवी दिल्ली, १ जून**

म्यानमारच्या भूभागाचा वापर भारताच्या सुरक्षा हितांविरुद्ध केला जाऊ दिला जाणार नाही, असे राष्ट्राध्यक्ष यू मिन आँग हलाईंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोमवारी आश्वस्त केले. व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रांतील द्विपक्षीय संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या सखोल चर्चेदरम्यान त्यांनी हे आश्वासन दिले.

म्यानमारच्या संसदीय निवडणुकीनंतर राष्ट्राध्यक्षपद स्वीकारल्याच्या अवघ्या दोन महिन्यांच्या आतच हा दौरा होत आहे. १ फेब्रुवारी रोजी एका लष्करी उठावाद्वारे आंग सान सू की यांचे लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार उलथवून सत्तेवर आलेल्या लष्करी राजवटीविरुद्ध अनेक वर्षांच्या आंदोलनानंतर डिसेंबर आणि जानेवारीत निवडणुका पार पडल्या.

पंतप्रधानांनी भारत भेटीवर आलेल्या राष्ट्राध्यक्षांकडे हा मुद्दा उपस्थित केला होता आणि ही चर्चा प्रामुख्याने म्यानमारमध्ये सुरू असलेल्या शांतता प्रक्रियेच्या संदर्भात होती, असे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी सांगितले. भारत शाश्वत शांतता सर्वसमावेशकता आणि सबंधित घटकांनी चर्चेच्या टेबलावर एकत्र येण्याच्या गरजेला सातत्याने पाठिंबा देत आला आहे, असे या मुद्यावरील भारताची सातत्यपूर्ण भूमिका स्पष्ट करताना परराष्ट्र सचिवांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# इरई-झरपटच्या संगमाजवळ सापडले सातवाहन-यादव काळातील गाव

**वर्तमानातील गावाचे नाव**

**बोर रिठ**

◆ **चंद्रपूर, १ जून**

इरई आणि झरपट नदीच्या संगमाजवळ पूर क्षेत्राच्या बाहेर चंद्रपूरच्या मूळ वस्तीचे अति प्राचीन असे बोर गाव आढळले आहे. या संगमाजवळ १० हजार वर्षांपूर्वीच्या पाषाण युगीन आदिमानव, २ हजार वर्षांपूर्वीचे सातवाहन, वाकाटक आणि यादव काळातील हे गाव असल्याचा दावा इतिहास अभ्यासक सुरेश चोपणे यांनी केला आहे.

आज हे गाव बोर रिठ म्हणून गावकऱ्यांना माहिती आहे. तिथे १० हजार वर्षांपूर्वीची पाषाण युगीन अवजारे, ३ हजार वर्षांदरम्यानच्या दगडांच्या वस्तू, २ हजार वर्षांदरम्यानची मडके, प्राण्यांची हाडे, दात आणि लोह वितळविणाऱ्या भट्टीचे लोह खडक आढळले आहेत. येथे प्राचीन काळात एक मंदिर होते. त्याचे दोन शिवलिंग आणि मंदिराचे काही अवशेषसुद्धा पडले असून, अलीकडच्या काळात हनुमान मंदिर बांधलेले आहे. शेती असणाऱ्या लोकांना काही वर्षांपूर्वी प्राचीन नाणी आणि अलंकार सापडले होते.



बोर गावातील प्राचीन शिवलिंग

आज तिथे जरी शेती असली, तरी पडलेल्या घरांमुळे तिथे टेकडी तयार झाली असून, अजून उत्खनन केल्यास अनेक पुरावे मिळू शकतात, असाही दावा चोपणे यांनी केला आहे.

झरपट आणि इरई नदी परिसरात ५० हजार वर्षांपासून मानवाची वस्ती होती. पुढे ५ हजार काळापासून येथे आदिवासी वस्ती करून राहायला लागले. तीन हजार वर्षांपूर्वी झरपट नदीजवळ पापामिया टेकडीजवळ हे गाव होते. इरई नदीजवळ आजच्या आरवट गावाजवळील होमिओपॅथी कॉलेजजवळ तसेच पठाणपुरा गेटच्या जवळ केवळ १.२ किलोमीटर अंतरावर आणि संगमापासून १ कि.मी. अंतरावर बोर रिठ आहे.

संगमाजवळसुद्धा एक माना गाव होते. बहुदा लालपेठ, बाबूपेठ या गावांना हिंदू काळात लोकपूर आणि इंदूपूर म्हणत असावे. (तभा वृत्तसेवा)

**गोंड राजे ते भोसले**

**आजच्या चंद्रपूरच्या परिसरात आणि जिल्ह्यात जी प्राचीन गावे होती, त्यावर सातवाहन, वाकाटक आणि यादव राजांचा प्रभाव होता. त्यानंतर इसवी सन १० नंतर वणी, चांदा येथील गावांत राहणाऱ्या राजगोंड समाजाने सत्ता स्थापन केली. त्यानंतर भोसल्यांची सत्ता आली. गोंड कालीन, भोसले आणि ब्रिटिश कालीन इतिहास आज माहिती असला, तरी चंद्रपूरचे मूळ गाव हे बोर रिठ हेच असल्याचे पुरावे सापडल्याचा दावाही चोपणे यांनी केला आहे.**


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नागेंद्रनाथ त्रिपाठी भाजपाचे राष्ट्रीय संघटक

**नवी दिल्ली :** भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी नागेंद्रनाथ त्रिपाठी यांची भाजपाचे राष्ट्रीय संघटक म्हणून नियुक्ती केली आहे. भाजपामध्ये काही वर्षांपूर्वी हे पद तयार करण्यात आले होते. व्ही. सतीश हे भाजपातील पहिले राष्ट्रीय संघटक आहेत. आतापर्यंत बिहार झारखंडचे क्षेत्रीय संघटनमंत्री म्हणून काम करत असलेले त्रिपाठी यांच्याकडे राष्ट्रीय संघटक (वरिष्ठ कार्यकर्ता संपर्क) ही नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांचे केंद्र दिल्ली राहणार आहे. भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री संघटन अरुणसिंह यांनी नागेंद्रनाथ यांच्या नियुक्तीची घोषणा केली. उत्तरप्रदेशच्या संत कबीर नगर जिल्ह्यातील असलेल्या त्रिपाठी यांनी आधी उत्तरप्रदेशातही भाजपा संघटन महामंत्री म्हणून आठ वर्ष काम केले आहे. अ.भा. विद्यार्थी परिषदेतही त्रिपाठी यांनी काम केले. २००३ मध्ये पहिल्यांदा त्यांना उत्तरप्रदेशात संघटन महामंत्री करण्यात आले, २०११ मध्ये बिहारमध्ये त्यांना याच जबाबदारीवर पाठवण्यात आले. २०२१ मध्ये त्यांच्याकडे बिहारसोबत झारखंडचीही संघटन महामंत्री म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. व्ही. सतीश यांच्यानंतर नागेंद्रनाथ त्रिपाठी हे दुसरे राष्ट्रीय संघटक आहेत.




### अनियंत्रित ट्रकने गर्दीला चिरडले; ६ ठार

**कोलंबो :** श्रीलंकेची राजधानी कोलंबोमध्ये एक मोठा अपघात घडला आहे. प्रमुख बौद्ध सण वेसाक दरम्यान कोलंबोच्या बाहेरील भागात एका अनियंत्रित ट्रकने लोकांच्या गर्दीला चिरडल्याने सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर १३ जण गंभीर जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रक चालक नशेत गाडी चालवत होता. त्याने नशेतच उत्सव साजरा करणाऱ्यांच्या गर्दीला चिरडले. हा अपघात रविवारी रात्री कोलंबोच्या मीगोडा परिसरात झाला. जिथे वेसाक उत्सवाचा भाग म्हणून लावलेल्या अन्नदानाच्या स्टॉलसमोर मोठ्या संख्येने लोक रांगेत उभे होते.

### पापाराम नगरात पोलिस पतीची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. १ जून**



अज्ञात कारणातून एका ३९ वर्षीय माजी तलाठ्याने राहत्या घराच्या खिडकीला पाण्याच्या पाईपने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना विजापूर रोडवरील पापा रामनगरात आज सोमवारी सकाळी साडेआठ वाजता उघडकीस आली. कपिलदेव ज्ञानदेव जाधव (वय ३९, रा. पापाराम नगर, माशाळ वस्ती, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या माजी तलाठ्याचे नाव आहे. आज सोमवारी सकाळी त्यांची पत्नी ही मुलीला शाळेला सोडण्यासाठी गेली असता पतीने घरामध्ये पाण्याच्या पाईपने स्वतःला गळफास लावून घेतला. ही घटना पत्नी बाहेरून आल्यावर तिच्या निदर्शनास आली. ही खबर विजापूर नाका पोलिसांना समजताच हवालदार विशाल गायकवाड यांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ११ वाजता दाखल केला.

# परीक्षेला स्थगिती देण्यास नकार

## नीट पेपरफूट प्रकरणाची जुलैमध्ये सुनावणी : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली, १ जून**

२१ जून रोजी होणारी नीट-यूजी परीक्षा संगणक आधारित चाचणी म्हणून घेण्याच्या मागणीवर कोणताही आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नकार दिला आहे. पेपरफुटीशी संबंधित इतर प्रलंबित याचिकांसोबतच या प्रकरणाची सुनावणी जुलैमध्ये होईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### आरोपींना १५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**नीट पेपरफुटी प्रकरणात दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने आरोपी डॉ. मनोज शिरुरे, तेजस हर्षद कुमार शाह आणि मनीषा संजय हवालदार यांना १५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सोमवारी तिन्ही आरोपींची कोठडी संपल्यानंतर सीबीआयने त्यांना न्यायालयात हजर केले. सुनावणीदरम्यान, सीबीआयने तिन्ही आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याची मागणी केली. यानंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींना १५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठवले.**

राष्ट्रीय जनता दलाचे खासदार सुधाकर सिंह यांनी या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. सोमवारी, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि अरविंद कुमार यांच्या न्यायासनाने हे प्रकरण जुलैपर्यंत पुढे ढकलले. त्यामुळे नीट परीक्षेच्या फेरपरीक्षेची याचिका प्रभावीपणे फेटाळली गेली. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, ते केवळ सीबीटी पद्धतीने फेरपरीक्षा घेण्याच्या मागणीवर आग्रही आहेत. तथापि, न्यायमूर्ती नरसिंह यांनी टिप्पणी केली की, न्यायालयाने यापूर्वीही अशाच प्रकारच्या याचिका फेटाळल्या आहेत.

याचिकाकर्त्यांच्या वकिलाने पुनरुच्चार केला की, ते केवळ सीबीटी संबंधित मागणीवरच आग्रह धरत आहेत. यावर न्यायासनाने या प्रकरणावर तात्काळ सुनावणी होणार नाही, असे स्पष्ट केले. न्यायमूर्ती नरसिंह म्हणाले, आम्ही सट्यानंतर याकडे पाहू, असे सांगत त्यांनी सुनावणी तहकूब केली. (वृत्तसंस्था)

### 'एनटीए'ऐवजी नवीन संस्थेचा प्रस्ताव

सोमवारी संसदेच्या शिक्षण, महिला, बाल, युवा आणि क्रीडा व्यवहार स्थायी समितीची बैठक पार पडली. काँग्रेस खासदार दिग्विजय सिंह बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत पेन पेपर विरूद्ध सीबीटी मोड, नीट परीक्षा, एनटीए आदी मुद्यांवर चर्चा झाली. दरम्यान, युनायटेड डॉक्टर्स फ्रंटने आपले मत मांडताना समितीला सांगितले की, नीट संबंधित प्रश्न केवळ परीक्षेच्या पद्धतीपुरते मर्यादित नसून ते जबाबदारी, पारदर्शकता आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थेच्या विश्वासार्हतेची संबंधित आहेत. त्यामुळे सध्याची एनटीए बरखास्त करून नवीन राष्ट्रीय परीक्षा संस्था स्थापन करावी.



आसामचे मुख्यमंत्री हेमंता बिस्व सरमा यांनी सोमवारी नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली

# समाजमाध्यमांसह नकारात्मक बातम्यांपासून राहिलो दूर

## जेईई ॲडव्हान्स टॉपर शुभमने सांगितले यशाचे रहस्य

**कोटा, १ जून**

नकारात्मक बातम्यांसह समाज माध्यमांपासून दूर राहिल्याने गया येथील रहिवासी असलेल्या शुभम कुमारला देशातील सर्वात कठीण प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या संयुक्त प्रवेश परीक्षेत अव्वल स्थान मिळविण्यात मदत झाली.

सोमवारी सकाळी जाहीर झालेल्या निकालानुसार, शुभमने ३६० पैकी ३३० गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे. एका गुणाने मागे राहिलेल्या गुरुग्राम येथील रहिवासी कबीर चिल्लरने ३२९ गुण मिळवून अखिल भारतीय स्तरावर दुसरा क्रमांक पटकावला आहे. या दोघांनीही कोटा येथील ॲलन करीअर इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेतले. शुभमने आपल्या यशाचे श्रेय आपले पालक, कोटा येथील प्राध्यापक आणि आपल्या कठोर परिश्रमाला दिले. मी दोन वर्षांपासून प्रवेश परीक्षेसाठी खूप मेहनत घेत होतो. यामुळे चांगले गुण मिळण्याची अपेक्षा असणे स्वाभाविक होते, असे दोन वर्षांपूर्वी इयत्ता ११वीचा विद्यार्थी म्हणून कोटा येथे आलेला हा तरुण म्हणाला. शुभमचे वडील शिव कुमार बिहारमधील गया येथे हार्डवेअरचे व्यावसायिक आहेत, तर त्याची आई कांचन देवी गृहिणी आहेत.

विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या अनेक घटनांमुळे कोटा शहर नेहमीच चर्चेत राहिले असले तरी, त्याने नकारात्मक बातम्या आणि माध्यमांतील वृत्तांकडे दुर्लक्ष करणे पसंत केले आणि शहराच्या परिसंस्थेवर अवलंबून राहिला, असे शुभमने सांगितले. स्वतःहून समाज माध्यमांवर घातलेली बंदी आणि केवळ आई-वडील व शिक्षकांशी संपर्क साधण्यासाठी फोनचा वापर करणे, हे फायदेशीर ठरले. दिवसातून ८ ते १० तास अभ्यास करायचो आणि केवळ रविवारीच क्रिकेट व बॅडमिंटनसारखे छंद जोपासू शकायचो, असे शुभम म्हणाला. तणावात असताना ५ ते १० मिनिटे ध्यान करायचो. तणावाच्या क्षणी कुटुंबातील सदस्य, चुलत भावंडे आणि मित्र खूप मदत करतात, असे तो म्हणाला. शुभमच्या मते, विशेष अभ्यास साहित्य, अनुभवी प्राध्यापक आणि स्पर्धात्मक विद्यार्थ्यांचा गट केवळ कोटासारख्या शहरातच शक्य आहे, इतर कोणत्याही ठिकाणी नाही.

आपल्यात इच्छाशक्ती असली पाहिजे, काहीतरी करण्याची आंतरिक तळमळ असली पाहिजे; जेणेकरून आपण आपले ध्येय गाठू शकू, असे तो म्हणाला. मी प्रत्येक आव्हानाला प्रेरणेत बदलले. माझे संपूर्ण लक्ष माझ्या ध्येयावर केंद्रित होते. आता, मी आयआयटी मुंबईमधून सीएस शाखेतून बीटेक करणार आहे, असे शुभम म्हणाला. (वृत्तसंस्था)

# आदित्य फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## काँग्रेसकडून विधान परिषद निवडणुकीत आणली रंगत

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१ जून

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपकडे स्पष्ट बहुमत असतानाही महाविकास आघाडीने विशेषतः काँग्रेसने, उमेदवार देत निवडणुकीत रंगत निर्माण केली. काँग्रेस उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांनी सोमवारी दि. १ जुन रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

आदित्य फत्तेपूरकर यांच्या उमेदवारी अर्जावर सूचक म्हणून स्मिता फत्तेपुरकर, ओंकार जोशी, उज्ज्वला लोखंडे, नागेश भोसले, चेतन नरोटे, नरसिंह आसादे, कृष्णराज बारबोले, आकाश राऊत, भागवत मांगडे आणि मेहदिमिया लांडगे यांनी सह्या केल्या आहेत.

आदित्य फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना आवश्यक सूचकांची जुळवाजुळव करण्यात काँग्रेसने शेवटच्या क्षणापर्यंत गुप्तता पाळली. खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी आमदार दिलीप सोपल यांच्याशी संपर्क साधून रणनीती आखल्याचे बोलले जात आहे. एका रात्रीत काँग्रेसने आवश्यक सूचकांची जुळवाजुळव करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात यश मिळविले. भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसने केलेली ही अनपेक्षित चाल राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात असून, पुढील काही दिवस या निवडणुकीभोवतीची राजकीय समीकरणे अधिक चर्चेत राहणार आहेत.



### कुलकर्णींचा सलग दुसऱ्यांदा हिरमोड

काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते प्रा.काकासाहेब कुलकर्णी यांची विधान परिषद निवडणुकीची सलग दुसऱ्यांदा संधी हुकली. याविषयी त्यांनी समाज माध्यमातून नाराजी व्यक्त केली आहे. अनेक वर्षांपासून पक्षासाठी काम, संघटनात्मक जबाबदाऱ्या, जनतेशी सातत्यपूर्ण संपर्क आणि पक्षाच्या विचारधारेप्रती असलेली निष्ठा व गुणवत्तेच्या बळावर अपेक्षा ठेवणे स्वाभाविक होते. मात्र पक्षाने वेगळा निर्णय घेतला आणि पुन्हा एकदा माझ्या वाट्याला प्रतीक्षा आणि निराशाच आली. आज दुसऱ्यांदा संधी हुकली आहे. त्यामुळे मनात नाराजी आहे, वेदना आहे, अस्वस्थता आहे, असे प्रा. कुलकर्णी यांनी समाज माध्यमावरील प्रतिक्रियेत म्हटले आहे.

# मागील भांडणाच्या कारणावरुन एकावर कोयत्याने हल्ला; अकरा जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १ जून-**

काही दिवसापुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन मोटरसायकलवरुन घराकडे निघालेल्या एका मजूरास तलवार, दगडाने मारुन गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना ३१ मे रोजी रात्री ११ वाजता घडली. याप्रकरणी ११ जणाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.





साहिल शिंदे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ते व्यवसायाने गवंडी असून दि.३१ मे रोजी एम.एच.१३ डी.ए.११२२ या मोटर सायकलवरुन बसस्थानक येथून शनिवार पेठेतील घराकडे निघाले होते. नवरंग चौकात आल्यावर वरील आरोपींनी मोटर सायकल अडवून तू यश हेगडेसोबत काही दिवसापुर्वी भांडणे का केली? अशी विचारणा करीत शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी तसेच कोयता, तलवार, रॉडने डोके, उजव्या कानाजवळ, हनुवटीला मारुन गंभीर जखमी केले. उजव्या हाताच्या अंगठ्याजवळ मारल्याने बोट फ्रॅक्चर झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी गोट्या नाईकवाडी, सुशांत पाटील, सुमित पडवळे, अजय पडवळे, विनायक काळे, समर्थ हजारे, यश जगदाळे, महेश मोटे, अनिकेत पडवळे, सुशांत हजारे (सर्व रा.मंगळवेढा), गणेश वायकुळे (रा. पंढरपूर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.





नीट परीक्षा पेपर फुट विरोधात सोमवारी क्रांतिकारी युवा संघटनेच्या सदस्यांनी 'एनटीए' संस्थेविरोधात जोरदार आंदोलन केले. आंदोलकांना ताब्यात घेताना दिल्ली पोलिस

# महाराष्ट्रात धावणार प्रदूषणमुक्त ई-बसेसचा ताफा

## सध्या राज्यात ५,१५० ई-बसेस रस्त्यावर

**मुंबई, १ जून**

महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात आता आमूलाग्र क्रांती होणार आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या निर्धारासह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटी महामंडळाला पूर्णपणे पर्यावरणपूरक करण्याचा ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला आहे. या अंतर्गत २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे मिशन २०४७ राज्य सरकारने हाती घेतले आहे.





केवळ बसेस बदलणे हा हेतू नसून, प्रवाशांना जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव देण्यावर सरकारचा भर आहे. या मोहिमेत अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे. एआयद्वारे कोणत्या मार्गावर प्रवाशांची सर्वाधिक वर्दळ आहे आणि ई-बसेसची आवश्यकता कुठे आहे, याचा अचूक अभ्यास करून नियोजन केले जाईल. एवढेच नव्हे, तर बस पुरवठादारांकडून बसेस प्राप्त होताच, अवघ्या सात दिवसांच्या आत तांत्रिक तपासणी पूर्ण करून त्या ताफ्यात समाविष्ट करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. (तभा वृत्तसेवा)

### चार्जिंगचे जाळे आणि वेगवान अंमलबजावणी

**ई-बसेसच्या या भव्य प्रकल्पासाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन्सचे जाळे युद्धपातळीवर उभारले जाणार आहे. सध्या ५,१५० ई-बसेसचा प्रकल्प जीसीसी मॉडेलवर कार्यान्वित आहे. याशिवाय, खाजगी बसेसच्या तुलनेत एसटीचा पर्याय अधिक सोयीस्कर आणि विश्वासार्ह कसा ठरेल, यावरही सरकार सूक्ष्म नियोजन करत आहे. राज्य सरकारच्या धोरणात्मक पाठबळामुळे बसच्या खरेदीवर २० लाख रुपयांपर्यंतचे अनुदान मिळत असल्याने या प्रकल्पाला मोठी गती प्राप्त झाली आहे.**

### शाश्वत प्रवास भविष्याचा पाया

**पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीकडे टाकलेले हे पाऊल महाराष्ट्राला देशात आघाडीवर नेणारे ठरेल. मिशन २०४७ मुळे केवळ प्रदूषणमुक्तीच होणार नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधांनी सज्ज अशी नवीन एसटी सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहे. एसटीचा हा कायापालट आता वेगवान झाला असून, यामुळे प्रवाशांच्या प्रवासात सुखद आणि आधुनिक बदलांचे वारे वाहणार आहेत.**

# सीआयडीने अभिषेकला बजावली दुसरी नोटीस



## प्रकृतीचे कारण देत मागितली १५ दिवसांची मुदत

**कोलकाता, १ जून**

पश्चिम बंगालच्या गुन्हे अन्वेषण विभागाचे (सीआयडी) अधिकारी सोमवारी तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांना दुसरी नोटीस बजावण्यासाठी त्यांच्या घरी दाखल झाले. दरम्यान, अभिषेक यांनी प्रकृती अस्वस्थ असल्याचे कारण देत सीआयडीसमोर हजर राहण्यासाठी १५ दिवसांची मुदत मागितली आहे.

खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर नुकताच झालेला हल्ला आणि त्यानंतर सीआयडीने त्यांच्या निवासस्थानी पाठवलेल्या नोटीसमुळे राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. तृणमूल काँग्रेस सत्ताधारी भाजपावर सुडाच्या राजकारणाचे आरोप करत आहे तर भाजपाकडूनही जोरदार प्रत्युत्तर दिले जात असल्यामुळे दोन्ही पक्षात आरोप-प्रत्यारोपाचा राजकीय कलगीतुरा रंगला आहे. दरम्यान, भाजपा प्रदेशाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजुमदार म्हणाले, कायद्यासमोर कोणीही मोठा नाही. त्यांना सीआयडीसमोर हजर व्हावेच लागेल. त्यांना हे टाळता येणार नाही.

### नोटीसमागे सरकारची कोणतीही भूमिका नाही

मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी यासंदर्भात सांगितले की, अभिषेक बॅनर्जी यांना सीआयडीने बजावलेल्या नोटीसमध्ये भाजपा किंवा सरकारची कोणतीही भूमिका नाही. सही बनावट केल्याच्या आरोपाच्या तपासाचा भाग म्हणून सीआयडीने त्यांना सोमवारी हजर राहण्यास सांगितले होते. पण ते हजर झाले नाही. त्यांनी हजर होण्यास सीआयडीला १५ दिवसांची मुदत मागितली आहे. आजारपण किंवा इतर कारणांमुळे मुदतवाढ देण्याचा निर्णय सीआयडीचा आहे. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेचा इराणच्या लष्करी तळांवर बॉम्बहल्ला

## कुवेतवर डागले ड्रोन आणि क्षेपणास्त्र



◆ **दुबई, १ जून**

या आठवड्याच्या अखेरीस तेहरानने अमेरिकेचा एमक्यू-१ प्रीडेटर ड्रोन पाडल्यानंतर अमेरिकेने इराणमधील रडार आणि ड्रोन नियंत्रण तळांवर बॉम्बहल्ला केला, असा दावा अमेरिकन लष्कराने सोमवारी केला. तसेच इराणने प्रत्युत्तरात हल्ला केल्याचेही त्यांनी मान्य केले. तर कुवेतने येणारे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले रोखत असल्याचे म्हटले आहे.

हे परस्परविरोधी हल्ले इराण युद्धातील अनेक आठवड्यांच्या शस्त्रसंधीची नाजूक स्थिती दर्शवतात. अमेरिकन आणि इराणी अधिकारी शस्त्रसंधी वाढवण्यासाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करत असतानाही युद्धविरामात वारंवार हल्ले होत आहेत. यादरम्यान, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपली पकड कायम ठेवली आहे. त्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यात व्यत्यय आला आहे. कारण एकेकाळी व्यापार होणाऱ्या एकूण तेल आणि नैसर्गिक वायूपैकी एक पंचमांश वायू पर्शियन आखाताच्या या अरुंद मुखातून जात असे.

इस्रायलने लेबनॉनमधील आपला ताबा लिटानी नदीच्या पलीकडे वाढवल्याने आणि दहशतवादी गट हिजबुल्लाह इस्रायलवर ड्रोन हल्ले करत असल्याने संघर्ष तीव्र होत आहे. अमेरिकेच्या लष्कराच्या सेंट्रल कमांडने सांगितले की, त्यांनी शनिवारी आणि रविवारी इराणमध्ये गेरुक शहराच्या आसपास आणि केशम बेटावर हे हल्ले केले. आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीवर कार्यरत असलेल्या अमेरिकेच्या -१ ड्रोनला पाडण्याच्या इराणच्या आक्रमक कारवायांना प्रत्युत्तर म्हणून हे मोजूनमापून आणि हेतुपुरस्सर केलेले हल्ले करण्यात आले. अमेरिकेच्या लष्कराने सांगितले की, या हल्ल्यांमध्ये कोणताही अमेरिकन सैनिक जखमी झाला नाही. कुवेतने सांगितले की, ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले रोखण्यासाठी त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने सोमवारी पहाटे गोळीबार केला होता. इराणच्या निमलष्करी रिव्होल्यूशनरी गार्डने सरकारी वृत्तसंस्था ने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकन सैन्याने एका बेटावरील दूरसंचार टॉवरला लक्ष्य केले होते. प्रत्युत्तर म्हणून आमच्याकडूनही हल्ला करण्यात आला. त्यांचा रोख बहुधा कुवेतवरील हल्ल्याकडे असावा. या देशात यूएस आर्मी सेंट्रलचे मुख्यालय आहे, जी लष्कराची मध्यपूर्वेतील अग्रिम कमांड आहे. (वृत्तसंस्था)

### हल्ला करणारे ड्रोन केले नष्ट

अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी तात्काळ प्रत्युत्तर देत इराणची हवाई संरक्षण यंत्रणा, एक भू-नियंत्रण केंद्र आणि प्रादेशिक सागरी हद्दीतून जाणाऱ्या जहाजांसाठी धोकादायक असलेले दोन एकमार्गी हल्ला करणारे ड्रोन नष्ट केले. अमेरिकेच्या हवाई दलाने प्रेडेटर विमान टप्प्याटप्प्याने सेवेतून काढून टाकले असून आता ते -९ रीपर विमान वापरतात.

# भारत-ऑस्ट्रेलियात सागरी स्वातंत्र्यावर चर्चा

◆ **नवी दिल्ली, १ जून**

पश्चिम आशिया संकटानंतर ऊर्जा पुरवठा साखळीत निर्माण झालेला व्यत्यय आणि भारत-प्रशांत क्षेत्रात चीनच्या वाढत्या आक्रमकतेबद्दलची चिंता या पृष्ठभूमीवर, भारत आणि ऑस्ट्रेलियाने सोमवारी नौकावहन, हवाई वाहतूक आणि सागरी व्यापाराच्या स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित केले.

नवी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान रिचर्ड मार्ल्स यांच्यात झालेल्या व्यापक चर्चेदरम्यान या मुद्द्यांवर प्रामुख्याने चर्चा झाली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील संरक्षण औद्योगिक सहकार्य आणि संबंधांच्या सामरिक महत्त्वावर भर देताना, दोन्ही मंत्र्यांनी प्रादेशिक भागीदारांसोबत सहकार्य वाढवण्याच्या महत्त्वावर जोर दिला. संरक्षण औद्योगिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या पुढील टप्प्यात दोन्ही देश संरक्षण सामग्री आणि संरक्षण सेवांच्या तरतुदीसंदर्भात सामंजस्य करार विकसित करण्यास सुरुवात करतील, अशी घोषणा चर्चेनंतर, सिंह आणि मार्ल्स यांनी केली. मंत्र्यांनी द्विपक्षीय सागरी सुरक्षा सहकार्यातील प्रगती आणि संयुक्त सागरी सुरक्षा सहकार्य आराखडा अंतिम करण्याच्या प्रयत्नांवर चर्चा केली, असे एका संयुक्त निवेदनात म्हटले आहे.



ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान रिचर्ड मार्ल्स यांच्याशी हस्तांदोलन करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

सिंग आणि मार्लेस यांनी सागरी गस्ती विमानांद्वारे सहयोगी सागरी क्षेत्र जागरूकता उपक्रमांना पुढे नेण्यास आणि पाण्याखालील क्षेत्र जागरूकता वाढवण्याच्या संधी शोधण्यास सहमती दर्शवली. सिंग आणि मार्लेस यांनी भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण औद्योगिक सहकार्य आणि संबंधांच्या सामरिक महत्त्वावरही भर दिला. (वृत्तसंस्था)

## त्विशा शर्मा प्रकरणी सीबीआयची सखोल चौकशी

◆ **नवी दिल्ली, १ जून**

सासरच्या घरी १२ मे रोजी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा आरोप असलेल्या माजी मॉडेल-अभिनेत्री त्विशा शर्माच्या मृत्यूच्या प्रकरणात, सीबीआयने सोमवारी डमींचा वापर करून घटनास्थळाची पुनर्रचना केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

घटनेच्या रात्री १२ मे रोजी घडलेल्या घटनांचा सविस्तर वृत्तांत देण्यासाठी एजन्सीने न्यायवैद्यक आणि घटनास्थळ तज्ज्ञांसह शर्माचा पती समर्थ सिंग आणि सासू गिरीबाला सिंग, हे दोघेही सीबीआयच्या ताब्यात आहेत. घराच्या गच्चीवर तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्यानंतरच्या घटनांचे वर्णन करण्यास सीबीआयने त्यांना सांगितले. (वृत्तसंस्था)

# मे महिन्यात जीएसटी संकलन १.९४ लाख कोटींवर

◆ **नवी दिल्ली, १ जून**

वस्तू व सेवांचा सुधारलेला पुरवठा तसेच आयातीतून होणाऱ्या वसुलीत झालेल्या सातत्यपूर्ण वाढीमुळे मे महिन्यात वस्तू व सेवा कराची (जीएसटी) एकूण वसुली ३.२ टक्क्यांनी वाढून १.९४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली, असे सरकारी आकडेवारीने सोमवारी स्पष्ट केले.

मे महिन्यात एकूण जीएसटी संकलन १.८८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. या कालावधीत देशांतर्गत व्यवहारांतून झालेली एकूण केंद्रीय जीएसटी वसुली ३७,३९७ कोटी रुपये, राज्य जीएसटी ४५,१४३ कोटी रुपये आणि एकात्मिक जीएसटी ५१,१९० कोटी रुपये इतकी नोंदवली गेली.

वस्तूंचा करपात्र पुरवठा २६.९ टक्क्यांनी वाढला, हा देशांतर्गत मागणीचे प्रतिबिंब आहे, तर सेवा क्षेत्रातील हाच पुरवठा २२.२ टक्क्यांनी वाढला. यातून देशांतर्गत उपभोगातील संरचनात्मक लवचीकता दिसून येते. मे महिन्यात आयातीतून होणाऱ्या आयजीएसटी संकलनात १९.१ टक्क्यांची वाढ होऊन ते ५९,६५४ कोटी रुपयांवर पोहोचले. या माध्यमातून औद्योगिक क्षमतेच्या विस्ताराचे संकेत मिळत आहेत.

जीएसटीचे परतावे २.६ टक्क्यांनी वाढून २७,२८१ कोटी रुपयांवर पोहोचले. परतावे समायोजित केल्यानंतर मे महिन्यातील निव्वळ जीएसटी महसूल ३.३ टक्क्यांनी वाढून सुमारे १.५७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला. एप्रिल महिन्यातील जीएसटी संकलन २.४३ लाख कोटी रुपयांच्या सर्वकालीन उच्चांकावर होते.



# सर्वोच्च न्यायालयाला मिळाले पाच न्यायमूर्ती

◆ **नवी दिल्ली, १ जून**

सर्वोच्च न्यायाल्यात सोमवारी पाच नवीन न्यायमूर्तींची नियुक्ती करण्यात आली. यामुळे आता न्यायालयात ३७ न्यायमूर्ती असतील. ही संख्या ३७ या सुधारित मंजूर क्षमतेपेक्षा केवळ एकाने कमी आहे.

केंद्रीय विधी मंत्रालयांतर्गत येणाऱ्या न्याय विभागाने सोमवारी सकाळी जारी केलेल्या स्वतंत्र अधिसूचनांनुसार सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील वेंकिटा सुब्रमण्यम् मोहना, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर, पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव सचदेवा, जम्मू-काश्मीर व लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पाली यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून बढती देण्यात आली.

एकदा त्यांनी शपध घेऊन पदभार स्वीकारला की, सर्वोच्च न्यायालयात औपचारिकरीत्या ३७ न्यायमूर्ती असतील. मागील महिन्यात सरकारने एका काद्यात सुधारणा करणारा एक अध्येदेश जारी केला. यानुसार सर्वोच्च न्यायालयाची (सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांसह) मंजूर संख्या ३४ वरून वाढवून ३८ करण्यात आली आहे.



सर्वोच्च न्यायालयात अगोदरच न्यायमूर्तींची दोन पदे रिक्त होती. त्यात मंजूर पदसंख्या वाढवण्यात आल्याने न्यायालयात रिक्त असलेल्या पदांची एकूण संख्या सहा झाली होती. त्यात सोमवारी पाच न्यायमूर्तींची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे रिक्त पदसंख्या एकवर आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निवड मंडळाने २७ मे रोजी या पाच नावांची शिफारस केली होती आणि त्यानंतर चार दिवसांनी नियुक्ती करण्यात आली. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'काला हिरन' चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सलमान खानशी संबंधित काळवीट शिकार प्रकरणावर आधारित आगामी चित्रपट 'काला हिरन'चे पोस्टर प्रदर्शित झाले. चित्रपटाचा फर्स्ट लुक आणि टीझर २० जून रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात सलमान खान आणि गँगस्टर लॉरेन्स यांच्यातील वाद दाखवण्यात येणार आहे. १९९८ मध्ये जोधपूरच्या कांकाणी गावात सलमान खानवर काळवीट शिकार केल्याचा आरोप होता. त्या प्रकरणाशी संबंधित कोर्टरूम ड्रामा, क्राईम, थ्रिलर आणि लॉरेन्स व सलमान खान यांच्यातील शत्रुत्व चित्रपटाच्या रूपात सादर करण्यात आले आहे, असे चित्रपटाबद्दल निर्माते अमित जानी म्हणाले.




### सुनील ग्रोव्हरने सपत्नीक पाहिला ताजमहाल

**आग्रा :** कॉमेडियन सुनील ग्रोवर पत्नी आरतीसोबत आग्रा येथे पोहोचला. येथे त्यांनी ताजमहाल पाहिला. पत्नीसोबत डायना बेंचवर बसून फोटो काढले. ताजमहाल परिसरात आल्यानंतर सुनील ग्रोवर सुरुवातीला मास्क लावून होता, पण पर्यटकांनी त्यांना ओळखताच त्यांच्यासोबत फोटो आणि सेल्फी घेण्यासाठी गर्दी झाली. सुनील ग्रोवर यानेही चाहत्यांना अभिवादन केले आणि हसतमुखाने त्यांच्यासोबत फोटो काढले. यावेळी तो पत्नीचा हात धरून ताजमहाल परिसरात फिरताना दिसले. तो सुमारे १ तास थांबले. यावेळी त्याने गाईड अंसार अली याला ताजमहालच्या नक्षीकाम आणि वास्तुकलेबद्दल विचारणा केली.



### बॉबी देओलच्या मुलांना व्हायचे आहे 'हिरो'

**मुंबई :** बॉबी देओलची मुले आर्यमन आणि धरम देओल यांना बॉलिवूडमध्ये अभिनयात करिअर करण्याची इच्छा आहे. मोठ्या मुलाने अमेरिकेत राहून फायनान्समध्ये करिअर करावे, असे बॉबी देओलला वाटत असल्याचे त्याने टीव्ही कार्यक्रम 'आप की अदालत'मध्ये सांगितले. न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीमधून ऑनर्स केल्यानंतरही आर्यमनने अभिनयाची निवड केली. त्यांची दोन्ही मुले हिरो बनू इच्छितात आणि यासाठी ते स्वतःला तयार करत आहेत, असे बॉबीने सांगितले. डॉक्टर असो वा इंजिनियर, प्रत्येकाच्या मनात कुठेतरी अभिनेता बनण्याची इच्छा असते, असे बॉबी म्हणाले.



## 'सीजेपी'चा संस्थापक ६ जूनला भारतात परतणार

◆ **नवी दिल्ली, १ जून**

परीक्षांशी संबंधित त्रुटींच्या मुद्यावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी एक शांततापूर्ण आंदोलन सुरू करण्याकरिता ६ जून रोजी भारतात परतणार आहे, असे कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दिपकेने सोमवारी सांगितले.

दिल्लीत होणाऱ्या आंदोलनात सहभागी व्हा, असे अभिजीत दिपकेने इन्स्टाग्रामवर जारी केलेल्या चित्रफितीत म्हटले आहे. भारतीय संविधनाच्या मार्गाचे अनुसरण करीत, आपण सर्वांनी एकत्र येऊन धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी शांततेने आपला आवाज उठवण्याची वेळ आता आली आहे. जर सर्वांनी मिळून आपला आवाच उठवला, तर त्यांना नक्कीच आपले म्हणणे ऐकावे लागेल, असे त्याने सांगितले.

६ जून रोजी विमानतळावर आपल्यासोबत सामील व्हावे, असे आवाहन दिपके याने केले आहे. (वृत्तसंस्था)

# प. बंगाल मंत्रिमंडळाचा विस्तार




## ३५ आमदारांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

◆ **कोलकाता, १ जून**

पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी सोमवारी भाजपाच्या नेतृत्वाखालील पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात ३५ आमदारांना मंत्रिपदाची शपथ दिली. यामुळे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांच्या मंत्रिमंडळाची एकूण सदस्यसंख्या ४१ झाली आहे.

भाजपाच्या १३ आमदारांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली, तर तिघांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली आणि अन्य १९ जणांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश करण्यात आला. हा समारंभ 'लोक भवन' येथे अधिकारी, त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री आणि राज्य प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.

नवनिर्वाचित भाजपा आमदार स्वप्न दासगुप्ता, शंकर घोष, अर्जुन सिंह, तपस रॉय, सरदवत मुखर्जी आणि जगन्नाथ चटोपाध्याय हे कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेणाऱ्यांमध्ये होते. पक्षाचे सदस्य दूधकुमार मंडल, दीपक बर्मन, मनोज ओराव आणि गौरी शंकर घोष यांनीही कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. शुभेन्दू अधिकारी भाजपाचे आमदार राजेश महता, इंद्रनील खान आणि मालती राभा रॉय यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली. जॉयल मुर्मू, अशोक डिंडा, आनंदमय बर्मन, कौशिक चौधरी, गार्गी दास घोष, भास्कर भट्टाचार्य, दिबाकर घरामी आणि सुमना सरकार यांचा शपथविधी झालेल्या राज्यमंत्र्यांमध्ये समावेश आहे. आमदार शांतून प्रामाणिक, पूर्णिमा चक्रवर्ती आणि उमेश राय यांनीही राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. (वृत्तसंस्था)

# 'वरिष्ठ वकिलांना युक्तिवादाची परवानगी नाही'

◆ **नवी दिल्ली, १ जून**

न्यायालयाचे कामकाज अंशतः सुरू असलेल्या दिवसांत वरिष्ठ वकिलांना तातडीच्या सुनावणीसाठी प्रकरणांचा उल्लेख करण्याची किंवा सुनावणीसाठी सूचीबद्ध असलेल्या प्रकरणांमध्ये युक्तिवाद करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले.

आजपासून ते १२ जुलैपर्यंत न्यायालयाचे कामकाज अंशतः सुरू असलेल्या या कालावधीत तरुण वकिलांनी त्यांच्या प्रकरणांमध्ये स्वतः युक्तिवाद करावा, याला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीला आता अंशतः कामकाज सुरू असलेले दिवस असे नाव देण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# १९५० च्या अनुसूचित जाती आदेशात दुरुस्ती करावी

## जनजाती सुरक्षा मंचने घेतली राष्ट्रपती, पंतप्रधानांची भेट

◆ **नवी दिल्ली, १ जून**

जनजाती सुरक्षा मंचच्या प्रतिनिधीमंडळाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत आदिवासी समाजाशी संबंधित मागण्यांचे निवेदन देत यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली.

जनजाती सुरक्षा मंचच्या प्रतिनिधीमंडळाने गुरुवारी पंतप्रधान मोदी यांची भेट घेत त्यांच्याकडे तीन मागण्या केल्या, त्यात लोकुर समितीच्या निकषानुसार अनुसूचित जनजातीची सद्य परिस्थितीला अनुरुप स्पष्ट वैधानिक व्याख्या निर्धारित करण्याच्या मागणीचा समावेश आहे.

१९५० च्या अनुसूचित जाती आदेशात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी, जेणेकरुन जी व्यक्ती धर्मांतरणानंतर पारंपरिक जनजाती आस्था, मुळ संस्कृती, रितीरिवाज आणि जीवनपध्द्तीचा त्याग करत असेल तर त्याला अनुसूचित जातीचा सदस्य समजले जाणार नाही, अशी दुसरी मागणी करण्यात आली. जनजाती समुदायाची सांस्कृतिक अस्मिता आणि संवैधानिक अधिकाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाकडे लक्ष वेधत त्याच्या अंमलबजावणीची मागणी करण्यात आली.

हा विषय फक्त आरक्षणापुरता आणि कायदेशीर व्याख्येपुरता मर्यादित नाही, तर देशातील कोट्यवधी आदिवासी बांधवांची अस्मिता, परंपरा आणि अस्तित्वाशी जुळलेला विषय आहे. या मुद्यावर न्याय मिळण्यासाठी आदिवासी बांधव गेली ७५ वर्ष प्रतिक्षा करत होते, आता त्यांच्या न्यायपूर्ण मागण्यांवर जलदगतीने सकारात्मक निर्णय घेण्याची वेळ आली आहे, याकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले. या मागण्यांसाठी आतापर्यंत वेगवेगळ्या मार्गाने देशभर जागृती अभियान राबवण्यात आले, तसेच राष्ट्रपतींना जिल्हाधिकारी आणि राज्यपालांमार्फत काही लाख स्वाक्षऱ्यांचे निवेदनही देण्यात आले होते. वनवासी कल्याण आश्रमाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्येंद्रसिंह आणि जनजाती सुरक्षा मंचचे राष्ट्रीय सहसंयोजक डॉ. राजकिशोर हांसदा यांनी दिल्लीत एका पत्रपरिषदेत याबाबतची माहिती दिली. (तभा वृत्तसेवा)




पत्रकार परिषदेला उपस्थित वनवासी कल्याण आश्रमाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्येंद्रसिंह, राष्ट्रीय सहसंयोजक डॉ. राजकिशोर हांसदा

### दीड ते दोन कोटी आदिवासी झाले ख्रिश्चन

देशात जनजाती बांधवांची संख्या १२ कोटी असून यातील दीड ते दोन कोटी लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे, याकडे लक्ष वेधत अनेक प्रकरणात धर्मांतरित व्यक्ती एकीकडे अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेतात, दुसरीकडे अल्पसंख्यक कल्याण योजनांचाही फायदा लाटतात, असा दुहेरी फायदा घेणे संवैधानिक समता आणि सामाजिक न्यायाच्या विरोधात आहे, याला आळा घालण्याची निवेदनातून मागणी करण्यात आली. हा अतिशय महत्वाचा विषय राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे त्याच्या संवैधानिक मूल्याचे परीक्षण आणि आढावा घेण्यासाठी सोपवावा, तसेच १९५० च्या संविधान (अनुसूचित जनजाती) आदेशात योग्य ती दुरुस्ती करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली, जेणेकरुन प्रत्येक आदिवासी बांधवाची वेगवेगळ्या न्यायिक अडचणींतून सुटका होईल, याकडे राष्ट्रपतींचे लक्ष वेधण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# अवजड इतिहासाचे ओझे!

महानगरांमधील ब्रिटिशकालीन वसाहतवादाचे अवशेष मानले जाणारे आणि धनवंतांच्या आलिशान सवयींकरिता सुविधा देणाऱ्या 'जिमखाना' या गोंडस नावांमागे दडलेले सामाजिक विषमतेचे एक वास्तव आता अनेक वर्षांनंतर समोर येऊ लागले आहे. आणखी तीन दिवसांनी, म्हणजे ५ जून रोजी ल्युटियन्स दिल्लीतील जिमखाना क्लबची जमीन आणि परिसर रिकामा करण्याच्या सरकारी आदेशाचे भवितव्य निश्चित होईल आणि त्यानंतर महानगरी मुंबईतील अशाच आलिशान जिमखान्यांचा गाशा गुंडाळण्याची प्रक्रिया सुरू होईल. श्रीमंतीच्या झगमगाटी जगण्याचा दुरूनदेखील अनुभव घेणे ज्यांना जन्मात शक्य नव्हते, अशा समाजघटकांस सावली देणारी घरे किंवा देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणारा एखादा क्रांतिकारी प्रकल्प कोट्यवधींची किंमत असलेल्या आणि कवडीमोलाने वापरल्या जाणाऱ्या या मालमत्तांवर उभा राहिला, तर ते देशातील एक सर्वांत मोठे परिवर्तन ठरणार आहे. म्हणून काहीसे बेदखल राहिलेल्या या प्रकरणाची दखल घेणे गरजेचे आहे.

ब्रिटिश राजवटीत, ब्रिटिश भारताची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीत हलविण्याची घोषणा राजा जॉर्ज पंचम यांनी १९११ मध्ये केली आणि हजारो ब्रिटिश अधिकारी दिल्लीत दाखल झालेत. या अधिकाऱ्यांना संध्याकाळच्या निवांत वेळी मद्याचे घुटके घेत शिळोप्याच्या गप्पा मारता येतील, पोलोसारखे खेळ खेळता येतील; सोबतच भारतातील सत्तेचे राजकारण करण्यासाठी धोरणे आखता येतील अशा जागेची गरज लक्षात घेऊन निवडण्यात आलेल्या या विशाल भूखंडावर ३ जुलै १९१३ रोजी 'इम्पीरियल दिल्ली जिमखाना क्लब'चा जन्म झाला. राजधानी दिल्लीच्या मध्यभागी, पंतप्रधानांच्या निवासस्थानापासून अगदी हाकेच्या अंतरावरील, ल्युटियन्स दिल्ली नावाने परिचित असलेल्या या भागातील जागेची सध्याच्या बाजारभावाची एकरी किंमत हजारो कोटी रुपये आहे, पण दिल्ली जिमखाना क्लबच्या सुमारे साडेसत्तावीस एकर जागेसाठी मात्र वर्षाकाठी एक हजार रुपये भाडे आकारले जाते आणि सरकारी मालकीच्या या मालमत्तेचा वापर धनवंतांच्या सुखासीन जगण्याच्या परंपरागत रीतीने सुरू असलेल्या सुविधांकरिता केला जातो. आज दिल्लीतील नव्हे, तर कोणत्याही शहरांमधील एखाद्या गरीब कुटुंबासही एक-दीड खोलीच्या लहानशा घरासाठी महिन्याकाठी भाड्यापोटी हजारो रुपये मोजावे लागतात, तेथे, महानगरी राजधानी दिल्लीतील या मोक्याच्या भूखंडावर मात्र, धनवंतांना वर्षाकाठी जेमतेम हजार रुपये भाडे भरून कोट्यवधींच्या सुविधा उपभोगता येतात. जी जमीन सार्वजनिक मालमत्ता आहे, म्हणजे, जिच्या मालकीवर सामान्य जनतेचाही समान हक्क आहे, त्या जमिनीचा वापर धनवंतांचे कोडकौतुक करण्याहूनही अधिक महत्त्वाच्या आणि देशहिताच्या कामासाठी करण्याकरिता केंद्र सरकार सरसावले असेल, तर ते सरकारच्या संवेदनशीलतेचे उदाहरण ठरते. दिल्ली जिमखाना क्लबला बजावलेल्या नोटिशीनुसार, ही २७.३० एकर जागा रिकामी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. संरक्षणविषयक पायाभूत सुविधा आणि राष्ट्रीय सुरक्षेची जपणूक करण्यासाठी तसेच सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हा परिसर रिकामा करणे आवश्यक असल्याचा दावा केंद्र सरकारने केल्यानंतर लगेचच, सरकारच्या या नोटिशीविरोधात क्लबने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. केंद्रीय आवास आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारीतील भूमी आणि विकास कार्यालयाने दिल्ली जिमखाना क्लबचा भाडेपट्टा रद्द केला आहे आणि या क्लबपाठोपाठ महानगरी मुंबईतील अशाच आलिशान क्लब्जचा कारभारदेखील वेशीवर येणार आहे.

दिल्ली जिमखाना क्लबवरील या कारवाईमागे आणखीही काही कारणे असल्याची चर्चा राजधानीत सतत सुरू असते. या क्लबची आर्थिक स्थिती भक्कम आहे. मुळात, खेळांना प्रोत्साहन देणे हा कोणत्याही जिमखान्याचा मूळ उद्देश असताना, केवळ उच्चभ्रू वर्गांसाठी आणि त्यांची प्रतिष्ठा मिरविण्यासाठी मोक्याच्या भूखंडावर आलिशान क्लब उभारून ते धनवंतांचे 'स्टेटस सिम्बॉल' ठरविण्यास अनेकांचा आक्षेप होता. खेळांच्या नावाखाली जमीन मिळवली गेली, पण खेळांवर फारसा खर्च झालाच नाही. क्लबच्या सदस्यत्वासाठी शेकडो लोक दीर्घकाळापासून प्रतीक्षा करत ताटकळले आहेत आणि त्यांच्याकडून सदस्य नोंदणीसाठी जमा झालेले पैसे मात्र परत केले गेले नाहीत, असाही आक्षेप आहे. प्रत्यक्षात प्रतीक्षायादीतील अनेकांस सदस्यत्व मिळालेले नाही आणि सर्वसामान्य लोकांना तर या जागेवर फिरकणेदेखील शक्य झाले नाही. काँग्रेसकालीन उच्चभ्रू वर्गाच्या कोंडाळ्याचा कब्जा असलेल्या या क्लबमध्ये जवळपास ३७ वर्षांच्या प्रतीक्षायादीतील अनेकांना शिरकाव करता आला नव्हता. २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर भाजपचे नेतेदेखील प्रतीक्षायादीत दाखल झाले आणि इतरांसोबत तेही सदस्यत्वासाठी प्रतीक्षा करत राहिले. शाही भूतकाळाच्या नावाखाली, केवळ उच्चभ्रू लोकांसाठीच सदस्यत्व खुले असणे हा एक प्रकारे वंशभेदासारखाच प्रकार असून संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टाचे उल्लंघन करणारा आहे, असा आक्षेप घेतला जाणे साहजिकही होते.

दिल्लीतील या कारवाईमुळे मुंबईतील जिमखानेदेखील आता चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. सरकारी जमिनीवर उभ्या असलेल्या आणि सुखासीनांचे चोचले पुरविणाऱ्या या आलिशान जिमखान्यांना इतिहास आहे, हे खरे आहे. पण त्या इतिहासाच्या पुण्याईवर वर्तमानात या क्लबकडून केल्या जाणाऱ्या व्यवहारांचा लेखाजोखा मांडण्याचा निर्णय घेऊन राज्यातील फडणवीस सरकारने केलेली छाननी निश्चितच स्वागतार्ह आहे. खेळाचा विकास करण्याची उद्दिष्टे खुंटीवर टांगून केवळ प्रतिष्ठेची लक्षणे म्हणून मिरविणाऱ्या या जागांच्या वापरातील मक्तेदारीमुळे सामान्यांच्या हक्कांवर अतिक्रमण होत असेल, तर त्याबाबतीत प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे आणि त्याची सरकारला दखल घ्यावी लागली असेल तर ते साहजिकही आहे. खेळांच्या विकासासाठी मुंबईच्या दक्षिण भागातील मोक्याच्या जागांवरील प्रभावशाली सामाजिक वर्गाची पकड सैल करण्याची गरज सरकारने ओळखली हे योग्य झाले. अशा संस्थांवरील कारवाई ही केवळ स्थानिक प्रशासकीय कारवाई नसून देशभरातील सार्वजनिक मालमत्तांच्या मूल्यांकनाच्या मोहिमेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून याकडे पाहावयास हवे. मुंबईतील सुमारे दहा जिमखाने याबाबतच्या सरकारी कारवाईच्या कक्षेत असल्याचे म्हटले जाते. मुंबईतील सगळ्यात आलिशान, श्रीमंत आणि महागड्या भागातील या क्लबच्या ताब्यात असलेल्या मालमत्तांची किंमत अब्जावधींच्या घरात असल्याचा अंदाज आहे. मात्र, या मालमत्तांमधून सरकारला मिळणारा भाडेपट्टा केवळ काही कोटींपुरता मर्यादित आहे. अशा मालमत्तांवर मक्तेदारी प्रस्थापित करून त्या काही मोजक्यांच्या मुठीत एकवटल्या असतील, तर सार्वजनिक मालमत्तांपासून सर्वसामान्य समाजास वंचित ठेवण्याच्या या सामाजिक न्यायविरोधी मक्तेदारीला आळा घालणे गैर नाही. यापैकी अनेक संस्थांच्या भाडेपट्ट्याचे करारदेखील केव्हाच संपुष्टात आले असावेत असे बोलले जाते. सरकारने त्याचीही काटेकोर शहानिशा करावयास हवी. काही प्रकरणे न्यायालयातही दाखल झाली होती, तर काहींच्या भाड्याबाबत तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. आता, दिल्ली जिमखाना क्लबवरील कारवाईनंतर या प्रक्रियेस वेग देणारे बळ महाराष्ट्र सरकारला प्राप्त होणार आहे. जनतेची जमीन काही मोजक्या धनवंतांकरिता का, हा कुजबुजत्या सुरात उमटणारा प्रश्न आता ऐरणीवर येऊ पाहत आहे. त्यामुळे एक तर, या संस्थांचे दरवाजे सर्वांकरिता समान न्यायाने खुले झाले पाहिजेत किंवा काही मोजक्यांची मक्तेदारी संपवून सरकारने न्याय्य पद्धतीने सार्वजनिक मालमत्तांवरील सुविधांचा वापर करण्याची संधी सर्वांस दिली पाहिजे. हा बदल सोपा नाही. यामध्ये अनेक अडथळ्यांची शर्यत सरकारला पार पाडावी लागणार हे स्पष्ट आहे. पण अशा शर्यतीत सामान्य माणूस सरकारसोबत असेल यात शंका नाही. म्हणूनच, हा प्रश्न आता रेंगाळत ठेवणे योग्य नाही.

---

## विशेष

# भारताचे नवे स्टील धोरण

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतातील औद्योगिक विकासाच्या इतिहासात स्टील उद्योगाला नेहमीच कणा मानले गेले आहे. रेल्वेपासून महामार्ग, बंदरे, मेट्रो, संरक्षण, ऊर्जा, वाहन उद्योग, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांची उभारणी स्टीलशिवाय शक्य नाही. भारत आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा स्टील उत्पादक देश असला, तरी बदलत्या जागतिक आर्थिक आणि पर्यावरणीय वास्तवामुळे आता केवळ उत्पादनवाढ पुरेशी राहिलेली नाही. गेल्या काही दशकांमध्ये भारताने स्टील उत्पादनात मोठी झेप घेतली. स्टीलची मागणी सातत्याने वाढत गेली; मात्र भारतीय स्टील उद्योगाचा मोठा भाग अजूनही पारंपरिक कोळसा-आधारित ब्लास्ट फर्नेस पद्धतीवर अवलंबून आहे. ही पद्धत उत्पादनक्षम असली, तरी ती मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित करते. जगभरात हवामानबदलाचा प्रश्न गंभीर बनत असताना स्टील उद्योग हा सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांपैकी एक मानला जातो. जागतिक कार्बन उत्सर्जनात स्टील क्षेत्राचा सुमारे सात ते आठ टक्के वाटा असल्याचे विविध अभ्यासांमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता जगातील प्रमुख अर्थव्यवस्था हरित स्टील उत्पादनाकडे वळत आहेत.

युरोपीय महासंघाने कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझमसारखे नियम लागू करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार जास्त कार्बन उत्सर्जन करून तयार झालेल्या उत्पादनांवर अतिरिक्त कर लावला जाणार आहे. याचा थेट परिणाम भारतीय स्टील निर्यातीवर होऊ शकतो. भारताने वेळेत हरित उत्पादन पद्धती न स्वीकारल्यास जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता कमी होण्याचा धोका निर्माण होईल. सरकार २०३५ पर्यंत भारताची स्टील उत्पादन क्षमता सुमारे ४०० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचा विचार करत आहे; परंतु या विस्ताराचा केंद्रबिंदू केवळ प्रमाण नसून गुणवत्ता असेल. आतापर्यंत भारतात मोठ्या प्रमाणावर सामान्य दर्जाचे बांधकाम स्टील तयार होत होते; परंतु उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांसाठी आवश्यक असलेले स्पेशॅलिटी स्टील आणि प्रीमियम स्टील मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागत होते. संरक्षण, सेमीकंडक्टर उपकरणे, इलेक्ट्रिक वाहने, अक्षय ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक अभियांत्रिकी उद्योगांना उच्च दर्जाच्या स्टीलची आवश्यकता असते. या क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरता साधायची असेल, तर देशांतर्गत प्रीमियम स्टील उत्पादन वाढवणे अपरिहार्य ठरणार आहे.

नव्या धोरणात हरित स्टील उत्पादनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. हरित स्टील म्हणजे कमी कार्बन उत्सर्जन करून तयार केलेले स्टील. यासाठी पारंपरिक कोळशाऐवजी हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा, स्क्रॅप-आधारित इलेक्ट्रिक आर्क फर्नेस किंवा कार्बन कॅप्चर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतासाठी हे संक्रमण सोपे नाही. कारण देशातील मोठ्या स्टील कंपन्यांनी कोळसा-आधारित प्रकल्पांमध्ये हजारो कोटींची गुंतवणूक केलेली आहे. त्यात त्वरित बदल करणे आर्थिकदृष्ट्या कठीण आहे. शिवाय हरित हायड्रोजनची किंमत अजूनही जास्त आहे. अक्षय ऊर्जेची उपलब्धता, तांत्रिक कौशल्य आणि पुरवठा साखळी यासारखी अनेक आव्हाने समोर आहेत,



तरीदेखील भारताकडे काही मोठ्या संधी आहेत. देशात सौर आणि पवन ऊर्जेची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 'हरित हायड्रोजन मिशन'द्वारे सरकार स्वच्छ इंधन उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. जर स्टील उद्योगाने या ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर केला, तर भारत कमी खर्चात हरित स्टील तयार करणाऱ्या प्रमुख देशांमध्ये स्थान मिळवू शकतो. विशेष म्हणजे विकसित देशांमध्ये ऊर्जा खर्च वाढत असताना भारताला उत्पादन खर्चात स्पर्धात्मक फायदा मिळण्याची शक्यता आहे. सरकार सार्वजनिक खरेदीत 'हरित स्टील'चा अनिवार्य वापर करण्याचाही विचार करत आहे. महामार्ग, रेल्वे, सरकारी इमारती, मेट्रो आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये हरित स्टील वापरले गेले, तर त्यासाठी मोठी बाजारपेठ तयार होऊ शकते. सुरुवातीला 'हरित स्टील'चे उत्पादन महाग असले, तरी मोठ्या प्रमाणातील मागणीमुळे खर्च कमी होण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन ऊर्जा संक्रमणाच्या इतर क्षेत्रांमध्येही यशस्वी ठरला आहे. उदाहरणार्थ, सौर ऊर्जेच्या बाबतीत सुरुवातीला सरकारी प्रोत्साहनामुळेच उद्योगाला चालना मिळाली होती. नव्या धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आयात कमी करून देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे. भारत अजूनही काही प्रकारच्या उच्च दर्जाच्या स्टीलसाठी चीन, जपान आणि दक्षिण कोरियावर अवलंबून आहे. जागतिक पुरवठा साखळीतील अस्थिरता आणि भूराजकीय तणाव लक्षात घेता हे अवलंबित्व धोकादायक ठरू शकते.

कोविड महामारीनंतर जगभरातील देशांनी धोरणात्मक उद्योगांमध्ये स्वावलंबनावर भर देण्यास सुरुवात केली आहे. स्टील क्षेत्रही त्याला अपवाद नाही; मात्र या सर्व योजनांच्या यशासाठी काही मूलभूत प्रश्न सोडवावे लागतील. भारतातील अनेक लघु आणि मध्यम स्टील उत्पादक अजूनही जुन्या तंत्रज्ञानावर चालतात. त्यांच्याकडे हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक भांडवल नाही. धोरण केवळ मोठ्या उद्योगसमूहांपुरते मर्यादित राहिले, तर लहान उद्योग अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे सरकारने आर्थिक साहाय्य, करसवलती, तांत्रिक मदत आणि स्वस्त वित्तपुरवठा यासारख्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कच्चा माल. भारताकडे लोखंड, खनिजाचा मोठा साठा असला तरी उच्च दर्जाच्या कोकिंग कोळशासाठी मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. हरित स्टीलकडे संक्रमण करताना स्क्रॅप पुनर्वापर उद्योग विकसित करणे आवश्यक ठरेल. सध्या भारतातील स्क्रॅप संकलन आणि प्रक्रिया व्यवस्था विस्कळीत आहे. भविष्यात परिपत्र अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून स्क्रॅप-आधारित उत्पादन वाढवणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. मानवी संसाधनांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. हरित स्टील उद्योगासाठी नव्या प्रकारच्या तांत्रिक कौशल्यांची गरज भासणार आहे. अभियंते, ऊर्जा तज्ज्ञ, हायड्रोजन तंत्रज्ञानातील प्रशिक्षित मनुष्यबळ आणि डिजिटल ऑटोमेशन तज्ज्ञ यांची मोठी मागणी निर्माण होईल. त्यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमांना नव्या धोरणाशी जोडणे आवश्यक ठरेल. या धोरणाचा आणखी एक व्यापक परिणाम म्हणजे भारताच्या हवामान धोरणावर निर्माण होणारा प्रभाव. भारताने २०७० पर्यंत नेट-झीरो उत्सर्जनाचे लक्ष्य जाहीर केले आहे. हे लक्ष्य साध्य करायचे असेल तर ऊर्जा, वाहतूक आणि उद्योगक्षेत्रात मोठे बदल करावे लागतील. त्यात स्टील उद्योगाचे योगदान निर्णायक असेल. भारताने स्टील क्षेत्रातील उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी केल्यास जागतिक हवामान चर्चांमध्ये देशाची विश्वासार्हता वाढेल. तथापि, केवळ धोरण जाहीर करून उद्दिष्टे साध्य होत नाहीत. हरित स्टीलच्या बाबतीत अशीच परिस्थिती उद्भवू नये, यासाठी केंद्र-राज्यांत समन्वय आवश्यक असेल.

पर्यावरण मंजुरी, ऊर्जा उपलब्धता, जमीन अधिग्रहण, संशोधन आणि विकास, वित्तपुरवठा आणि निर्यात धोरण या सर्व बाबींमध्ये सुसंगत दृष्टिकोन आवश्यक आहे. भारतातील मोठ्या स्टील कंपन्यांनी आधीच हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक सुरू केली आहे. काही कंपन्या हायड्रोजन-आधारित उत्पादनाचे प्रयोग करत आहेत, तर काही कार्बन कॅप्चर आणि पुनर्वापर तंत्रज्ञानावर काम करत आहेत; परंतु जागतिक स्तरावर स्पर्धा करायची असेल, तर संशोधन आणि नवकल्पनांमध्ये आणखी मोठी गुंतवणूक करावी लागेल. भारताने केवळ तंत्रज्ञान आयात करणारा देश न राहता तंत्रज्ञान विकसित करणारा देश बनणे गरजेचे आहे. नवे राष्ट्रीय स्टील धोरण हे भारताच्या औद्योगिक परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. हे धोरण योग्य पद्धतीने राबवले गेल्यास भारताला केवळ उत्पादनवाढ नाही तर उच्च दर्जाचे, पर्यावरणपूरक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक औद्योगिक राष्ट्र म्हणून उभे राहण्याची संधी मिळू शकते; त्यासाठी दीर्घकालीन दृष्टी, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि उद्योग-सरकार यांच्यात प्रभावी सहकार्य आवश्यक असेल. एके काळी औद्योगिक क्रांतीचे प्रतीक असलेले स्टील आता हरित अर्थव्यवस्थेच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. भारताने या संक्रमणात पुढाकार घेतला, तर ते आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेलच, पण भविष्यातील पिढ्यांसाठी अधिक शाश्वत विकासाचा मार्गही खुला करेल.

(लेखक अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

---

## वेध

**नितीन शिरसाट**

# मंदिरांना पौष्टिक अन्नसेवा; स्वागतार्ह निर्णय

भारत हा श्रद्धा, अध्यात्म आणि सांस्कृतिक परंपरांचा देश म्हणून ओळखला जातो. देशभरातील हजारो मंदिरे, मठ, देवस्थाने, गुरुद्वारे, तीर्थक्षेत्रे दरवर्षी कोट्यवधी भाविकांना आकर्षित करतात. धार्मिक पर्यटन स्थळी भाविकांची संख्या वाढत असताना आवश्यक मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येते. केंद्र शासनाने अलिकडेच धार्मिक स्थळांवर दर्जेदार व पौष्टिक अन्नसेवा उपलब्ध व्हावी यासाठी शेगाव आणि शिर्डी येथे फूड स्ट्रीट हब उभारण्यास मंजुरी दिली आहे. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी महाराष्ट्रातील इतर प्रमुख धार्मिक स्थळांवरील सेवा सुविधांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

केंद्र सरकारच्या फूड स्ट्रीट योजनेंतर्गत विदर्भातील प्रसिद्ध शेगाव आणि मराठवाडा विभागातील शिर्डी येथे फूड स्ट्रीट हबला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत दोन्ही धार्मिक स्थळी प्रत्येकी १ कोटी या प्रमाणे २ कोटी रुपयांचा निधी केंद्राच्या वतीने उपलब्ध करून दिला जाणार आहे. या निधीतून फूड स्ट्रीट हब सेंटर लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. रस्त्यावरील खाद्यपदार्थांमुळे होणारे आजार, अन्नातून होणारी विषबाधा रोखण्यासाठी अन्न हाताळण्याची सुरक्षित मानके देशभर लागू करण्यात आली आहेत. शिवाय लघु व्यावसायिक विक्रेत्यांना रोजगाराची चालना मिळणार आहे. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या धार्मिक स्थळांवर आजही भाविकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, कोकण किनारपट्टीवरील गणपतीपुळे, तुळजापूरचे भवानी मंदिर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, सप्तशृंगी गड, पंढरपूर यासारख्या ठिकाणी लाखो भाविक वर्षभर येत असतात. परंतु



अनेक ठिकाणी स्वच्छ शौचालयांची कमतरता, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, वाहनतळांची गैरसोय, सामान ठेवण्याची सुविधा नसणे, रांगा व्यवस्थापनातील त्रुटी आणि परवडणाऱ्या भोजनव्यवस्थेचा अभाव ही गंभीर समस्या आहे.

विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मध्यमवर्गीय भाविकांना या अडचणींचा सर्वाधिक फटका बसतो. श्रद्धेने देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शनापेक्षा सुविधांच्या शोधात अधिक वेळ घालवावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. धार्मिक स्थळांच्या परिसरात वाढत्या व्यावसायिकीकरणामुळे भाविकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. स्थानिक नगर पालिका, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद परिसरातील जागेत वाहनतळासाठी तासाला पैसे मोजावे लागतात. निवास व्यवस्था, भोजन यासाठी अनेकदा अवास्तव दर आकारले जातात. काही ठिकाणी दरफलक नसणे, अधिकृत नियंत्रणाचा अभाव, मध्यस्थांची साखळी यामुळे भाविकांना जास्त पैसे मोजावे लागतात. श्रद्धा आणि भक्तीचा गैरफायदा घेतला जात असल्याची भावना निर्माण होते. धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता उत्तरदायित्व वाढविणे ही काळाची गरज आहे. तर दुसरीकडे दर तासाला होणारी मंदिर परिसरातील स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, पादत्राणे ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था, सुलभ शौचालय, पाण्याची व्यवस्था, दररोज तीर्थप्रसाद, अन्नदान, ठिकठिकाणी पंखे, कूलरची थंड हवा, वयोवृद्ध, लहान मुलांसाठी स्वतंत्र दर्शनाची सुविधा यासाठी देशभरात प्रसिद्ध असलेले विदर्भाची पंढरी संतनगरी श्री गजानन महाराज संस्थान शेगाव, अमृतसर येथील सुवर्ण मंदिर किंवा काही मोठ्या संस्थानांप्रमाणे सर्व भाविकांना मोफत अत्यल्प दरात पौष्टिक भोजन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था राज्यातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये असणे आवश्यक आहे. अन्नछत्रामुळे सर्वसामान्य भाविकांना मोठा दिलासा मिळतो. श्रद्धेच्या ठिकाणी सामाजिक समतेचाही संदेश दिला जातो. अनेक धार्मिक स्थळांवर स्वच्छता सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यासाठी शुल्क आकारले जाते. काही ठिकाणी पादत्राणे ठेवण्यासाठी, सामान ठेवण्यासाठी, वाहन पार्किंगसाठी अगदी शौचालय वापरण्यासाठी पैसे मोजावे लागतात. भाविकांच्या दृष्टीने हा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड आहे. देवदर्शनासाठी आलेल्या वृद्ध, महिला, दिव्यांग आणि लहान मुलांसोबत आलेल्या कुटुंबांना या सुविधांची सर्वाधिक गरज असते. यासाठी केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेऊन भाविकांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध संस्थांनचे विश्वस्त, समिती, पंचकमिटी यांच्याशी बैठकीतून संवाद साधून मार्ग काढणे आवश्यक आहे.

९८८१७१७८२८

---

## इतस्ततः

# नीट न जमणारी 'नीट'ची परीक्षा

**दत्तात्रेय आंबुलकर**

गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही वैद्यक्षेत्रातील पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेली 'नीट' ही प्रवेश परीक्षा गाजली व गाजत आहे, ती त्यातील पेपरफुटीमुळे. यंदाच्या 'नीट'च्या पेपरफुटीचे धागेदोरे विविध राज्यांमध्ये अगदी व्यावसायिक स्वरूपात व वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेचे व्यापारीकरण करणारे बनल्याचे उघडकीस आले. परिणामी, 'नीट'च्या प्रवेश प्रक्रिया व त्यातील व्यवसायी ढिसाळपणाला देशपातळीवर विरोध झाला. पालकांपासून पुढाऱ्यांपर्यंत 'नीट' पेपरफुटीला कडाडून विरोध झाल्यामुळे सरकारला ही प्रवेश प्रक्रिया पुन्हा व नव्याने घेण्याचा निर्णय घेणे क्रमप्राप्त व अपरिहार्य होते व झालेही तसेच.पेपरफूट व त्यापोटी देशपातळीवरील 'नीट'च्या फेरपरीक्षेमुळे यावर्षीच्या प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चक्कर येणे व त्यांच्या पालकांना घाम फुटण्यासारखी स्थिती निर्माण होणे हे म्हणा तसे स्वाभाविकच होते. यामागची संबंधित विद्यार्थी-उमेदवारांची सद्य:स्थितीतील मन:स्थिती म्हणजे, त्यांनी काही वर्षांपासून आपल्या डॉक्टर होण्याच्या इच्छा आणि जिद्दीपोटी केलेले प्रयत्न आणि तयारीवर फेरपरीक्षेने पाणी फेरले. त्याचवेळी त्यांच्या पालकांनी फार मोठी रक्कम मोजून आपल्या मुलाला वा मुलीला डॉक्टर बनविण्याच्या स्वप्नापोटी विविध प्रमुख शहरांतील व विशेषतः राजस्थानच्या कोटा, जयपूर, सीकर यासारख्या इंजिनीअरिंगसह वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशाची मोठी व प्रमुख व्यापारी केंद्रे ठरलेल्या ठिकाणी विद्यार्थ्यांना 'नीट' परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी केलेला लाखो रुपयांचा खर्च आज मातीमोल ठरला आहे. फेरपरीक्षेमुळे या विद्यार्थी-पालकांसमोर सध्या उरलेला एकमेव पर्याय म्हणजे, फेरपरीक्षेच्या फेरतयारीच्या दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या आशा-आकांक्षांचा पालापाचोळा झालेला असून, संबंधित विद्यार्थी नैराश्य व वैतागासह परीक्षेच्या फेरतयारीला लागले असून, त्यांच्या पालकांना काळजीयुक्त परिस्थितीत व प्रसंगी निद्रानाशासह आपल्या मुलांच्या स्वप्नांचा झालेला नाशच जणू पाहावा लागत आहे. 'नीट'ची प्रवेश परीक्षा नीट न झाल्याचीच, ही सध्यातरी त्यांच्या न संपणाऱ्या भयाची परिणती ठरली आहे.

या संदर्भातील संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे म्हणजे, यावर्षी ३ मे रोजी देशातील लाखो विद्यार्थ्यांनी वैद्यक क्षेत्रातील आपल्या करीअर-स्वप्नपूर्तीची सुरुवात म्हणून 'नीट' प्रवेश पात्रता देण्याती पूर्वतयारी केली होती. याची मोठी तयारी त्यांनी गेल्या एक-दोन वर्षांत केली होती व त्यासाठी त्यांच्या पालकांनी लाखांवर रक्कम खर्च केली होती, गुंतवली होती.

या परीक्षार्थी-विद्यार्थ्यांची या दरम्यानची पृष्ठभूमी, मानसिकता म्हणजे यापैकी अधिकांश जणांनी आपले घर आणि पालकांपासून अनेक महिने व वर्षे दूर राहून 'नीट'ची मेहनत घेऊन प्रयत्नपूर्वक पूर्वतयारी केलेली. यासाठी बहुधा सर्वांनीच खर्चीक क्लासेस लावून विविध परीक्षा-चाचण्या दिल्या. त्यासाठी प्रसंगी रात्रंदिवसही अभ्यास केला. अशा प्रकारे 'नीट' प्रवेश परीक्षेची तयारी व पूर्वाभ्यास केल्यानंतरच्या कालावधीत या विद्यार्थ्यांना हायसे वाटले. परगावी वा घरापासून दूर राहून विशेष अभ्यास करणाऱ्यांनी परीक्षेच्या अपेक्षित तारखेच्या आधी मिळालेले काही दिवस घरी व आपले पालक-नातेवाईकांसह व मित्रांसह घालविण्यासाठी घरी पोहोचले, तर मोठ्या शहरातील 'नीट'ची तयारी करणारे मोठ्या शहर वा महानगरातील विद्यार्थी 'नीट'च्या पूर्वतयारीचा ताण कमी झाल्याने काहीसे खूश झाले. मात्र, 'नीट'ची तयारी पूर्ण करणाऱ्या या विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला, तो 'नीट' प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे, 'नीट' परीक्षाच रद्द करण्यात आल्याच्या बातमीने. यातूनच या विद्यार्थ्यांना गेले बरेच महिने वा काही वर्षे सर्व प्रकारे प्रयत्न करून केलेली तयारी व मोठे प्रयत्न अशा प्रकारे अचानक व अनपेक्षितरीत्या बेकार झाल्याचे मोठे शल्य होते, तर पालकांसाठी आपल्या मुला-मुलीला डॉक्टर बनविण्याच्या स्वप्नपूर्ततेसाठी फार मोठा खर्च करून व त्यांना प्रसंगी घरापासून दूर ठेवून, विशेष तयारी करण्यासाठी सर्व प्रकारे प्रोत्साहन देणाऱ्या पालकांमध्ये हतबलता आली. 'नीट'साठी वर्षानुवर्षे विद्यार्थ्यांची तयारी करवून घेण्यासाठी मोठी राशी घेणाऱ्या, बहुतांश मार्गदर्शन करणाऱ्या संस्थाचालकांच्या चेहऱ्यावरची रया गेली; तर पोलिस-प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व संबंधित मंत्री व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा पुरतेपणी गोंधळ उडाला. छेपरफूट व 'नीट' परीक्षाच रद्द होणे, या घटकांनी या विषयाशी संबंधित विविध घटकांमधील गोंधळ प्रदीर्घ काळ कायम राहिला. एवढेच नव्हे, तर 'नीट'ची यावेळची पेपरफुटी केरळम्पासून उत्तराखंडपर्यंत विविध राज्यांमध्ये उघड झाल्याने या शैक्षणिक-प्रशासकीय गोंधळाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. यावेळी 'नीट'च्या झालेल्या पेपरफुटी व गोंधळामुळे विद्यार्थ्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात नैराश्य पसरले आहे. पालक हतबल झाल्यामुळे यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांना आलेल्या नैराश्यातून सावरण्यासाठी काही ठिकाणी तर मानसशास्त्र व मानसोपचारतज्ज्ञांची मदतसुद्धा घ्यावी लागली. एवढेच नव्हे, तर नैराश्यातील या विद्यार्थ्यांना बसलेला धक्का आणि दु:खातून बाहेर काढून 'नीट' फेरपरीक्षेसाठी मानसिकदृष्ट्या तयार करण्याचे मोठे दिव्य यासाठी पार पाडावे लागेल. 'नीट'ची तयारी करणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, प्रशिक्षक-मार्गदर्शक या साऱ्यांनी मान्य केले आहे की, भूकंपाच्या धक्क्यांप्रमाणेच यंदाचा 'नीट'च्या पेपरफुटीचा धक्का सर्वाधिक तीव्रतेचा ठरला. अधिकांश विद्यार्थ्यांचा यामुळे प्रयत्न-परिश्रम व अभ्यास-प्रयास यावरील विश्वासच उडाला असून, त्यांना नव्याने परीक्षेसह परिस्थितीला सामोरे जाणे अवघड ठरले आहे. पालकांपुढील जटिल प्रश्न म्हणजे, यात आमचे व आमच्या मुलांचे काय चुकले? 'नीट'ची परीक्षा नीट न झाल्याने या साऱ्यांपुढे निर्माण झालेल्या भयप्रद परिस्थितीमुळे त्यांचे भय आणि भीती अद्याप कायम आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

---

### फक्त शिक्षित नव्हे, सुसंस्कृत पिढी घडविण्याची वेळ

अभ्यासासोबत संस्कार शिक्षणाची आवश्यकता असून शिक्षण क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षण, स्पर्धात्मक परीक्षा आणि करीअरकेंद्रित अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. मात्र या सर्व प्रगतीच्या प्रवाहात नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव, शिस्त, संयम आणि मानवी संस्कार यांचा पाया कमकुवत होत असल्याची चिंता पालक, शिक्षक आणि समाजातील अनेक घटक व्यक्त करत आहेत. विद्यार्थी गुणांच्या स्पर्धेत पुढे जाण्यासाठी प्रयत्नशील आहेत, परंतु चांगला माणूस घडविण्यासाठी आवश्यक असलेले संस्कार आणि नैतिक शिक्षण अनेकदा दुर्लक्षित राहते. आज समाजात वाढणारी असहिष्णुता, वडिलधाऱ्यांप्रति कमी होत असलेला आदर, सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी होणे आणि व्यसनांसारख्या समस्यांकडे आकर्षण वाढणे ही चिंतेची बाब आहे. या पृष्ठभूमीवर प्रत्येक शाळेत नियमित अभ्यासक्रमासोबत संस्कार प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याची मागणी रास्त आणि काळाची गरज ठरते. पुस्तकातील ज्ञान विद्यार्थ्यांना यशस्वी बनवू शकते, परंतु संस्कार त्यांना संवेदनशील, जबाबदार आणि आदर्श नागरिक बनवतात. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास जितका महत्त्वाचा आहे, तितकाच त्यांच्या चारित्र्याचा विकासही महत्त्वाचा आहे. शाळांमध्ये नैतिक शिक्षण, भारतीय संस्कृतीची ओळख, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम आणि शिस्त यांसारख्या विषयांवर नियमित मार्गदर्शन दिल्यास विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडू शकतो.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### स्वर सुमन निमाले

ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे ३१ मे २०२६ रोजी वयाच्या ८९व्या वर्षी मुंबई येथे निधन झाले.

## वाचक पत्रे



हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, आसामी, कन्नड आणि इतर अनेक भाषांमध्ये त्यांनी गाणी गायिली. त्यांच्या मधुर, सोज्वळ आणि भावस्पर्शी आवाजामुळे अनेकदा त्यांची गाणी लता मंगेशकर यांच्या आवाजाशी गल्लत केली जात असे. 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे', 'जिथे सागरा धरणी मिळते', 'केतकीच्या बनी', 'ना ना करते प्यार' यासारखी असं'य अजरामर गीते त्यांनी संगीतविश्वाला दिली. मोहम्मद रफी, किशोर कुमार, मुकेश, मन्ना डे यासारख्या दिग्गजांसोबत त्यांनी अनेक संस्मरणीय युगुलगीते गायिली. सात दशकांहून अधिक काळ चाललेल्या त्यांच्या संगीतप्रवासाने भारतीय चित्रपटसंगीत आणि भावसंगीत समृद्ध केले. त्यांचा स्वर, साधेपणा आणि संगीतवारसा सदैव जिवंत राहील. सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**माधव ताटके**/पुणे

●● ●●

### ऊर्जा वापरातील विषमता चिंताजनक

अलिकडेच जागतिक ऊर्जा व्यवस्थेमध्ये एक अत्यंत अस्वस्थ करणारे चित्र ऑक्सफॅमच्या अहवालातून जगापुढे मांडण्यात आले. एकीकडे जगभरातील कोट्यवधी कुटुंबे वाढत्या वीज बिलाच्या ओझ्याखाली दबत आहेत, तर दुसरीकडे इंधन कंपन्यांचा नफा प्रत्येक सेकंदाला नवनव्या उंचीवर जात आहे. २०२६ मध्ये जगातील सहा सर्वांत मोठ्या इंधन कंपन्या दर सेकंदाला तब्बल २९६७ डॉलर म्हणजे सुमारे अडीच लाख रुपयांचा नफा कमावणार आहेत. या अहवालामुळे आर्थिक विरोधाभासाचे चित्रही स्पष्ट झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या कंपन्यांना नफ्यामध्ये दररोज सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांची वाढ होत आहे आणि एकत्रित वार्षिक नफा ८.९ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. इंधन कंपन्यांच्या नफ्यातून आफ्रिका खंडातील पाच कोटी लोकांना सौर ऊर्जा उपलब्ध करून देता येऊ शकेल. जे जगभरातील देश आज ऊर्जा संकटाशी झुंज देत आहेत. तिथे हा नफा प्रकाश पोहोचवू शकतो. मात्र, तसे न होता सध्या हा अफाट पैसा मूठभर लोकांच्या संपत्तीत आणखी भर घालत चालला आहे. सर्वेक्षणानुसार तिपटीपेक्षा अधिक लोकांना असे वाटते की, सरकारांनी जीवाश्म इंधनाचे उत्पादन वाढवण्याऐवजी नवीकरणीय ऊर्जेत गुंतवणूक करावी. मोठ्या तेल, गॅस कंपन्यांना नफ्यावर अधिक कर लावला जावा आणि त्या पैशातून स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने वाटचाल व्हावी. आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंधन कंपन्या त्याच्या अगदी उलट दिशेने वाटचाल करत आहेत, हे चिंताजनक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विकासाच्या अजेंड्यावर ‘महायुती’चा विक्रमी विजयाचा निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. १ जून-**

बसवराज पाटील यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रदीर्घ अनुभव, विकासाची स्पष्ट दृष्टी आणि म हायुतीच्या विचारांप्रती असलेली निष्ठा यामुळे मतदारसंघातील लोकप्रतिनिधी त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा देतील, असा विश्वास व्यक्त करीत महायुतीच्या एकजुटीच्या बळावर आणि विकासाच्या अजेंड्यावर ही निवडणूक लढवून विक्रमी मताधिक्याने विजय संपादन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला गती देण्यासाठी तसेच मतदारसंघातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी बसवराज पाटील यांचे नेतृत्व उपयुक्त ठरेल, असे



मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

**बसवराज पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल**

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघातून भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांनी सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

महायुतीच्या विकासाच्या अजेंड्याला स्थानिक स्वराज्य संस्थांम धील लोकप्रतिनिधींचा मोठा पाठिंबा असून, राज्य सरकारने राबविलेल्या विविध लोकहितकारी योजनांमुळे महायुतीबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे बसवराज पाटील यांचा विजय निश्चित असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विकासाला अधिक गती देण्यासाठी सक्षम नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे सांगितले. बसवराज पाटील यांच्या उमेदवारीमुळे महायुतीला अधिक बळ मिळणार असून विकासाची वाटचाल अधिक वेगाने सुरू राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना मंत्री बाबासाहेब पाटील, आम दार विक्रम काळे, आमदार अभिमन्यू पवार, अर्चनाताई पाटील चाकूरकर, अरविंद पाटील निलंगेकर तसेच म हायुतीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात असून महायुतीच्या वतीने विजयासाठी जोरदार तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.

## महत्वाचे...



### कक्षसेवक सुभाष साठे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार

**अकलूज, दि. १ जून -**

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अकलूज येथील शासकीय विश्रामगृहात कार्यरत कक्षसेवक सुभाष साठे हे ३१ मे रोजी निवृत्त झाले. यानिमित्त सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सन्मान सोहळा पर पडला. साठे यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, समयसूचकता आणि सेवाभावी वृत्ती यांचा आदर्श ठेवत शासकीय विश्रामगृहातील जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. विविध शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवरांच्या सेवेसाठी त्यांनी सदैव तत्पर राहून आपल्या कामाचा ठसा उमटविला. सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांनी साठे यांच्या कार्याचा गौरव केला. मनोगतातून त्यांच्या कार्यपद्धती, शिस्तप्रियता आणि कर्मनिष्ठेच्या आठवणींना उजाळा दिला. साठे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना साठे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणी सांगत अधिकारी व सहकारी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



### सोलापुरात ५०० जणांचा सामूहिक वाढदिवस सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. १ जून-**

समाजात प्रेम, आपुलकी, बंधुभाव आणि सामाजिक एकात्म ता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला २७५ कुटुंबांतील तब्बल ५०० नागरिकांचा भव्य सामूहिक वाढदिवस सोहळा सोमवारी सोलापुरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी माजी सहाय्यक आयुक्त प्रकाश राठोड यांनी पुढाकार घेतले होते. यावेळी खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, नगरसेवक प्रियदर्शन साठे, समाजसेवक ब्रिजमोहन फोपलिया, सचिन चव्हाण, शैलजा राठोड, वीरभद्र यादवाड, चंद्रकांत दिघे, बसवराज स्वामी उपस्थित होते. १ जून रोजी वाढदिवस असलेल्या नागरिकांचा सामूहिक केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच विविध शासकीय विभागांत सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. चाणक्य गुरुकुल, बसव संगम शेतकरी गट यांच्या विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे समन्वयक काशिनाथ भतगुणकी होते. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, फेटा, शाल आणि रोप देऊन वाढदिवसधारकांचा गौरव करण्यात आला. सिध्दार्थ भडकुंबे यांनी सूत्रसंचालन केले. युसुफ पिरजादे यांनी आभार मानले.

# ‘नो व्हेईकल डे’ला आयुक्तांची पायी वाटचाल

**महापौर कोंड्याल यांच्यासह सर्व पदाधिकारी ई-बाईकवर**

**नागरिकांना दिला प्रदूषणमुक्त जीवनशैलीचा संदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

‘‘नो व्हेईकल डे’’ निमित्त सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण मुक्त शहराचा संदेश देण्यासाठी अनोखा उपक्रम राबविला. त्यांनी आपल्या निवासस्थानापासून थेट म हापालिका कार्यालयापर्यंत चालत जाऊन कार्यालयीन काम काज पार पाडले. विशेष म्हणजे, दिवसभराचे कामकाज संपल्यानंतर त्यांनी पुन्हा पायीच निवासस्थानी परतण्याचा निर्णय घेतला.

इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सोलापूर म हानगरपालिकेने सुरू केलेल्या ‘नो व्हेईकल डे’ उपक्रमाला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळत आहे. उपक्रम ाअंतर्गत तिसऱ्या सोमवारी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते हे ई-बाईकवरून महापालिकेत आले.

वाहनांचा वाढता वापर, वायू प्रदूषण आणि इंधनाचा अपव्यय या पार्श्वभूमीवर डॉ. ओम्बासे यांनी स्वतः कृतीतून नागरिकांसमोर आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे ही काळाची गरज



आहे. शक्य तिथे वाहनांचा वापर टाळून पायी चालणे, सायकलचा वापर करणे यामुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल, असा संदेश त्यांनी दिला. वाढते वायू प्रदूषण, इंधन बचत आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नियमित पायी चालण्याचे महत्त्वही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आयुक्तांच्या या उपक्रम ाची शहरात सकारात्मक चर्चा होत असून, नागरिकांनीही अशा पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी होण्याची अपेक्षा आयुक्तांनी व्यक्त केली आहे.

# महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**शेतकरी, तरुण आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडणार : महेश देशमुख**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. १ जून-**

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था म तदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार महेश देशमुख यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी शेतकरी, तरुण, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची ग्वाही देत ही निवडणूक जनतेच्या हक्कांसाठीची लढाई असल्याचे स्पष्ट केले.

महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा देणारे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना अभिवादन करून महेश देशमुख यांनी आपल्या मनोगताची सुरुवात केली. राज्यातील शेतकरी, बेरोजगार तरुण, विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून विकासाभिमुख आणि जनहिताचे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त




केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यावेळी ओमप्रकाश राजेनिंबाळकर , कैलास पाटील , प्रवीण स्वामी यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यामध्ये काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विश्वास शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जीवनराव गोरे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, धाराशिव जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर, पांडुरंग कुंभार, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, आशाताई भिसे, डॉ. शिवाजीराव जवळगेकर, सचिन बंडापल्ले, खलिफा कुरेशी, अप्पासाहेब शेळके, अमोल कुतवळ, राजाभाऊ शेरखाने, प्रशांत पाटील, खलील सय्यद, अग्निवेश शिंदे, विलास शाळू, अजहर पठाण, आयाज शेख, इस्माईल शेख, शेखर घोडके, बापू शेळके, पंकज भोसले, महेबुब पटेल, विनोद वीर, सर्फराज काझी यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत उम ेदवाराला शुभेच्छा दिल्या. आगामी निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचा पाठिंबा मि ळेल, असा विश्वास महेश देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

### कांदा उत्पादक शेतकरी संघटना तालुकाध्यक्षपदी राजेंद्र चोरमले

**तभा वृत्तसेवा,**
**जेउर,दि. १ जून -**



उमरड ता. करमाळा येथील राजेंद्र महादेव चोरमले यांची महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना करमाळा तालुका युवक अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही निवड संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नाशिक जिल्हाध्यक्ष जयदीप भदाणे यांच्या नेतृत्वात केली आहे. युवा वर्गाला संघटित करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, संघटना विस्ताराला गती देणे आदी जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.

### डी मार्टच्या पार्किंगमधून मोबाईल चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जून-**

येथील डी मार्टच्या पार्किंगमध्ये दुचाकीवर लावलेला २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरुन नेला. याबाबत नागेश रमेश करजगी (रा.भोगडे वस्ती, सोलापूर) यांनी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिस हवालदार उडाणशिव हे पुढील तपास करीत आहेत.

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**भाडेतत्वावर वाहन मिळणेबाबत**

अउदा पॅक विभाग–३, सोलापूर येथे भाडेतत्वावर मारुती इरटिगा / महिंद्रा बोलेरो निओ / मराझो / टोयोटा रुमिओन / किआ कारेन्स किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ३६३ दि. ०१.०६.२०२६ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. ०८.०६.२०२६ संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती **www.mahatransco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
दूरध्वनी क्र. ८८०५९३९९४७

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**पॅक विभाग–३, सोलापूर**

**मध्य रेल्वे**

**जून-२०२६ महिन्यासाठी ई-लिलाव सूचना कार्यक्रम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापक खालील वेळापत्रकानुसार स्क्रॅप (भंगार) विक्रीसाठी जून - २०२६ दरम्यान ई-लिलाव आयोजित करतील. **महत्त्वाची सूचना:** वर्तमानपत्रात ई-लिलाव कार्यक्रमाचे प्रकाशन नजीकच्या भविष्यात बंद केले जाईल. खरेदीदारांना केवळ मध्य रेल्वेच्या वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला दिला जातो: www.ireps.gov.in
लिलाव वेळापत्रक

| लिलाव घेणारे अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | | | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| सिनी डीएमएम/एनजीपी | ०२.०६.२०२६ (मंगळवार) | १०.०६.२०२६ (बुधवार) | २२.०६.२०२६ (सोमवार) | ७२१९६१२७५० |
| सिनी डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपो सह. | ०३.०६.२०२६ (बुधवार) | ११.०६.२०२६ (गुरुवार) | २३.०६.२०२६ (मंगळवार) | ७२१९६११७५१ |
| सिनी डीएमएम/पीए | ०४.०६.२०२६ (गुरुवार) | १५.०६.२०२६ (सोमवार) | २४.०६.२०२६ (बुधवार) | ७२१९६१३७५० |
| सिनी डीएमएम/बीबी | ०५.०६.२०२६ (शुक्रवार) | १६.०६.२०२६ (मंगळवार) | २५.०६.२०२६ (गुरुवार) | ८८२८११९७५० |
| सिनी डीएमएम/एसयूआर | ०८.०६.२०२६ (सोमवार) | १७.०६.२०२६ (बुधवार) | २९.०६.२०२६ (सोमवार) | ७२१९६१४७५० |
| डीवाय,सीएमएम (एस) एचक्यू एसएमएम (जी) सीआरडीकरिता | ०४.०६.२०२६ (गुरुवार) | १५.०६.२०२६ (सोमवार) | २४.०६.२०२६ (बुधवार) | ८८२८११९७५५ |
| डीवाय,सीएमएम (एम) पीआर | ०४.०६.२०२६ (गुरुवार) | १५.०६.२०२६ (सोमवार) | २४.०६.२०२६ (बुधवार) | ८८२८११९७५५ |
| डीवाय,सीएमएम (सीडब्ल्यूई) एमटीएन | ०३.०६.२०२६ (बुधवार) | ११.०६.२०२६ (गुरुवार) | २३.०६.२०२६ (मंगळवार) | ८८२८११९७७० |
| डीवाय,सीएमएम (एस)एचक्यू एएमएम/एचबीएचआर करिता | ०५.०६.२०२६ (शुक्रवार) | १६.०६.२०२६ (मंगळवार) | २५.०६.२०२६ (गुरुवार) | ८८२८११९७५० |
| डीवाय,सीएमएम (एसीएल) बीएसएल | ०८.०६.२०२६ (सोमवार) | १७.०६.२०२६ (बुधवार) | २९.०६.२०२६ (सोमवार) | ७२१९६११७५ |

**महत्त्वाच्या नोंदी :** पूरक लिलाव आवश्यकतेनुसार पात्र लॉट्ससाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पूरक लिलाव आयोजित केला जाईल. कोणताही पूरक लिलाव स्वतःच्या विवेकबुद्धीने रद्द करण्याचा अधिकार रेल्वे प्रशासनाकडे राखीव आहे. अ) अधिकारांविषयी: ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवत आहे. रेल्वे कोणत्याही पुढील लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणताही लॉट योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार देखील राखून ठेवत आहे. तसेच कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट्स मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या पुढील लिलावात विकले जाऊ शकतात.

ब) पर्यावरण धोरण: सरकारी धोरणानुसार, जेथे स्क्रॅप साहित्याच्या पुनर्वापरामध्ये पर्यावरण आणि प्रदूषणाचे मुद्दे समाविष्ट आहेत, असे लॉट्स केवळ केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ / राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांनाच विकले जातील.

क) कॅटलॉग: ई-लिलाव कॅटलॉग www.ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल.ड) मदत व संपर्क: ई-लिलाव, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत काही मदत हवी असल्यास, कृपया वरील संबंधित लिलाव आयोजित करणाऱ्या अधिकाऱ्यांशी किंवा संपर्क साधा. मोबाईल नंबर: ८८२८११०७६१ ई-मेल dycmm.s.cstm@gmail.com किंवा dycmms@cr.railnet.gov.in

२०९

**रेल्वे लाईनजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे**

**Format C-7**
(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.
(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party** : **Bharatiya Janata Party**
***Name of the Election** : **Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**
**Name of State/UT** : **Maharashtra**
**(1) Name of the Constituency** : **Solapur Local Authorities Constituency**
**Name of the candidate** : **RAJENDRA VITTHAL RAUT**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | Nil |
| | b. | Case no. | Nil |
| | c. | Name of the Court | Nil |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | Nil |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **RAJENDRA VITTHAL RAUT** is very Senior Party Worker & also Ex. MLA. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : Solapur Local Authorities Constituency**
**Name of the candidate : RAJENDRA VITTHAL RAUT** ................................................ and so on
* In the case of election to Council of States or States or election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

**Date : 01/06/2026**
**Place : Mumbai**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा आजपासून सोलापुरात





## नेहरूनगर शासकीय मैदानावर चार दिवस स्पर्धा रंगणार

## राज्यातील २४ जिल्ह्यातील कुमार व मुलींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**
**(स्व.अजितदादा पवार क्रीडा नगरीतून)**

कुमार व मुली गटाच्या ५२व्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा २ ते ५ जून दरम्यान येथील विजापूर रोडवरील नेहरू नगर शासकीय मैदानावर रंगणार आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि सोलापूर ॲम्युचर्स खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेस मंगळवारी (दि. २) सकाळी साडेसहापासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी सात वाजता माजी आमदार दिलीप माने, महाराष्ट्र खोखो असोसिएशनचे उपाध्यक्ष महेश गादेकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव खजिनदार गोविंद शर्मा आणि जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

### स्पर्धेची भाग्यपत्रिका

**कुमार :** अ गटः धाराशिव, छ. संभाजीनगर, नंदुरबार.ब गटः सोलापूर, धुळे, परभणी. क गटः सांगली, जालना, लातूर. ड गटः पुणे, पालघर, नांदेड. इ गटः सातारा, रत्नागिरी, हिंगोली. फ गटः मुंबई उपनगर, नाशिक, रायगड. ग गटः ठाणे, बीड, सिंधुदुर्ग. ह गटः मुंबई, अहिल्यानगर, जळगाव.

**मुली :** अ गटः सांगली, नंदुरबार, जळगाव. ब गटः ठाणे, परभणी, लातूर. क गटः धाराशिव, मुंबई उपनगर, छ. संभाजीनगर. ड गटः सोलापूर, पालघर, बीड. इ गटः नाशिक, अहिल्यानगर, सिंधुदुर्ग. फ गटः पुणे, जालना, नांदेड. ग गटः सातारा, मुंबई, हिंगोली. ह गटः रत्नागिरी, धुळे, रायगड.

सोलापूर जिल्हा मुलींच्या कर्णधारपदी वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाच्या प्राजक्ता बनसोडे व कुमार संघाच्या कर्णधारपदी सिद्धार्थ माने देशमुख यांची निवड सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केली. या संघास असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

कुमार संघाचे शिबिर जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर झाले. या शिबिराचा समारोप प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या हस्ते झाला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, अजित शिंदे, पुंडलिक कलखांबकर, अर्जुन पवार आदी उपस्थित होते. दोन्ही संघाचे कीट कै स्वातंत्र्य सैनिक बाबुराव तुळजाराम जाधव याच्या स्मरणार्थ विठ्ठल बाबुराव जाधव यांनी पुरस्कृत केले आहेत.

मुली संघाचे सराव शिबिर वसंतराव काळे प्रशाला, वाडीकुरोली येथे यशस्वीरित्या पार पडले. याचा समारोप श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कल्याणराव काळे, सचिव बाळासाहेब काळे , प्राचार्य कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

### सिध्दार्थ माने-देशमुख, प्राजक्ता बनसोडे सोलापूरचे कर्णधार

**जिल्हा संघ :** कुमार : चव्हाण अथर्व उमेश, कौलागे सकार रामचंद्र, अधिक रोहन बिभिशन, पठाण मोहंमद माझ महिबूब, संतोषसाठी जमीन, जाधव समर्थ अशोक, अतार सुहान सलीम,राऊत नामदेव राजेंद्र, माने देशमुख सिद्धार्थ अनिल, शेख अकबर दवाल, रजपूत ओंकार मोहन,पवार संदेश किसान, जावळेकर अर्जुन परमेश्वर, उपासे श्री विनायक, गवळी अभय सुनील, प्रशिक्षक : पवार गणेश, व्यवस्थापक : अनिकेत जाधव.



सिध्दार्थ



प्राजक्ता

**मुली :** मांडवे अश्विनी गोविंद, सुरवसे ऋतुजा मारुती, मांडले अन्वई लक्ष्मण, लामकाने स्नेहा अनिल, बनसोडे प्राजक्ता सोमनाथ, यलमार श्रेया मनोहर, सुरवसे समृद्धी पांडुरंग, पासले ऋतुजा रामेश्वर, स्वामी मयुरी सिद्रामय्या, मुलाणी आलिया महिबूब, लामकाने कल्याणी सुनील, यलमार कार्तिकी मारुती,गंगोदा अक्षता सनमुकप्पा, नागलगाव पवित्रा इराप्पा, पवार ख़ुशी गणेश, प्रशिक्षक : अतुल जाधव, व्यवस्थापक : केत सोनाली.

---

# ईगल्स व रायडर्स संघांचे थरारक विजय

### एनजीसीए इंटरक्लब क्रिकेट स्पर्धा

### ऋग्वेद पाटील आणि अथर्व हलकुरकी सामन्याचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

येथील डोणगाव रस्त्यावरील पुष्प जिमखाना मैदानावर सुरू असलेल्या 'निलेश गायकवाड अकॅडमी इंटर क्लब क्रिकेट टूर्नामेंट'मध्ये ईगल्स'ने लॉयन्स'वर ७ धावांनी निसटता विजय मिळवला, तर 'रायडर्स'ने 'एमबी चॅलेंजर्स'चा ९५ धावांनी धुव्वा उडवला.

पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना 'ईगल्स'चा डाव २३.४ षटकांत सर्वबाद १५९ धावांवर आटोपला. यामध्ये श्रवण म्हेत्रे आणि ऋग्वेद पाटील (४७ ) यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. त्यांना अनुज मुंदडा (२२) आणि पृथ्वीराज खोडवे (नाबाद १२) यांनी सुरेख साथ दिली. 'लॉयन्स'कडून सुरज थोरातने १७ धावांत ३ बळी घेत ईगल्सच्या धावसंख्येला ब्रेक लावला. आर्यन भूमकर आणि गणेश पवार यांनी प्रत्येकी दोन, तर सार्थक कन्नाने १ बळी घेतला.

१६० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना 'लॉयन्स'चा संघ विजयाच्या उंबरठ्यावर असताना २४.२ षटकांत १५२ धावांवर सर्वबाद झाला. सुजल गायकवाड (३७), हर्ष राऊत (३४) आणि सार्थक कन्ना (३०) यांनी खिंड लढवली, मात्र इतर फलंदाज अपयशी ठरले. ईगल्सच्या आर्यन हंगेने २१ धावांत ३ बळी आणि गौरव गाडेकरने ९ धावांत २ बळी घेत सामन्याचा पासा पलटवला. सोहम कुलकर्णी, अनुज वाल्मिकी, ऋग्वेद पाटील व चेतन मांडूलो यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. एनजीसीए ईगल्सने हा सामना ७ धावांनी जिंकला. सामनावीर ऋग्वेद पाटील, उत्कृष्ट फलंदाज श्रवण म्हेत्रे व उत्कृष्ट गोलंदाज सुरज थोरात ठरला.

दुपारच्या सत्रात प्रथम फलंदाजी करताना रायडर्सने निर्धारित २० षटकांत ५ बाद १६४ धावांचा मजबूत धावसंख्या उभारली. अनिष बिरोळीने ३६ धावा, व्यंकटेश घाडगेने २२ धावा आणि पूर्णचंद्रने १८ धावांचे योगदान दिले. एमबी चॅलेंजर्सकडून अभिषेक खोबरेने २ बळी, तर सिद्धार्थ कुंसी, वाहक मोमीन व फारुख यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.





१६५ धावांचा पाठलाग करताना 'एमबी चॅलेंजर्स'चा डाव रायडर्सच्या भेदक माऱ्यापुढे अवघ्या ६९ धावांवर कोसळला. चॅलेंजर्सकडून केवळ तनुष नाईक (१०) काहीसा प्रतिकार करू शकले. रायडर्सच्या अथर्व हलकुरकीने ११ धावांत ३ बळी आणि अभिराज कापसेने २० धावांत ३ बळी घेतले. स्वप्नील चव्हाण, शिवम घोरपडे व संस्कार घोरपडे यांनी प्रत्येकी १ बळी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. एनजीसीए रायडर्सने ९५ धावांनी विजय नोंदवला. सामनावीर अथर्व हलकुरकी, फलंदाज अनिष बिरोळी व गोलंदाज अभिराज कापसे ठरला.

---

# साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू व कंपली प्रकाश अकॅडमीचे शानदार विजय

### रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट

### संकीर्ण पाटील, सुरज गायकवाड सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

येथे सुरू असलेल्या मानाच्या ७९ व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने टाईम्स इलेव्हन वर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळवला, तर सकाळच्या सत्रातील पहिल्या सामन्यात कंपली प्रकाश क्रिकेट अकॅडमीने हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लबचा ३१ धावांनी पराभव केला.

दुपारच्या सामन्यात टाईम्स ११ ए संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ६ बाद ११३ धावा केल्या. यात राजकिरण वडणाल (३० धावा), आयुब पट्टेवाले (१८ धावा), हाजी तांबोळी (१४ धावा) आणि सुधांशू भालेराव (१२ धावा) यांनी योगदान दिले. साऊथ सोलापूर आपटे ब्लूकडून गोलंदाजीत अतुल चौधरी (१२ धावांत २ बळी), नारायण डोके (२० धावांत २ बळी), संकेत काकणकी (२६ धावांत २ बळी) आणि बाळकृष्ण काशीद (२१ धावांत १ बळी) यांनी अचूक मारा केला.

११४ धावांचे लक्ष्य साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने अवघ्या १४ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात ११९ धावा करत सहज गाठले. सलामीवीर संकीर्ण पाटीलने ६५ धावांची नाबाद मॅचविनिंग खेळी केली, तर निरंजन कदमने ४० धावांचे योगदान दिले. टाईम्स ११ कडून हाजी तांबोळीने २१ धावांत २ आणि मकरंद बसवंतीने १५ धावांत १ बळी घेतला. नाबाद ६५ धावा करणाऱ्या संकीर्ण पाटीलला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. वरिष्ठ खेळाडू अतुल बांदिवडेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी लियाकत शेख उपस्थित होते. या सामन्यात सुरज गायकवाड व महेश सोनवणे यांनी पंच म्हणून, तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

पहिल्या सामन्यात हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना कंपली प्रकाश क्रिकेट अकॅडमीने २० षटकांत ८ बाद १२४ धावा केल्या. यामध्ये यश मंगरूळे (२२), समर्थ वाघ (१९), आदित्य बंडगर (१७) आणि गौरी प्रसाद स्वामी (नाबाद १४ ) यांनी महत्वपूर्ण खेळी केली. हैदराबाद कर्नाटककडून महेशने २३ धावांत ३ बळी घेतले, तर सिद्धार्थ कुलकर्णी व श्रीकांत राठोड यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.





### उद्याचे सामने

**सकाळी :** मॉडेल क्रिकेट अकॅडमी विरुद्ध एस एस आय क्लब.
**दुपारी :** ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लब (कलुबुर्गी) विरुद्ध मारिया क्रिकेट क्लब (ठाणे).

१२५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबाद कर्नाटका क्रिकेट क्लबचा डाव २० षटकांत अवघ्या १०३ धावांवर संपुष्टात आला. त्यांच्याकडून श्रीकांत राठोड (१८ धावा), सिद्धार्थ कुलकर्णी (१६ धावा) आणि आयुष (१० धावा) यांनाच दुहेरी धावसंख्या गाठता आली. कंपली प्रकाश अकॅडमीच्या सुरज गायकवाडने २१ धावांत ३ बळी घेत हैदराबादच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याला सनी पोळ, श्रेयस सुरवसे आणि गौरीप्रसाद स्वामी यांनी प्रत्येकी १ बळी घेत उत्तम साथ दिली. ३ बळी घेणाऱ्या सुरज गायकवाडला सामनावीर घोषित करण्यात आले. वरिष्ठ खेळाडू वासुदेव दोरणार यांच्या हस्ते त्याला पुरस्कृत करण्यात आले. याप्रसंगी विक्रांत पवार, अंबादास तोरा, रंगनाथ कुलकर्णी उपस्थित होते. या सामन्यात चिराग शहा व सोहेल शेख यांनी पंच म्हणून जबाबदारी सांभाळली.

स्पर्धेतील सर्व सामनावीर पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून पुरस्कृत करण्यात आले आहेत.

---

# मिशन खेलो इंडिया

# सोलापूर विद्यापीठाचा खेळाडूंसाठी 'स्पेशल प्लॅन'

### विविध तज्ज्ञ प्रशिक्षकांची आज बैठक

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि.१ जून-**

'मिशन खेलो इंडिया'च्या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने खेळाडूंसाठी 'स्पेशल प्लॅन'चे नियोजन करण्यात आले आहे. याबाबत मंगळवार, दि.२ जून रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद कक्ष येथे बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ.अतुल लकडे 'दैनिक तरुण भारत'शी बोलताना दिली.

अखिल भारतीय विद्यापीठ संघमार्फत आयोजित वेस्ट झोन, साऊथ वेस्ट झोन, ऑल इंडिया, खेलो इंडिया अशा विविध




आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये सोलापूर विद्यापीठातील खेळांचे संघ सहभागी होत असतात. विद्यापीठ संघांसोबत उत्कृष्ट संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक पाठविण्यासंदर्भात क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आंतरविद्यापीठ संघ प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, विशेष प्रशिक्षण शिबीर यासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या संघात असणाऱ्या खेळाडूंना विशेष कौशल्य आत्मसात करता यावे आणि त्यांच्या खेळाचा दर्जा उंचावावा या उद्देशाने विशेष प्रशिक्षण शिबिरे राबविण्यात येणार आहेत. या महत्त्वपूर्ण उपक्रमात तज्ज्ञांचे सहकार्य व नियोजन निश्चित करण्यासाठी या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. यासाठी सोलापुरातील विविध क्रीडा क्षेत्रातील २२ प्रमुख मार्गदर्शकांना आमंत्रित करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

### या तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकांना निमंत्रण

भारती लिंगडे, सुर्याजी लिंगडे, दीपक चिकने, सचिन ढवण, उदय वगरे, अक्षय माने, जरार कुरेशी, धनाजी खरात, मिहीर जाधव, सुवर्णा कांबळे, सत्येन जाधव, सदानंद गुजले, सागर शिरसीकर, अस्मिता घोलप, अविनाश गोसावी, श्रीकांत शेटे, झेड.एम.पुणेकर, अनिल गिराम, नीलेश वरवडकर, तृप्ती अवताडे, भैरवनाथ आर्किले, हावळे.

### खेळाडूंची कामगिरी उंचावण्यास मदत



विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे आगामी काळातील आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये सोलापूर विद्यापीठाच्या खेळाडूंची कामगिरी अधिक उंचावण्यास मदत होणार आहे. सोलापूर विद्यापीठाने प्रथमच शारीरिक शिक्षण संचालकाव्यतिरिक्त सोलापुरातील तज्ज्ञ प्रशिक्षकांना संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.

**-सत्येन जाधव,** खो-खो व कबड्डी एनआयएस प्रशिक्षक

---

# 'मॉडेल'चा नॅशनल अकॅडमीवर दणदणीत विजय

### विजय ट्रॉफी क्रिकेट : सुधान्वू मनूरचा अष्टपैलू खेळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या 'विजय ट्रॉफी २०२६' सुपर नॉकआउट क्रिकेट स्पर्धेत सुधान्वू मनूरच्या अष्टपैलू खेळामुळे मॉडेल क्रिकेट अकॅडमी 'अ' संघाने नॅशनल क्रिकेट अकॅडमीचा २४३ धावांनी पराभव करत एकतर्फी विजय मिळवला.



मॉडेलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना चौफेर फटकेबाजी करत ३८.३ षटकांत सर्वबाद ३६७ धावांचा विशाल डोंगर उभा केला. सलामीवीर मारुती कांबळे याने अवघ्या ५० चेंडूंत १५ चौकार व १ षटकारासह ८५ धावांची वादळी खेळी केली. त्याला सुदेश राठोड (३१ चेंडूंत ६३ धावा) आणि सुधान्वू मनुर (३५ चेंडूंत ५३ धावा) यांनी अर्धशतकी योगदान देत मोलाची साथ दिली. ३६८ धावांच्या डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना नॅशनल क्रिकेट अकॅडमीचा डाव मॉडेलच्या अचूक माऱ्यापुढे पत्त्यांसारखा कोसळला. नॅशनल अकॅडमीचा पूर्ण डाव ३२.३ षटकांत अवघ्या १२४ धावांवर आटोपला. मॉडेल अकॅडमीचा कर्णधार अक्षय हावळे याने घातक गोलंदाजीचे प्रदर्शन करत २.३ षटकांत अवघ्या ४ धावा देऊन ३ बळी घेतले. त्याला यश बोरामणी आणि सुधान्वू मनुर यांनी प्रत्येकी २ बळी घेत उत्तम साथ दिली. पंच म्हणून अशोक डोंबाळे, शुभम मुत्तूर तर गुणलेखक म्हणून अनिल सलगर यांनी काम पाहिले.

---

## महत्त्वाचे

### मोदींकडून पदक विजेत्या भारतीय खेळाडूंचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी, हाँगकाँग येथे नुकत्याच पार पडलेल्या २२ व्या आशियाई २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेतील भारतीय संघाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.



भारताने या स्पर्धेत १० सुवर्णपदकांसह एकूण १९ पदके जिंकलीत. या स्पर्धेतील सर्वात लक्षवेधी कामगिरी उंच उडी प्रकारातील खेळाडू पूजा हिने केली; तिने १.९३ मीटरची उडी घेत, दोन दशकांपासून अबाधित असलेला राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. २२ व्या आशियाई २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत १० सुवर्णपदकांसह एकूण १९ पदके जिंकल्याबद्दल भारतीय संघाचे मनःपूर्वक अभिनंदन. ही उत्कृष्ट कामगिरी भारतातील युवा खेळाडूंचा दृढनिश्चय आणि त्यांचे नैपुण्य अधोरेखित करते. येत्या काळात आणखी अनेक तरुण भारतीयांना क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी या यशातून प्रेरणा मिळो, असे पंतप्रधान मोदी यांनी एक्स या समाज माध्यमावर लिहिले.

### ... तर सामना रंजक ठरला असता : गिल

**अहमदाबाद :** डावाच्या प्रारंभीच आमचे गदी बाद झाल्यामुळे आमच्या संघाला सामन्यात कोणतीही गती पकडता आली नाही,



जर आम्ही दोनशेच्या जवळपास धावांचे एकूण आव्हान उभारले असते, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध कडवी झुंज देण्याची संधी मिळाली असती, असे गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल म्हणाला.

रविवारी येथे आयपीएलच्या अंतिम सामन्यात दोन षटके शिल्लक असतानाच आरसीबीने गुजरातचा पराभव केला. कर्णधार गिल, साई सुदर्शन व जोस बटलर या अव्वल तीन फलंदाजांना २० धावांचा टप्पाही गाठता आला नाही. तसेच, मधल्या फळीतील फलंदाजीमध्ये गुणवत्तेचा अभाव स्पष्टपणे दिसून आला, त्यामुळे गुजरात टायटन्सला ८ गडी गमावून केवळ १५५ धावाच करता आल्या. विराट कोहलीने केलेल्या नाबाद ७५ धावांच्या खेळीमुळेच आरसीबीचा विजय केवळ १८ षटकांतच निश्चित झाला.

### आयसीसीकडून क्रिकेट कॅनडाचे सदस्यत्व निलंबित

**दुबई :** जागतिक नियामक संस्थेच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने क्रिकेट कॅनडाची चौकशी सुरू केल्यानंतर काही आठवड्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) राष्ट्रीय मंडळाच्या सदस्यत्वाच्या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्याबद्दल कॅनडाचे सदस्यत्व निलंबित केले आहे. कॅनडाचा राष्ट्रीय संघ आयसीसीच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकेल आणि संघांच्या कामकाजासाठी लागणारा निधी एका नियंत्रित यंत्रणेद्वारे पुरविला जाईल, असे आयसीसीने सोमवारी सांगितले.

### भारताचा कोरियावर दणदणीत विजय

**काकामिगाहारा :** जपानमधील काकामिगाहारा येथे सुरू असलेल्या १८ वर्षांखालील पुरुष आशिया चषक हॉकी स्पर्धेत सोमवारी गट अ मधील आपल्या तिसऱ्या सामन्यात, कर्णधार केतन कुशवाहने दोन गोल करत भारतीय पुरुष हॉकी संघाला कोरियाविरुद्ध ४-१ असा दणदणीत विजय मिळवून दिला. या विजयामुळे भारतीय संघाच्या उपांत्य फेरीत पोहोचण्याच्या आशा बळावल्या आहेत. या विजयासह गट अ मध्ये भारत, कोरिया आणि जपान यांचे गुण समान झाले आहेत. दोन्ही गटांमधून अव्वल स्थानी राहणारे प्रत्येकी दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. भारताच्या १८ वर्षांखालील हॉकी संघाने कोरियाविरुद्ध वर्चस्वपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. कर्णधार केतन कुशवाहने दोन गोल करीत भारताच्या आक्रमणाचे नेतृत्व केले. कुशवाह व वरिंदर सिंगने सामन्याच्या सुरुवातीलाच केलेल्या गोलमुळे भारताच्या विजयाचा पाया रचला गेला. गोलरक्षक आयुष रजकने काही अत्यंत महत्त्वाचे बचाव करीत भारताची आघाडी कायम राखण्यात मोलाची मदत केली. कुशवाहने सामन्याच्या तिसऱ्या आणि ३६व्या मिनिटाला गोल केले, तर वरिंदर सिंग (५वे मिनिट) व शाहरुख अली (५४वे मिनिट) हे भारताचे इतर गोलवीर ठरले. कोरियाचा कर्णधार युन जेह्योक (२१वे मिनिट) याने आपल्या संघाचा एकमेव गोल केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

# स्मार्ट महापालिकेचे कामकाज पुन्हा भोंग्यावर सुरु

### महापौर विनायक कोंड्याल यांच्या आदेशानुसार कार्यवाही


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

शहराचा कारभार पहाणाऱ्या स्मार्ट महापालिकेचे कामकाज सोमवारपासून पुन्हा भोंग्यावर सुरू झाले आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या आदेशानुसार कार्यालयीन वेळेत चार वेळा हा भोंगा वाजविण्यात येत आहे. वेळेत भोंगा वाजविण्याची जबाबदारी महापालिका कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी कार्यालयाकडे आहे.

सोलापूर महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना कार्यालयीन वेळेची माहिती होण्यासाठी तसेच वेळेचे महत्व जाणण्याकरिता भोंगा सुरू करण्यासंदर्भात महापौर विनायक कोंड्याल यांनी आदेश दिले होते. याबाबत कार्यवाही करण्याची लेखी सूचना महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी मनपा विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी यांना दिले. त्यानंतर कौन्सिल हॉल सभागृहाखालील कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालयात या भोंग्याची यंत्रणा बसविण्यात आली. सोमवारी एक जून पासून पुन्हा हा भोंगा सुरू करण्यात आला. नियमित वेळेत बटन दाबून हा भोंगा वाजवण्याची जबाबदारी महापालिका कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी कार्यालयाकडील कर्मचारी अब्दुल रहेमान पटेल हे सांभाळत आहेत. महापालिकेच्या संपूर्ण आवारात हा आवाज घुमतो. या भोंग्याच्या वेळेवरच महापालिका कर्मचारी, अधिकारी कार्यरत असल्याचे दिसून येते.

**अशा आहेत भोंग्याच्या वेळा**

कार्यालयीन वेळ सुरू झाल्याचा पहिला भोंगा सकाळी ९.४५ वाजता वाजतो. जेवण सुट्टी सुरू झाल्यासाठी दुपारी १.३० वाजता, जेवणाची सुट्टी संपल्या करिता पुन्हा दुपारी २ वाजता आणि कार्यालयीन वेळ संपल्या करिता चौथा भोंगा संध्याकाळी ६.१५ वाजता शेवटचा भोंगा वाजविण्यात येणार आहे.





## सांगोला महाविद्यालयात तिघांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार

**सांगोला, दि. १ जून-**

सांगोला महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. बबन गायकवाड, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. तानाजी माने व वरिष्ठ लिपीक प्रकाश पैलवान यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे थोर साहित्यिक प्रा.डॉ.राजेंद्र दास, कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य विश्वनाथ चव्हाण, म.सि.झिरपे, रावसाहेब ताठे, शामराव लांडगे, सुरेश फुले, चंद्रशेखर अंकलगी, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले उपस्थित होते. याप्रसंगी संपादक डॉ.दत्ता सरगर लिखित साधेपणातील मोठेपण-प्रा.डॉ.बबन गायकवाड सेवापूर्ती गौरव अंक व दुष्काळातून वाटचाल एका स्वप्नाची-डॉ.तानाजी माने आत्म कथन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. रामचंद्र पवार, प्र.अधिक्षक विलास माने, डॉ.बबन गायकवाड, डॉ. तानाजी माने व प्रकाश पैलवान यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. सुरेश भोसले, सूत्रसंचालन प्रा. संतोष कांबळे यांनी केले. आभार डॉ. रमेश बुगड यांनी मानले.

# माणकी आरोग्य केंद्रात ७२ रुग्णांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

माळिशरस तालुक्यातील माणकी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सोमवारी कॅन्सर जनजागृती व तपासणीसाठी विशेष कॅन्सर व्हॅन शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतीश कोपूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. याशिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष माने-देशमुख व डॉ. ऋषिकेश शिंगाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. शिबिरादरम्यान नागरिकांची विविध प्रकारच्या कॅन्सर विषयक लक्षणांसाठी तपासणी करण्यात आली. तसेच कॅन्सरच्या सुरुवातीच्या लक्षणांची ओळख, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि वेळेत निदानाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचे लवकर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.



**तपासणी ७२ रुग्णांची तपासणी**

कॅन्सर तपासणी ३१ पुरुष आणि ४१ स्त्री रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्याम ध्ये तोंडाचा कॅन्सर असलेले रुग्णांचे संख्या आढळून आले नाही. ४१ महिलांची स्तनाचा कॅन्सर तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एक महिला संशयित आढळून आली आहे. तर गर्भाशय मुखाच्या कॅन्सर तपासणीत एक संशयित महिला आढळून आली आहे. त्यांच्या पुढील उपचाराच्या संबंधी उपाययोजनात्मक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि कॅन्सरचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**- डॉ. सतीश कोपूरवाड,** जिल्हा आरोग्य अधिकारी

## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी हयात दाखले व दिव्यांग प्रमाणपत्र जमा करा : तहसीलदार भागवत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जून-**

सांगोला तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेअंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी यांनी दरवर्षी १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत हयात असलेबाबत हयात दाखले जमा करणे आवश्यक आहे. परंतु ब-याच लाभार्थी यांनी हयात दाखले जमा केलेले नाहीत. मुदतीत दाखले जमा न केल्यास अनुदान बंद होऊ शकते, तरी हयात दाखले जमा करावेत, असे आवाहन सांगोला तहसीलदार बाळू भागवत यांनी केले आहे.

दिव्यांग लाभार्थी यांना अनुदान मिळवणेसाठी युडीआयडी बंधनकारक करणेत आलेले आहे. ज्या लाभार्थ्यांकडे युडीआयडी कार्ड नाही त्यांनी ३० सप्टेंबर पुर्वी प्राप्त करुन घेऊन तहसील कार्यालयात जमा करावेत. ज्या लाभार्थी यांचे युडीआयडी कार्ड व आधार कार्ड वरील जन्म तारखेत तफावत आढळुन आली आहे अशा लाभार्थ्यांच्या याद्या ग्राम महसुल अधिकारी कार्यालयात प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. तरी सदर यादीत नाव असलेल्या लाभार्थी यांनी तहसील कार्यालयात येऊन व्हेरिफिकेशन करुन घ्यावे. तसेच ज्या लाभार्थी यांचे आधार बँक खात्यास लिंक नाही त्यांनी आधार लिंक करुन घ्यावे असे आवाहन तहसिलदार बाळू भागवत यांनी केले आहे.



## शेळगाव आर येथे कृषीकन्यांकडून तंबाखूविरोधी जनजागृती

**वैराग, दि. १ जून-**

ग्रामीण भागात व्यसनमुक्ती आणि आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी स्तुत्य पाऊल उचलले आहे. महाविद्यालयाच्या ग्रामीण कृषि कार्यानुभव ('रावे') कार्यक्रमांतर्गत शेळगाव आर (ता. उत्तर सोलापूर) येथे तंबाखूविरोधी जनजागृती अभियान राबविले. कृषी कन्यांनी ग्रामस्थांना तंबाखू सेवनाचे भयंकर दुष्परिणाम समजावून सांगत तंबाखूमुक्त समाजाची साद घातली.कृषी कन्या भक्ती काटकर, श्रद्धा रणदिवे, प्रियंका वळसे, ऐश्वर्या लिगाडे आणि शरयू जाधव यांनी या अभियानात सहभाग घेतला. केवळ दुष्परिणाम न सांगता, तंबाखूचे व्यसन सोडल्यास शरीरात होणारे सकारात्मक बदल, आर्थिक बचत आणि कुटुंबियांना सुखद आयुष्य यावरही कृषी कन्यांनी प्रकाश टाकला. उपक्रमाला लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, रावे सम न्वयक प्रा. स्वप्निल कदम तसेच रावे इन्चार्ज प्रा. स्मिता धायगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता ग्रामीण भागात अशा प्रकारे प्रभावी जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# देऋब्रातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे दहावी व बारावी परिक्षेत ८० टक्क्यापेक्षा अधिक गुण मिळवलेल्या ब्राह्मण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच पहिली ते दहावी व महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या संस्था सभासदांच्या गरीब व होतकरू पाल्यांना शैक्षणिक साहित्य तसेच अर्थसहाय्याचे वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी संस्थेकडून १० जूनपर्यंत गुणपत्रिकेसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

ब्राह्मण समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी दहावी व बारावीच्या परिक्षेत ८० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत त्यांनी गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतीसह अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पहिली ते दहावीच्या वर्गात तसेच महाविद्यालयात शिकत असलेल्या संस्था सभासदांच्या गरीब व होतकरू पाल्यांनी शैक्षणिक साहित्य तसेच अर्थसहाय्यासाठी योग्य त्या कागदपत्रासह १० जूनपर्यंत संस्था कार्यालयात अर्ज करावेत असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर व कार्यवाह श्याम जोशी यांनी केले आहे. गुणवत्तेनुसार व्यावसायिक उच्च शिक्षण (अभियांत्रिकी डिप्लोमा व पदवी, वैद्यकीय) घेणाऱ्या काही विद्यार्थ्यांना ठोंबरे व काकडे शिष्यवृत्तीही देण्यात येणार आहे. त्यासाठीही स्वतंत्र अर्ज करावा असेही आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांनी आपले अर्ज देऋब्रा शिक्षणोत्तेजक संस्था, समर्थ रामदास संकुल, दत्त चौक या संस्था कार्यालयात सकाळी १० ते १२ व सायंकाळी ५ ते ८ या वेळेत जमा करावेत. अधिक माहितीसाठी ८८८८७४८६४७ व ९७६५५६६८८५ यावर संपर्क साधावा.

# आषाढी यात्रेसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

### औषध खरेदीसाठी निवडणूक आयोगाकडे परवानगीचा प्रस्ताव

### वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य

### मोबाईल टॉयलेट, मसाजर आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा वाढविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जून-**

आषाढी यात्रेसाठी लाखो वारकरी पंढरपूरकडे प्रस्थान करणार असताना त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. सध्या राज्यात विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असली तरी यात्रेदरम्यान आवश्यक असणाऱ्या औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध राहावा यासाठी निवडणूक आयोगाकडे विशेष परवानगी मागण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान पालखी मार्गावर आणि मुक्काम स्थळी वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने नियोजनाला वेग दिला आहे. गेल्या वर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समन्वयातून यात्रा यशस्वीपणे पार पडली होती. यंदाही त्याच धर्तीवर अधिक सक्षम आरोग्य व्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. यात्रेच्या काळात स्वच्छता, निवारा आणि आरोग्य सेवांवर विशेष भर देण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी मोबाईल टॉयलेटची संख्या वाढविण्यात येत असून, पालखीबरोबर चालत येणाऱ्या भाविकांना शारीरिक थकवा दूर करण्यासाठी मसाजर यंत्रणाही अधिक प्रमणात उपलब्ध करून दिली जाणार आहे.



तसेच पालखी मार्गावर कार्डियाक ॲम्बुलन्ससह विविध प्रकारच्या आरोग्य सेवा, वैद्यकीय पथके आणि औषधोपचाराची सुविधा उपलब्ध राहणार आहे. या अनुषंगाने आवश्यक औषध खरेदीसाठी आरोग्य विभागाने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र निवडणूक आचारसंहितेमुळे औषध खरेदीसाठी निवडणूक आयोगाची परवानगी आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. दरम्यान, औषध खरेदीच्या प्रक्रियेत झालेल्या विलंबाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या असून याप्रकरणाची चौकशी करण्यात येणार असल्याचेही केदार यांनी स्पष्ट केले. आरोग्य विभागाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी अनुभवी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. याशिवाय जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांसह पालखी मार्गाचा प्रत्यक्ष दौरा करून आरोग्य केंद्रांतील सुविधा, मनुष्यबळ आणि उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेतला जाणार आहे. वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले.

## एमआयडीसी भागात २० वर्षीय तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १ जून-**

अज्ञात कारणावरून एका वीस वर्षीय तरुणाने घरातील लाकडीवाशाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना एमआयडीसी भागातील नितीन नगरात रविवारी संध्याकाळी साडेसात वाजता उघडकीस आली.चांद अब्दुल अजीज शेख ( वय २० वर्ष , राहणार नितीन नगर , एमआयडीसी सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. मयत चांद शेख हा मजुरीने काम करायचा . रविवारी त्याच्या घरातील लोक कामावर गेले होते आणि तो घरात एकटाच असताना त्यांनी स्वतःला गळफास लावून घेतला . ही घटना संध्याकाळी साडेसात वाजता उघडकीस आली.ही माहिती समजताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे हवालदार डी के डोके यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरून येथील शासकीय रुग्णालयात रात्री पावणे नऊ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत चांद शेख हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई, दोन बहीणी, एक भाऊ असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# आसरा रेल्वे पुलाखाली बंकलगीच्या तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

अज्ञात कारणावरून एका ३४ वर्षीय तरुणाने रेल्वेखाली आत्म हत्या केल्याची घटना आसरा रेल्वे पुलाखाली आज सोमवारी दुपारी एक वाजता उघडकीस आली.

अविनाश सिद्रामप्पा कुंभार (वय ३४ वर्ष, रा. बंकलगी, दक्षिण सोलापूर) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. आज सोमवारी सकाळी तो आईला सोलापूर कडे जाऊन येतो असे सांगून घरातून बाहेर पडला होता. त्यानंतर त्याने आसरा पुलाखाली एका रेल्वे खाली आत्महत्या केली. ही घटना दुपारी एक वाजता घडली. माहिती समजताच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे हवलदार जी.एस. मणुरे यांनी व सिविल हॉस्पिटलचे रुग्णसेवक लादेन यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळी अविनाश कुंभार याच्या मृतदेहाचे दोन तुकडे विभागून पडले होते. मृतदेहाजवळच मोबाईल पडला होता. लादेन यांनी त्याच मोबाईल मधून मृतदेहाचे व्हिडिओ शूट केले आणि ते व्हिडिओ मृताच्या ओळखीसाठी त्याच्याच मोबाईल मधील व्हाट्सअप क्रमांकावर सेंड केला .त्यानंतर सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी अडीच वाजता दाखल केला.

दरम्यान सदरचा व्हिडिओ पाहून मृताच्या एका चुलत भावाने मयताच्या सख्ख्या भावाला ही माहिती दिली. त्यानंतर नातेवाईक हे खातरजमा करण्यासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आले तेव्हा मृताची ओळख पटली गेली.

अविनाश हा विवाहित असून तो पूर्वी एका बँकेत काम करायचा. त्याच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ, एक बहीण असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## वीरशैव नगरात एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

विजापूर रोडवरील वीरशैव नगरात एका इसमाने छताच्या लोखंडी पट्टीला केबलने गळफास घेऊन आत्महत्या केली. रविवारी दुपारी अडीच वाजता घटना उघडकीस आली.

गुरुनाथ शरणप्पा मरगुर (वय ४३, रा. वीरशैवनगर, विजापूर रोड सोलापूर) असे गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. रविवारी दुपारी गुरुनाथ यांचा मृतदेह घरामध्ये गळफास घेतल्याने पलंगावर गुडघ्यात पाय मुडपून पडलेल्या अवस्थेत मिळाला. तेव्हा पत्नी उर्मिला व मेव्हणा वीरेश भोगडे यांनी ही माहिती विजापूर नाका पोलिसांना दिली. सहाय्यक फौजदार एम.जी. शेख यांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह शासकीय रुग्णालयात शव विच्छेदनासाठी दाखल केला. गुरुनाथ मरगुर हे मिळेल ते काम करायचे. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगी असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## निधन वृत्त...

### कॉन्ट्रॅक्टर सतीश भोसले

**सोलापूर, दि. १ जून-**



शहरातील प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर आणि सामाजिक वतुर्ळात मोठे नाव असलेले सतीश उद्धव भोसले वय ५५, रा. जानकी नगर, जुळे सोलापूर यांचे सोमवारी १ जून गोवा येथे पर्यटना दरम्यान दुर्दैवी आणि अकाली निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे सोलापूर महानगरपालिका वतुर्ळासह त्यांच्या मित्रपरिवारात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. सतीश भोसले यांचे मावसभाऊ राहुल शिंदे यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. सतीश भोसले हे आपल्या कुटुंबासह गोवा येथे पर्यटनासाठी गेले होते. सोमवारी समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना अचानक आलेल्या एका मोठ्या आणि जोरदार लाटेच्या तडाख्यामुळे ते समुद्राच्या किनाऱ्यावरील खडकावर आपटले. यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सध्या गोवा येथील शासकीय रुग्णालयात त्यांच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात येत असून, त्यांचे पार्थिव सोलापूर येथे आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. उद्या मंगळवारी २ जून सोलापुरात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले.

# साहित्य हे संवेदना जागृत करणारे प्रभावी माध्यम : डॉ. जाधव

### डॉ. भारत गायकवाड यांच्या 'अंतरीचे शब्दतरंग' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ जून-**

साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नसून ते माणसाच्या अंतर्मनातील संवेदना जागृत करणारे आणि समाजाला विचारप्रवृत्त करणारे प्रभावी माध्यम आहे. साहित्यामुळे माणसामध्ये विचारांची परिपक्वता निर्माण होते, समाजातील दुःख, वेदना, संघर्ष आणि आनंद यांची जाणीव अधिक तीव्रतेने होते. माणुसकीची जपणूक, सामाजिक बांधिलकी आणि मूल्यांची रुजवण साहित्याच्या माध्यमातून घडते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक तथा विचारवंत प्रा. डॉ. वामन जाधव यांनी केले.

वेळापूर येथील इंद्रनील मंगल कार्यालयात प्रा. डॉ. भारत गायकवाड यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त आणि त्यांच्या 'अंतरीचे शब्दतरंग' या नव्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. डॉ. वामन जाधव होते.

या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश जडे, ज्येष्ठ साहित्यिक हनुमंत पवार, डॉ. पांडुरंग नलवडे, प्रा. अशोक गायकवाड, दादासाहेब खरात, प्रा. डॉ. गोरख साठे, प्रा. डॉ. औदुंबर जाधव, प्रा. शिवाजीराव वाघमारे, रवी वसंत सोनार, प्रा. सुरेखा भालेराव, माजी प्राचार्य जे जे जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीशराव माने-देशमुख, युवा नेते जीवन जानकर, आंबेडकरी चळवळीचे नेते विकास धाईंजे यांची उपस्थिती होती.

प्रा. गायकवाड यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते 'अंतरीचे शब्दतरंग' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले. यावेळी आपल्या मनोगतात प्रा. डॉ. भारत गायकवाड यांनी कुटुंबीय, मित्रपरिवार, साहित्यप्रेमी आणि सहकाऱ्यांचे ऋण व्यक्त केले. माझ्या साहित्यप्रवासात कुटुंबाची साथ, मित्रांचे प्रोत्साहन आणि वाचकांचे प्रेम हेच माझे खरे बळ राहिले आहे.

## महत्वाचे...

### सोन्याचे बनावट ब्रेसलेट दिल्याप्रकरणी एकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.१ जून-**

माझ्या हातात दिसणाऱ्या ब्रेसलेटप्रमाणे अडीच तोळ्याचे सोन्याचे दुसरे ब्रेसलेट देतो म्हणून २ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गोपाळ तुकाराम नट्टेनुर (रा.स्वागत नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत किरण निशाणदार (वय-३६, रा. टेळेवाडा, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. यातील आरोपी हा दि.१ मे २०२६ रोजी रात्री ८ वाजता सराफ कट्टा येथे असताना त्याच्या हातातील ब्रेसलेट हे सोन्याच्या धातुचे, अडीचे तोळेचे वजनाचे असल्याचे सांगत फिर्यादीचा विश्वास संपादन करुन दोन लाख रुपये घेऊन बनावट ब्रेसलेट दिले. दरम्यान, फिर्यादीने याबाबत खातरजमा केली असता सदरचे ब्रेसलेट हे कुठल्यातरी धातुचे ब्रेसलेटवर हॉलमार्कचा शिक्का मारुन ते सोन्याचे असल्याचे भासविण्यात आले, असे फिर्यादीत म्हटले आहे . पोलिस हवालदार आरेनवरु हे पुढील तपास करीत आहेत.

---

### पुतण्यास फायटरने मारहाण, चुलत्यांवर गुन्हा

**सोलापूर, दि.१ जून-**

वडील व चुलत्यांमधील भांडणात समजावून सांगणाऱ्या एका पुतण्याला दोघा चुलत्याने फरशी व फायटरने मारून जखमी केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सचिन नागनाथ मुळे, गणेश नागनाथ मुळे (रा.पडगाजी नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत रुपेश संजय मुळे (वय-२१, रा.संगमेश्वर नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. फिर्यादीचे वडील व आरोपी चुलत्यांमध्ये दि. ३० मे २०२६ रोजी रात्री ८.३० वाजता तक्रार चालु असताना फिर्यादी त्यांना समजावुन सांगत होता. तेव्हा आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या वडिलांना शिवीगाळ करत मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे.

---

### मोडनिंब ग्रामपंचायतीत गैरव्यवहार; आत्मदहनाचा इशारा

**सोलापूर, दि.१ जून-**

मोडनिंब ग्रामपंचायतीमध्ये कचराकुंडी व फ्रिज खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला आहे. यातील दोषींवर दहा दिवसात कारवाई करण्यात यावी. अन्यथा जिल्हा परिषद येथे आत्म दहन करु, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीप्रणित युवक आघाडीचे जिल्हा सरचिटणीस प्रदीप गिड्डे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिला आहे. याबाबत कुर्डुवाडी येथील गटविकास अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या. मात्र, उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण केले असता विस्तार अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांनी भेट देऊन सात दिवसांच्या आत दोषींवर कायदेशीर कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# महसूल कर्मचाऱ्यांचा संवेदनशील नेता शंतनू गायकवाड यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात

**दै.तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, ॲड.शशी कुलकर्णी, अशोक इंदापुरे, प्रवीण घम, संजय भोसले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जून -**

राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कार्यालयात नाईक पदावर कार्यरत असणारे कर्मचाऱ्यांचे संवेदनशील नेतृत्व शंतनू गायकवाड यांचा सेवानिवृत्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. रंगभवन सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यास दै.तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, रायगडचे उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, सौ.वाघमारे, ॲड.शशी कुलकर्णी, माढ्याचे तहसीलदार संजय भोसले, कामगार नेते अशोक इंदापुरे, पंढरपूर येथील श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे नायब तहसीलदार प्रवीण घम, डॉ.प्रतिक शिवगुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शंतनू गायकवाड यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना केक भरविण्यात आला.

दै.तरुण भारतचे संपादक प्रशांत माने म्हणाले, महसूल विभागात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत असताना शंतनू गायकवाड यांनी कर्मचाऱ्यांचे यशस्वी नेतृत्व केले. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील दुवा म्हणून काम करताना त्यांनी लोकशाही मार्गाने अनेक आंदोलने करुन कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. शासकीय नोकरी आणि कुटुंब सांभाळून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी कार्य करणारे शंतनू गायकवाड हे संवेदनशील माणूस असल्यानेच ते सर्व पातळ्यांवर यशस्वी ठरले आहेत.

उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांनी शंतनू यांच्याबरोबर असलेल्या बालपणाच्या मैत्रीचे किस्से सांगून शंतनू यांचा संवेदनशील स्वभाव सर्वासमोर मांडला. कुशल संघटक सेवानिवृत्त होत असला तरी त्यांच्यातील नेता निवृत्त होवू देणार नाही. लवकरच ते नव्या भूमिकेत दिसतील, असे सांगितले.

ॲड.शशी कुलकर्णी यांनीही शंतून गायकवाड यांच्या काही आठवणींना उजाळा दिला. कामगार नेते अशोक इंदापुरे यांनी यशस्वी कर्मचारी नेता कसा असावा हे सांगताना शंतनू गायकवाड यांची कार्यपध्दती सर्वांसमोर मांडली. तहसीलदार संजय भोसले, नायब तहसीलदार प्रवीण घम यांनीही शंतनू गायकवाड यांच्या आठवणी सांगत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी संभाजी आरमारचे अध्यक्ष श्रीकांत डांगे, ज्येष्ठ नेते तानाजी ठोंबरे, भूमिलेखचे निवृत्त अधिकारी यशवंत कांबळे, महापालिका कर्मचारी संघटनेचे बापू सदाफुले, राजीव साळुंखे, अविनाश गोडसे, निवृत्ती लांडगे, रविराज नष्टे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष गजानन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.



# सोलापुरातील एक लाख बालकांना दिले जाणार ‘पोलिओ’चे दोन थेंब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जून-**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत रविवार, दि.२८ जून २०२६ रोजी पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी ३७३ लसीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

११६० आरोग्य कर्मचारी तैनात करण्यात येणार आहे. याद्वारे सोलापुरातील ० ते ५ वर्षे वयोगटातील १.०६ लाख बालकांना तोंडावाटे पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

यासंदर्भात सोलापूर म हानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सिटी टास्क फोर्स बैठक घेण्यात आली. याप्रसंगी आरोग्याधिकारी डॉ.राखी माने, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ.मंजिरी कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क अधिकारी अजित खानसोळे, डॉ.संतोष जोगदंड, डॉ.रोहन वायचळ, डॉ.पाटील, जिल्हा माता-बाल संरक्षण अधिकारी अविनाश मगर आदी उपस्थित होते.

# डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या वतीने इंटरनेट बँकिंगचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १ जून-**

डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या वतीने इंटरनेट बँकिंग प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. दरम्यान, बँकेचे अध्यक्ष ॲड.गणेश धारगळकर यांच्या अध्यक्षतेखाली बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेमध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीतील बँकेच्या उल्लेखनीय प्रगतीचा आलेख मांडण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष ॲड.गणेश धारगळकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, २०२५-२६ आर्थिक वर्षात बँकेचा निव्वळ नफा ४२.९५ कोटी रुपये झाला. ठेवी व कर्जवाटपात गतवर्षीच्या तुलनेत अधिक चांगली वाढ झालेली आहे. बँकेकडील ठेवी ४४२६ कोटींवर पोहचल्या आहेत. कर्ज व्यवहार २६७५ कोटींपर्यंत पोहोचला आहे.

एकूण व्यवसायात मागील वर्षापेक्षा तब्बल ७३६ कोटींची भरीव वाढ झाली. ७१०१ कोटी एवढा मिश्र व्यवसाय झाला. बँकेने राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांद्वारे ग्राहकांशी चांगला संपर्क झाला. अनेक नवीन



ग्राहकांना जोडता आले. सभासदांसाठी १०.७५ तर भांडवलधारकांना ११ टक्के लाभांश दिले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

यंदाच्या वर्षी युध्दजन्य परिस्थिती उद्भवली असताना देखील सर्वच आघाड्यांवर वाढ नोंदवून बँकेला ढोबळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण केवळ १.०९ टक्के व नक्त अनुत्पादित कर्ज ०.०० टक्के राखण्यात यश आले. मध्यप्रदेश राज्यातील उज्जैन, इंदौर, महाराष्ट्र राज्यातील सोलापूर याठिकाणी डोंबिवली येथील रुणवाल गार्डन येथे शाखा उघडण्यात आल्या.

२५०० ते ५००० कोटी रुपयांच्या ठेवी गटातून बँकेला महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार सलग तिसऱ्या वर्षी मिळाला. इतर दोन पुरस्कारही मिळाले. उत्कृष्ट बहुराज्यीय सहकारी बँक, बेस्ट एनपीए मॅनेजमेंट, बेस्ट डिजिटल बँकिंग प्रतिष्ठेचे असे प्रतिष्ठेचे पुरस्कार देऊन बँकेला गौरवान्वित करण्यात आले, असेही ते म्हणाले बँकेचे यश पाहून माजी अध्यक्ष उदय कर्वे यांनी बँकेच्या संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. सभेने एकम ताने तो मंजूर केला. यावेळी सभासदांनी बँकेच्या अहवालावर आधारित विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. सामुहिक राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

सावधान
अदिला नाल्याबाबत
झोपलेल्या सोलापूरकरांनो जागे व्हा!
“काहीच जाणार नाही”
असे समजू नका
“काहीच राहणार नाही”
हे समजून घ्या !

...तमाम सोलापूरकरांसाठी जाहीर आवाहन...
तमाम सोलापूरकरांसाठी धोक्याची घंटा...!

अदिला नाल्याच्या रेखांकनामुळे बाधित होणारे क्षेत्र हे फक्त बाळे - वसंत विहार पुरतेच मर्यादित नसून, हिप्परगा ते तेलगाव असे पूर्ण १२ ते १४ किलोमीटर नाल्याच्या दोन्ही बाजूस १५० ते २०० मीटर क्षेत्र "नो कन्ट्रक्शन झोन" होणार आहे. यामध्ये अंदाजे १२०० एकर क्षेत्रामध्ये २०० हून अधिक गट बाधित होणार आहेत.

सोलापूर शहरातील अदिला नाल्याच्या नावाखाली प्रस्तावित रेड लाईन व ब्ल्यू लाईनच्या कारवाईमुळे हजारो नागरिक, प्लॉटधारक, गृहखरेदीदार, बांधकाम व्यावसायिक आणि गुंतवणूकदार यांच्यावर आर्थिक विनाशाची वेळ आली आहे. आज हि वेळ थांबवायची असेल तर सर्वांनी एकत्रित येणे अत्यंत गरजेचे आहे.

महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे आणि वर्षांनुवर्षे नाल्यांची साफसफाई, खोलीकरण व रुंदीकरण न केल्यामुळे 2025 मध्ये (मानव निर्मित आपत्ती) पाणी साचण्याची परिस्थिती निर्माण झाली. परंतु त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी संपूर्ण परिसर रेड लाईन व ब्ल्यू लाईनच्या नावाखाली “रिस्टीक्टेड झोन” घोषित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. रिस्टीक्टेड झोनमध्ये कोणत्याही प्रकारचे निवासी, कमर्शियल अथवा कशाही प्रकारे बांधकाम करता येणार नाही.

प्राथमिक माहितीनुसार खालील परिसर व अंदाजे 200 हून अधिक गट नंबर रेड लाईन – ब्ल्यू लाईनच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे

● वैष्णवी हाइट्स परिसर ● वसंत विहार परिसर ● स्पर्श हॉस्पिटल ते गुलमोहर अपार्टमेंट परिसर ● चौदा कमानी परिसर ● 54 मीटर रस्त्यालगतचा परिसर ● सी.एन.एस. हॉस्पिटल परिसर ● बाळे व देगाव भागातील विकसित प्लॉटिंग स्कीम ● बसवेश्वर नगर परिसर ● अंदाजे 200 हून अधिक गटांमधील जमिनी ● हजारो प्लॉट्स, अपार्टमेंट, रो-हाऊस, बंगले व सुरु असलेली बांधकामे प्रभावित होण्याची शक्यता.

प्रभावित भाग व गट नंबर

बसवेश्वर नगर परिसर गट नं.: 4/1/अ/2/अ/1, 4/1/अ/2/अ/2, 4/1/अ/1, 4/1/अ/2/ब, 4/1/ब/1, 4/1/ब/2/अ/1, 4/1/ब/2/ब, 4/2, 4/3, 4/4, 3/1/अ, 3/1/ब, 3/2/अ इ.

देगाव परिसर गट नं. 180/2/ब, 181/1/अ/1, 180/2/अ, 180/1/अ, 180/1/ब, 181/1/ब/2, 181/1/ब/3, 181/2/अ, 181/2/ब/1/अ, 73/1, 73/2/अ, 73/2/ब/2, 73/3, 73/4, 74/1, 74/2, 75/1, 75/2, 79/1, 79/2, 76/1, 76/2, 77/1, 77/3, 77/8, 77/9, 178/1/अ, 178/1/ब, 179/1/अ, 179/1/ब, 179/2/अ/1, 179/2/अ/2, 175/1/अ, 175/1/ब, 175/2/अ, 175/2/ब इत्यादी अनेक गट नंबर प्रभावित होण्याची शक्यता.

बाळे परिसर गट नं. 31/4/2, 31/3/ब/1/अ, 34/1/अ/1, 33, 28/1, 22/2, 32, 28/3/1, 28/2, 29, 37/2, 171, 172, 170, 23/1, 23/2, 23/3, 160, 161, 168, 169, 174/1, 174/2, 173, 175/2, 166 इ.

वरील यादीमध्ये काही गट नंबर नसले तरी, नाल्याच्या दोन्ही बाजूस १५० ते २०० मीटर अंतरावर ज्यांच्या जमिनी आहेत त्या सर्वांनी या मोहिमेत सहभागी व्हावे .

कसबे सोलापूर परिसर गट नं. 31/2, 37/1/अ/1, 37/1/अ/2, 37/1/ब/1, 37/1/ड/1, 37/1/ड/2, 38/1/अ/1, 38/1/ब/1, 38/2/अ/1, 38/2/ब/1, 38/3/अ, 52/1, 52/2, 52/3, 53/1/अ, 53/1/ब, 53/2, 54/1/अ, 54/1/ब, 54/2, 55/1/अ, 55/2अ/1ब, 55/2ब इ.

याचा थेट परिणाम काय होणार?

- नवीन प्लॉटिंग परवानग्या बंद
- बांधकाम परवानगी बंद
- पूर्ण झालेल्या बांधकामांना वापर परवानगी बंद
- ले-आऊट मंजुरी बंद
- अपार्टमेंट प्रकल्पांवर निर्बंध
- आज ज्यांनी आयुष्याची पुंजी खर्च करून प्लॉट घेतले, घर बांधले किंवा कर्ज काढून बांधकाम सुरू केले आहे, त्यांच्यावर अक्षरशः आर्थिक विनाशाची वेळ येऊ शकते.

नागरिकांना पडलेले प्रश्न...

- नाल्यांचे वैज्ञानिक पद्धतीने खोलीकरण, रुंदीकरण आणि अतिक्रमण हटविणे हा उपाय असताना संपूर्ण शहराचा विकास थांबविण्याचा निर्णय का?
- पूर्वी मंजूर झालेल्या बांधकामाची जबाबदरी कोण घेणार?
- DP २०४३ मध्ये रेड लाईन ब्लु लाईनचा स्पष्ट उल्लेख का नाही ?

सोलापूरकरांनो जागे व्हा !

- आज शांत बसलात तर उद्या तुमच्या मालमत्तेची किंमत, विकासाचा अधिकार आणि भविष्यातील स्वप्ने सर्व काही धोक्यात येईल.
  “काहीच जाणार नाही” असे समजून नका...
  “काहीच राहणार नाही” हे समजून घ्या !

ग्रामीण भागातील प्रभावित होण्याची शक्यता असणारे भाग बेलाटी , कवठे, डोणगाव, तेलगाव इ. परिसर

आधिक माहितीसाठी QR CODE स्कॅन करा व Whatsapp ग्रुप जॉइन करा.

* टीप: सदर माहिती हि पाटबंधारे विभाग, सोलापूर महानगरपालिका व इतर कार्यालयाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन घेतलेल्या माहिती वरून अंदाजे प्रस्तावित कार्यवाहीनंतर होणाऱ्या कार्यवाहीबाबत आहे. या सर्व माहितीमध्ये आणि होणाऱ्या कार्यवाहीमध्ये फरक अथवा बदल असू शकतो. सदर दिलेली माहिती हि अंदाजित होणाऱ्या कार्यवाहीबाबत दिलेली आहे याची नोंद घ्यावी.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गुंतवणूक परिषदेसाठी नोंदणीचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी ११ जून रोजी लातूर येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नव उद्योजकांनी लातूर जिल्हा उद्योग केंद्र लातूर येथे आपल्या नव उद्योग तथा व्यवसायाची माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले आहे.

या परिषदेचा उद्देश जिल्ह्यातील गुंतवणूक वाढवणे, नवउद्योजकांना आकर्षित करणे आणि गुंतवणूकदार-व्यवसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि लातूर जिल्ह्याला विकासाचा केंद्रबिंदू बनवून जिल्हा आणि राज्याच्या विकासाला चालना देणे हा आहे.

या परिषदेमध्ये नव उद्योजकांसोबत सामंजस्य करार होऊन त्यांना एमआययू वितरित केले जाणार आहेत.



# पालकांच्या अट्टाहासामुळेच वाढले खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ !

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर, दि. १ जून : साधारणतः चार दशकांपूर्वी विद्यार्थ्याने खाजगी शिकवणी लावली तर त्याला सुमार बुद्धीचा समजले जात असे. जसजसा काळ बदलत गेला, परिस्थिती नेमकी उलट होत गेली. आता तर नामांकित शाळा - महाविद्यालयांपेक्षाही नामांकित शिकवणी वर्गाला पालक प्राधान्य देताना आढळून येत आहेत. त्यामुळे या घडीला पालकांच्या बुद्धीची कीव करावी की विद्यार्थ्यांच्या ? असा प्रश्न पडल्यास नवल वाटू नये. एकंदर परिस्थितीवरून पालकांच्या अट्टाहासामुळेच केवळ लातूरचा नव्हे तर सगळीकडे खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ वाढल्याचे दृष्टीपथास येते.

शिक्षणाच्या कक्षा सातत्याने विस्तारित होत आहेत. त्यासोबतच स्पर्धाही जीवघेणी वाढली आहे. विद्यार्थ्यांना जणू प्रत्येक श्र्वासासोबत स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. या जीवघेण्या स्पर्धेत आपला पाल्य टिकावा, यासाठी पालकही प्रयत्नशील असल्याचे निदर्शनास येते. शाळा - महाविद्यालयात स्पर्धेसाठी म्हणावे तेवढे पोषक वातावरण मिळत नसल्यामुळे पाल्यांना खाजगी शिकवणी वर्गांकडे वळावे लागत असल्याचा मतप्रवाहही काही सुजाण पालकातून व्यक्त होताना आढळून येतो. काही वर्षांपूर्वी पालक आपल्या पाल्याला अग्रगण्य शिक्षण संस्थेअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळावा याकरिता प्रयत्नरत असत. त्यासाठी प्रसंगी वशिल्याचा प्रसंगही उदभवला तर त्याचीही तयारी ओळखी - पाळखी काढून पालक ठेवत असत.आजही लातूरच्या काही महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून असे प्रकार चालत असल्याचे पाहायला मिळते.

आजचे युग हे स्पर्धेचे आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्येक बाबतीत सरस राहणे अनिवार्य आहे. आजघडीला शाळा - महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठीचे बारकावे म्हणावे तेवढे समजावून सांगितले जात नसल्याचे पालकांचे मत आहे. शासन अनुदानित शाळा - कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - प्राध्यापकांना वेतनाचे अनुदान देते. मात्र, त्या वेतनाच्या मोबदल्यात संबंधितांकडून केल्या जाणाऱ्या ज्ञानार्जनाच्या कामाची पडताळणी केली जात नाही. संबंधित संस्था चालकही या बाबींकडे म्हणावे तेवढे गांभीर्याने पाहत नाहीत. परिणामतः, शिक्षक - प्राध्यापकांना विना अडथळा महिन्याला वेतन अदा होते. त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात काय शिकवले आहे किंवा शिकविण्याचा प्रयत्न तरी झालाय का ? हेही दुर्दैवाने पाहिले जात नाही. ही आपली आजची शिक्षण व्यवस्था आहे. कनिष्ठ महाविद्यालयातून जर विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी उत्कृष्ट मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी आणि पालकांना खाजगी शिकवणी वर्गांकडे वळण्याची तेवढी आवश्यकताही भासली नसती, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

आज स्वतःला शिक्षण महर्षी म्हणवून घेणारे अनेक संस्था चालक अस्तित्वात आहेत. त्यांच्यापैकी किती जणांमध्ये शिक्षण महर्षी म्हणून घ्यायची पात्रता आहे ? असा प्रश्न विचारला गेला तर कदाचित शिक्षण महर्षी बिरुदावली लावून फिरणारेही पुढे यायला धजावणार नाहीत, हे वास्तव मान्यच करावे लागेल. शिक्षण संस्थांनाही आता व्यवसाय - उद्योगाचे स्वरूप आल्याचे दिसून येते. संस्था चालक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून भांडत नाहीत तर स्वतःच्या लाभासाठी संस्था आपल्या ताब्यात कशी येईल ? यासाठी भांडताना, वाद करताना दिसतात. संस्था चालकांची ही स्वार्थी वृत्तीच कदाचित खाजगी शिकवणी वर्ग चालविणाऱ्या मंडळींच्या लक्षात आली असावी. विद्यार्थ्यांना जे काही हवेय ते आपण महाविद्यालयापेक्षा चांगल्या पद्धतीने देऊ शकतो, हे दाखवून देण्याकामी खाजगी शिकवणी चालक कमालीचे यशस्वी ठरले, असेच एकंदर परिस्थितीवरून म्हणावे लागेल. खाजगी शिकवणी चालकांपेक्षा लातूरच्या कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल चांगला आहे. पण खाजगी शिकवणी चालक त्याची जाहिरातबाजी करतात आणि आम्ही संस्था चालक जाहिरातबाजी करण्यात कमी पडतो, अशी स्पष्ट कबुलीच एका अग्रगण्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी दिल्याची प्रचिती आली आहे.

शिक्षणाचे आज मोठ्या प्रमाणात बाजारीकरण झाल्याचे पाहायला मिळते. नीट - जेईई तथा तत्सम प्रवेश परीक्षांसाठी लातूरमध्ये पोषक वातावरण आहे, हे पाहून राज्यातीलच नव्हे राज्याबाहेरील अनेक खाजगी शिकवणी वर्गांनी आपले लक्ष लातूरकडे केंद्रित केले. शिक्षण क्षेत्राकडे आज व्यवसाय म्हणून पाहिले जात असल्याचे प्राप्त परिस्थितीवरून दिसून येते. त्यातूनच पालक - विद्यार्थी जाहिरातबाजीला भुलतात, ही बाब खाजगी शिकवणी चालकांच्या लक्षात आली. आपल्या व्यवसायासाठी त्यांनी आपल्या वर्गांच्या मोठमोठ्या जाहिराती करून पालकांना , विद्यार्थ्यांना भुरळ पाडून आपले इप्सित साध्य करून घेण्याचे काम केले, ही बाब मान्यच करावी लागेल. पालकही आपल्या जवळच्या मित्राचा मुलगा नामांकित खाजगी शिकवणी वर्गात आहे, तर आपल्याही मुलाला तेथेच प्रवेश मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करत राहिले. यातूनच खाजगी शिकवणी वर्गांचे प्रस्थ वाढत गेले, असेच म्हणणे विद्यमान परिस्थितीत संयुक्तिक ठरेल.

## मोरारी बापूंच्या राम कथा महोत्सवाची सांगता



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : किल्लारी येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या पू. पू. मोरारी बापू यांच्या श्रीरामकथेचा रविवारी भक्तिमय वातावरणात समारोप झाला. दि. २३ मेपासून सुरू झालेल्या या आध्यात्मिक सोहळ्यास महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि देशातील विविध राज्यांमधून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

रामकथेद्वारे मानवता, प्रेम, अध्यात्म आणि संस्कारांचा संदेश देणाऱ्या मोरारी बापू यांनी रामचरित्रातील विविध प्रसंगांचे रसाळ वाणीत विवेचन करताना समाजात सद्भावना, करुणा आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या विचारांना भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध शिवमहापुराण कथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांनी कथास्थळी भेट देऊन मोरारी बापू यांची सदिच्छा भेट घेतली. देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या दोन्ही कथाकारांची एकत्र उपस्थिती भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. त्यांच्या भेटीमुळे संपूर्ण परिसर अधिक आध्यात्मिक आणि भावपूर्ण झाला. सातही दिवस कथास्थळी भाविकांचा मोठा जनसागर उसळला होता.

भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांनी महाप्रसाद, पिण्याचे शुद्ध पाणी, वाहनतळ, वैद्यकीय सेवा, सुरक्षा व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली होती. स्वयंसेवकांनीही अहोरात्र सेवा बजावत कार्यक्रम यशस्वी केला. किल्लारी, लातूर, धाराशिव, बीड तसेच परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्यासंख्येने भाविक सहभागी झाले. एवढ्या मोठ्या गर्दीनंतरही कार्यक्रम शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडल्याने आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात

### माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण, पु. अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन






तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीच्या निमित्ताने सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते रविवार दि. ३१ मे रोजी शहरातील अंबाजोगाई रोडवरील पु. अहिल्यादेवी होळकर चौकातील पु. अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धनगर सकल समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे सकल धनगर समाजाच्या वतीने आभार व्यक्त करुन त्यांचा शाळ, श्रीफळ, घोंगडी आणि काठी देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, ॲड. अण्णाराव पाटील, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, लातूर मनपाचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, पंचायत समिती सभापती बैले, ॲड. दीपक सूळ, विष्णू धायगुडे, पवन सोलंकर, संभाजी सुळ, एकनाथ पाटील, प्रवीण कांबळे, राजपाल भंडे, प्रा. वाघमारे, बंडू किसवे, यशवंत वाड- ीकर, शिवाजी कांबळे, प्रा. सिद्धराम कठारे, मदन धुमाळ, शिंदे, बंडगर, घोडके, चंद्रकांत घायगुडे, बैकरे, बनसोडे यांच्यासह सकल धनगर समाज पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आभार
>
> लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मार्गदर्शक माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे सकल धनगर समाजाच्या वतीने आभार व्यक्त करुन त्यांचा शाळ, श्रीफळ, घोंगडी आणि काठी देऊन सत्कार करण्यात आला.

पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शनिवारी रात्री १२ वाजता अंबाजोगाई रोडवरील पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकातील पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिषबाजी करण्यात आली. यावेळी पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जयजयकार करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. युवकांनी जल्लोश केला.

## लातूर रेल्वे स्थानकात पीटलाईनच्या कामाला गती




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : लातूर रेल्वे स्थानकावरील पीटलाईनच्या कामाला आता बऱ्यापैकी गती आली आहे. त्यामुळे हे काम येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. रेल्वे स्थानकावरील विविध विकासकामांना आता कमालीची गती मिळाली असून, प्रवाशांची वर्षानुवर्षांची प्रतीक्षा आता संपणार आहे.

खासदार डॉ. शिवाजी काळगे, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगावकर आणि रेल्वेच्या विभागीय अभियंत्यांनी प्रत्यक्ष रेल्वे स्थानकाला भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यामुळे प्रवाशांच्या सुविधेत मोठी भर पडणार आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक २ ची लांबी-रुंदी वाढवणे, नवीन प्लॅटफॉर्म क्रमांक ३ चे काम वेगाने सुरू आहे. गर्दी टाळण्यासाठी दुसरे प्रवेशद्वार, नवीन फूट ओव्हर ब्रिज, आणि लिफ्टची सुविधादेखील उपलब्ध करून दिली जाणार आहे.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महिला सीआरपी पोलिसांची नियुक्ती आणि मालधक्क्यावरील प्लॅटफॉर्मवर शेडचे कव्हर बसवण्याच्या कामालाही मंजुरी मिळाली आहे. यामुळे आगामी काळात लातूर रेल्वे स्थानक अधिक सुसज्ज आणि सुरक्षित होणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : दयानंद कला महाविद्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. शांता कोटे यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य गायकवाड म्हणाले की, प्रजेच्या हितासाठी आयुष्य वेचणाऱ्या अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी केला असल्याचे ते म्हणाले. या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना ३० जूनपर्यंत मुदतवाढ

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : यावर्षी १६ मे २०२६ पासून राष्ट्रीय जनगणनेचे काम सुरू झाल्याने शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या पूर्ण क्षमतेने होऊ शकल्या नव्हत्या. ज्या शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या नाहीत, त्यांच्या बदल्या आता ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी राजपत्राद्वारे काढल्याने बदल्या होणे अटळ असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील, अशी तरतूद आहे. संपूर्ण भारतात

जनगणना २०२७ करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा म्हणजे घरांची यादी व गृह गणना १६ मे २०२६ पासून १४ जून २०२६ पर्यंत करायची आहे. भारत सरकारने सर्व राज्यांना जनगणना २०२७साठी नियुक्त केलेल्या जनगणना कार्याधिकाऱ्यांच्या बदल्या न करण्याची विनंती केली. म्हणून जनगणनेचा पहिला टप्पा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी २०२६ या वर्षात जनगणनेचे काम करावयाच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी केल्या जातील, असे राजपत्रात म्हटले आहे. जनगणनेचे काम २०२७ या वर्षातही होणार आहे.

सध्या शिक्षक, कर्मचारी करीत असून, ज्यांची नियुक्ती जनगणनेच्या कामासाठी झाली आहे, त्यांना बदल्यांतून वगळण्यात आले होते. परंतु, जनगणनेचा पहिला टप्पा १४ जून रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यानंतर बदल्या करण्यास हरकत नसल्याचे संकेत राजपत्राद्वारे दिलेल्या वृत्तावरून दिसत आहे. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी बदल्याचे संकट टाळण्यासाठी जनगणनेचे काम स्वीकारून सुटका करून घेतली खरी; पण ती आता अंगलट आली आहे. यासंदर्भात, जिल्हा परिषदेसह शासकीय कार्यालये जून महिन्यात बदल्यासंबंधी कार्यवाही करतील, अशी स्थिती आहे. ज्यांनी बदली टाळण्यासाठी जनगणनेचे काम स्वीकारले, त्यांची मोठी गोची झाली. आता बदलीतून कोणत्याच कर्मचाऱ्यांची सुटका होणार नाही, असे चित्र दिसत आहे.

## प्रभाग ६ : तक्रार ते निवारण, सर्व माहिती आता मोबाईलवर

### नागरिकांची सोय : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ॲपचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : पाणी, रस्ते, लाईट किंवा कोणतीही नागरी समस्या असो महापालिकेच्या दारात खेटे मारल्याशिवाय मार्गीच लागत नाही. बदलत्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून प्रभाग क्रमांक ६ मधील नगरसेवकांनी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रभागातील प्रत्येकासाठी 'नागरी सेवा ॲप' विकसित केले असून नागरिकांनी आपल्या समस्या किंवा म्हणणे ॲपमध्ये मांडले तर ते महानगरपालिकेच्या संबंधित विभागास आणि अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते. एवढेच नाहीतर त्यावर कार्यवाही झाली हे देखील पाहता येते. या ॲपमुळे नागरिकांची मोठी सोय झाली आहे. नगरसेवक गणेश गवारे यांनी हे ॲप विकसित करुन घेतले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

प्रभाग सर्वसामान्यांचे प्रश्न थेट आणि जलद गतीने सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या क्रमांक ६ मध्ये एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. नागरिकांना पाणी, रस्ते, स्ट्रीट लाईट, स्वच्छता किंवा ड्रेनेज यांसारख्या नागरी समस्यांसाठी पालिकेत फेऱ्या माराव्या लागत होत्या किंवा लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करावा लागत होता. मात्र, या ॲपमुळे प्रभागातील नागरिकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी कोणाला फोन करण्याची किंवा कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. 'नागरी सेवा हे ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करून, केवळ एका क्लिकवर आपल्या समस्येची थेट नोंद करू शकतील. ॲपवर आलेल्या तक्रारी थेट संबंधित विभागाकडे वर्ग केल्या जाणार असल्याने समस्येचे निवारण अत्यंत जलद गतीने होईल आणि नागरिकांना त्यांच्या तक्रारीची सद्यस्थिती देखील मोबाईलवर पाहता येईल.

ॲपच्या उद्घाटनप्रसंगी आ. संभाजी पाटील निलंगेकर, नगरसेवक ॲड. दीपक मठपती यांच्यासह अनेक स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे गौरवउद्गार मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४५९

**अगा पंढरीनाथा। शरण आलो कृपावंता ।।**

श्री ज्ञानेश्वरीमध्ये श्रीकृष्णांनी अर्जुनाला अगा या शब्दाने अनेक वेळा संबोधल्याचा उल्लेख आहे.अगा हा शब्द लडीवाळ भावनेचा आणि नि:स्वार्थ प्रेमाचा संयोग दर्शविणारा आहे. वरिष्ठांने कनिष्ठासाठी अगा हा शब्द वापरला असा अर्थ कोणी काढू शकतो. मात्र जेथे वरीष्ठ आणि कनिष्ठ असा भेद शिल्लकच राहत नाही, तेथेही या शब्दाचा वापर होतो. सेनाजींनी भेद न जाणणाऱ्या व प्रेमाचे प्रतिक असणाऱ्या पांडूरंगाला अगा म्हणून हाक मारली आहे. यावेळी ते शरणांगतीची भाषा विसरले नाहीत. अधिकाराने हाक मारणाऱ्यांकडे किंवा हक्क गाजवणाऱ्यांकडे नम्रता आणि नि:स्वार्थ प्रेम असेल तर आई-मुलांप्रमाणे नाते निर्माण होते.



सासू-सून, वरिष्ठ-कनिष्ठ,श्रीमंत-गरीब यांच्यात असे नाते निर्माण होण्याची अत्यंत गरज आहे. नि:स्वार्थ भाव हा या गरजेच्या पूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या नात्याचा आधारस्तंभ आहे, हे लक्षात असावे.

मीपणा, स्वार्थ, अहंकार यापोटी निर्माण झालेला अभिमान सर्वनाशी असतो. मात्र निस्वार्थ प्रेम, आपुलकी पोटी निर्माण झालेला अभिमान आनंदात भर तर घालतोच पण सर्व संबंधितांना कर्तव्याची जाणही करून देतो. आई-वडीलांना मुलांबद्दल, मुलांना आई-वडीलांबद्दल, शिष्यांना सद्गुरुबद्दल, सद्गुरुंना शिष्याबद्दल, भक्तांना देवाबद्दल, देवाला निस्वार्थ भक्तांबद्दल, नागरिकांना देशाबद्दल अभिमान असायलाच हवा. हा अभिमान जेथे आहे तेथे खऱ्या आनंदाची प्रचिती येते. अनन्य भक्त असणाऱ्या सेनाजींची पांडूरंगावरील भक्ति ही निस्वार्थ होती. या निस्वार्थ भक्ताने प्रसन्न झालेल्या पांडूरंगाला नाशवंत, भौतिक असे कांही मागीतले नाही. स्वार्थापोटी कांही तरी मागणे म्हणजे एक प्रकारे सर्वनाशी अभिमानाच्या निर्मितीला संधी देणे होय. याची जाण असणाऱ्या सेनाजींनी पांडूरंगासमोर शरणांगतीची भाषा वापरून निस्वार्थ भक्ताबद्दल, **याचा धरी अभिमान। सत्य करावे वचन।।** या शब्दांत अभिमान बाळगण्याची विनंती केली आहे.

कुटुंबातील, समाजातील बरेचशे कलह हे संपत्तीच्या अनुषंगाने असतात. सुनेने माहेरहून हुंडा आणावा म्हणून कोण्या कुटुंबात कलह असेल तर कोण्या कुटुंबात शेती, जमिन, पैशाची देवाण घेवाण म्हणून कलह असेल. अर्थात, कलहांचा प्रामुख्याने संबंध हा आर्थिक बाबीशी असतो. संसारीक जीवास आर्थिक आवड असणे व त्या आवडीपोटी नको ते घडणे साहजीक आहे. पण जो संसारात राहून संसारापेक्षा वेगळा असतो, त्याला आर्थिक बाबीचे आकर्षण नसते. आपल्याकडे नश्वर सत्ता, संपत्ती, सौंदर्य असावे, असेही अशांना वाटत नाही. त्यामुळे नट्टा फट्टा करणे, शरीरावर दाग दागिने, अलंकार चढविणे, हे ही त्यांना आवडत नाही. संत सेनाजी अशा महात्म्यांचे शिरोमणी होत. पांडूरंगाच्या व प्राणीमात्राच्या सेवेशिवाय कशातही मन न राहणाऱ्या या महात्म्यांचे मन नाशवंत, भौतिक सुखवस्तूत अडकण्याचे कारणच नव्हते. त्यांच्यासाठी सर्वगुणसंपन्न असणाऱ्या आणि विज्ञानाने अत्यंत महत्वपूर्ण म्हणून मान्यता दिलेल्या पवित्र अशा तुळशीचा हार म्हणजेच सर्वस्वी अलंकार होता. त्यांच्या, **आम्हा हेचि अलंकार। कंठी हार तुळशीचें।।**, या शब्दांप्रमाणे असा अलंकार आपणाला आवडला तर आपल्या आनंदातही भर पडेल यात शंका वाटत नाही. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. २ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, कृ. द्वितीया
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- मूळ (२२.०५)
योग - साध्य (०७.१५)
करण - वणिज (अहोरात्र)
राहू काल : मंगळवार
स. ७.३० ते ९.००

दिनविशेष :
१९५३: राणी एलिझाबेथ (दुसरी) यांचा इंग्लंडमध्ये राज्याभिषेक झाला.
१९५५: 'रोजा', 'बॉम्बे' सारख्या चित्रपटांचे प्रसिद्ध भारतीय दिग्दर्शक मणिरत्नम यांचा जन्म.
१९२९: चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री नर्गिस दत्त हिचा जन्म.
२०१४: तेलंगण हे भारताचे २९ वे राज्य म्हणून अधिकृतपणे अस्तित्वात आले.



## अभिनव सामाजिक संस्थेच्या शहराध्यक्षपदी जयश्री रानसरजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'अभिनव सामाजिक संस्था यात सोलापूर जिल्हा कार्यकारिणीत महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी सोलापूर शहराध्यक्षपदी जयश्री रानसरजे यांची नियुक्ती करण्यात आली.

अहिल्यादेवींनी ज्याप्रमाणे संपूर्ण देशाला आपली कर्मभूमी मानून लोककल्याण केले, त्याचप्रमाणे आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपल्या सोलापूर आणि परिसरातील प्रत्येक गरजू घटकांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प करण्यात आला. पद हे केवळ अधिकाराचे नसून ते सेवेचे माध्यम आहे. कोणतीही संस्था ही तिच्या विचारांनी चालते, पण ते विचार प्रत्यक्षात आणण्याचे काम तिचे पदाधिकारी करत असतात. केवळ आर्थिक मदत न करता १) महिलांना (व्यवसाय प्रशिक्षण) देऊन स्वतःच्या पायावर उभे करणे गरजेचे आहे. २) ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांना गृहउद्योगासाठी सक्षम करणे, जेणेकरून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील. ३) शासकीय योजना आणि गरजू नागरिक यांच्यातील 'दुवा' म्हणून सामाजिक संस्थेने काम करणे आवश्यक आहे. महानगरपालिका, नाबार्ड किंवा इतर शासकीय योजना समाजातील गरजू महिला आणि संस्थांपर्यंत कशा पोहोचतील, यासाठी संस्थेच्या वतीने कार्य करण्यात येईल असे आश्वासन संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मीनल दास यांनी दिले. सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सरोजिनी माकाई, सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष सोनाली सगर, सोलापूर जिल्हा संघटक अनिता वाघमारे, सोलापूर जिल्हा सचिव संजीवनी सलबत्ते, सोलापूर शहर उपाध्यक्ष सुनिता कारंडे यांची नियुक्ती करण्यात आली.

# दिव्यांगांवरील उपकार नव्हे, हा त्यांचा ‘घटनात्मक हक्क’

**दिव्यांगांना ‘लाभार्थी’ नव्हे तर ‘हक्कदार’ म्हणून पाहण्याची गरज**

**एकही दिव्यांग शासकीय योजनांपासून वंचित राहू नये; आयुक्त सत्यजित बडे यांचे सर्व विभागांना निर्देश**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ देणे ही दानधर्माची किंवा कृपादृष्टीची बाब नसून तो त्यांचा कायदेशीर आणि घटनात्मक हक्क आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय विभागाने दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम-२०१६ च्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करून एकही दिव्यांग व्यक्ती शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त सत्यजित बडे यांनी दिले.

नियोजन भवन येथे आयोजित दिव्यांग व्यक्ती कल्याण व पुनर्वसन समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपआयुक्त एच. एस. गाढे, सहाय्यक आयुक्त सुलभा वटारे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आयुक्त बडे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीत दृष्टिकोन बदलण्यावर भर दिला. दिव्यांग व्यक्तींना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विभागांनी स्वतःहून पुढाकार घेतला पाहिजे. अर्जाची वाट पाहण्याऐवजी पात्र लाभार्थी शोधून त्यांच्यापर्यंत योजना पोहोचवण्याचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्था, स्वयंसेवी संघटना आणि प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करून तक्रारमुक्त सेवा देण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आयुक्त बडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील एक टक्का निधी दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवण्याच्या तरतुदीची आठवण करून दिली. तसेच ग्रामविकास आणि नगरविकास विभागांनी त्यांच्या मंजूर निधीपैकी किमान पाच टक्के निधी दिव्यांग योजनांसाठी वापरण्याबाबत अधिक गांभीर्याने काम करण्याच्या सूचना दिल्या. सोलापूर जिल्ह्यातील १,०२६ ग्रामपंचायतींनी सन २०२५-२६ मध्ये पाच टक्के निधीच्या तरतुदीनुसार सुमारे २ कोटी ७४ लाख रुपये राखीव ठेवून त्यापैकी २ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च केला आहे.

त्याच प्रकारे १७ नगरपालिकांमार्फत विविध योजनांवर वार्षिक सुमारे १ कोटी १४ लाख रुपये खर्च करण्यात येत आहेत. मात्र, उपलब्ध निधीच्या तुलनेत लाभार्थ्यांची संख्या आणि योजनांची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.बैठकीत आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास, नगरविकास, बांधकाम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, दिव्यांग वित्त व विकास महामंडळ आणि बँकिंग क्षेत्राच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रारंभी सहाय्यक आयुक्त सुलभा वटारे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देताना प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली जाणार असल्याचे सांगितले.

### बँकांनी कर्ज प्रकरणे तत्काळ मंजूर करावीत

बैठकीत बँकिंग सुविधांवरही विशेष चर्चा झाली. दिव्यांग व्यक्तींसाठी आलेली कर्ज प्रकरणे प्राधान्याने मंजूर करण्याच्या सूचना देत प्रत्येक बँकेने दिव्यांग लाभार्थ्यांसाठी स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

### दिव्यांगांसाठी ‘सेन्सरी पार्क’ उभारण्याचा प्रस्ताव

लातूर जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या सेन्सरी पार्कच्या धर्तीवर सोलापूर जिल्ह्यातही अशा सुविधा विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश बडे यांनी दिले. दिव्यांग मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि संवेदनात्मक विकासासाठी अशा प्रकल्पांचा मोठा उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. दिव्यांग कल्याणाला ‘सामाजिक जबाबदारी’ नव्हे तर ‘हक्काधारित प्रशासन’ म्हणून पाहण्याचा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

## डॉ. राजनीश कामत यांची सिंहगड केगाव कॅम्पसला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**



शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ लोणारेचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश के कामत यांनी सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव (सोलापूर) येथे सदिच्छा भेट दिली.

यावेळी सिंहगड केगाव-सोलापूर कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. कामत यांचे स्वागत केले. तसेच संस्थेच्या विविध शैक्षणिक, संशोधन आणि विद्यार्थी विकास उपक्रमांची माहिती त्यांना देण्यात आली. भेटीदरम्यान उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, संशोधनाला चालना, उद्योग-शिक्षण समन्वय, कौशल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत चर्चा झाली.

डॉ. कामत यांनी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी सक्षम बनविण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, नवोपक्रम आणि संशोधन यांना प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. सिंहगड संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक करताना त्यांनी ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या दर्जेदार संधी उपलब्ध करून देण्यात अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. तसेच आगामी काळात विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक दृढ होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## प्रवासी महिलेचे मंगळसूत्र चोरीस

**सोलापूर, दि. १ जून-**

कुटुंबीयासोबत बसची वाट पाहत थांबलेल्या एका प्रवासी महिलेच्या बॅगेमधील ८३ हजार रुपये किमतीचे १ तोळेचे सोन्याचे मणी मंगळसुत्र व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास करण्यात आल्याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रेखा सुनिल डांबरे ( वय ३० वर्षे, रा. विजापूर नाका झोपडपट्टी २ सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी या शनिवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास रंग भवन येथील बस स्टॉप वर पती, बहिण व तीन लहान मुले असे बसची वाट पाहत थांबले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने तेथील गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीच्या खांदयावरील लेदर बॅगेतील ८३ हजार रुपये किमतीचे १ तोळेचे सोन्याचे मणी मंगळसुत्र व रोख रक्कम फिर्यादीच्या नकळत चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक फौजदार नदाफ हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## अपूर्वा सुरवसेची नवोदय विद्यालयात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १ जून-**

आदर्श पब्लिक स्कूल सीबीएसई कुर्डूवाडीची गुणवंत विद्यार्थिनी अपूर्वा सुरवसे हिने पीएम-श्री जवाहर नवोदय विद्यालय, पोखरापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ९ वी प्रवेश प्रक्रियेत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



अपूर्वा सुरवसे हिचे या यशाबद्दल संस्था अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे तसेच प्राचार्या भारती मेहता यांनी तिचे अभिनंदन केले.

## खाऊ गल्ली नव्हे, हजारो चेहऱ्यांवरील आनंदाचे हास्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

एखादा लोकप्रतिनिधी केवळ विकासकामेच करत नाही, तर समाजातील सर्वसामान्यांच्या आयुष्यात आनंद, रोजगार आणि आशेचा किरण निर्माण करतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे होत. त्यांच्या संकल्पनेतून शहराच्या पूर्व भागातील शांती चौक पाण्याच्या टाकी परिसरात, गव्हर्मेंट पॉलिटेक्निकल लगत उभारण्यात आलेली खाऊ गल्ली आज संपूर्ण सोलापूरकरांच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहे. बालगोपाळांच्या चेहऱ्यावरील आनंद, कुटुंबांच्या विरंगुळ्याचे क्षण आणि व्यावसायिकांच्या जीवनातील नवसंजीवनी यामुळे हा उपक्रम शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

स्थानिक विक्रेत्यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, आमदार देवेंद्र कोठे यांनी आम्हाला केवळ व्यवसायाची जागा दिली नाही, तर आमच्या कुटुंबाला जगण्याचा आधार दिला आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, आ. देवेंद्र कोठे यांच्या दूरदृष्टीमुळे ही खाऊ गल्ली भविष्यात मुंबईच्या चौपाटीप्रमाणे सोलापूरची ओळख बनू शकते. ही चौपाटी राज्याच्या आणि देशाच्या नकाशावर झळकण्याची क्षमता ठेवते. आज या खाऊ गल्लीमुळे अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. बेरोजगार युवकांना रोजगार, व्यावसायिकांना व्यवसायाची संधी, मुलांना आनंद आणि कुटुंबांना विरंगुळा देणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने लोकाभिमुख विकासाचा आदर्श ठरत आहे.

# माढ्यात अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. १ जून-**

माढा शहरात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमास माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा मीनल साठे, माजी जि.प. सदस्य झुंजार भांगे, माजी जि.प. सदस्य शिवाजी कांबळे, दादासाहेब साठे, कृष्णा शिंदे, शहाजी साठे, गुरुराज कानडे, उपनिरीक्षक कैलास मारकड, दिनेश जगदाळे, नगरसेवक राजू गोटे, दिनेश गाडेकर, आजिनाथ माळी, अरुण कदम, वंदना लंकेश्वर, सचिन साबळे, सुधीर लंकेश्वर, रवींद्र सरवदे, आबा साठे, बापू माळी, यू.एफ. जानराव, अमर लंकेश्वर, बाबासाहेब ओहोळ, नाना साठे, नितीन साठे, सचिन चवरे, अनिकेत चवरे, शिवाजीदेव कांबळे, संग्राम राऊत, शिवाजी माने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती उत्सव मंडळ माढाचे अध्यक्ष देविदास खरात, अरविंद खरात, सुमित सलगर, गणेश वाघमोडे, शरद भांगे, विकास पवार, अमोल खरात, क्रांतिसिंह माने, विराज खरात, पांडुरंग बंडगर, महेश खरात, सिद्धेश्वर मारकड, नागेश राऊत व समीर सापडणेकर यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन डी.व्ही. चवरे औदुंबर पवार महेश भांगे यांनी केले तर आभार अमोल खरात यांनी मानले.



## पद्मशाली समाजातील दहावी, बारावीच्या गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

पद्मशाली समाजातील यंदाच्या १० वी व १२ वीच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या दहावीच्या कु. अपूर्वा राकेश संगा (९७ टक्के), प्रत्युश गिरीश गुडमल (९३.८० टक्के) तर, बारावीच्या स्वराग संतोष कोंडा (९२.१७ टक्के), श्रावणी श्रीधर नडिमेटला (९०.३८ टक्के) या विद्यार्थ्यांना पद्म-एकलव्य', विद्यार्थीनींना पद्म ज्योती पुरस्कार उपस्थित विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या गजरात वितरण करण्यात आले.

सोलापुरातील पद्मशाली फौंडेशन, श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमच्या वतीने गांधीनगर, जुना अक्कलकोट नाका जवळील प्रिसीजन स्कूल येथे झालेल्या पद्मशाली समाजातील १० वी, १२ वीच्या परिक्षेत गुणवंतांचा कौतुक सोहळा आयोजित केले होते. उद्योजक श्रीधर सुरा यांच्यातर्फे पुरस्कार देण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह, शाल व बुके होते.

पद्मशाली फौंडेशनतर्फे अर्धा डजन क्वॉयर वह्या, इश्वर टेक्सटाइलचे श्रीधर गंगुलतर्फे टर्किश टॉवेल तर, राजलक्ष्मी टॉवेलचे राजाराम देवसानी यांच्यातर्फे प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन नॅपकीन देण्यात आले. यावेळी तब्बल १५० विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शहराचे सहायक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री, बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक एक्कलदेवी, एसबीसीचे राज्य निमंत्रक अशोक इंदापूरे, आधुनिक सारथीचे संस्थापक श्रीनिवास बुरा, व्यापारी, नरेंद्र धारा, उद्योजक श्रीधर गंगुल,फौंडेशनचे सचिव अंबादास कुडक्याल, फाउंडेशनचे उपाध्यक्ष श्रीनिवास कामूर्ती, सल्लागार दयानंद कोंडाबत्तीनी, सखी संघमच्या कार्याध्यक्षा सविता येदूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अनैसर्गिक अत्याचार करुन अल्पवयीन मुलाचा खून; एका तरुणावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याचा सूड उगवण्यासाठी, त्याच्यासह चार मित्रांनी मिळून खून केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. सुरुवातीला केवळ खुनाचा गुन्हा वाटणाऱ्या या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. पीडित अल्पवयीन मुलाने फिर्याद दिल्यानंतर घटनेमागचे भयानक वास्तव समोर आले आहे.दरम्यान या प्रकरणी ताई चौकात खून झालेल्या तरुणावर पोक्सो अंतर्गत एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार १६ वर्षांच्या विधीसंघर्ष बालकावर त्याच्याच मित्राने काही दिवसांपूर्वी अत्याचार केला होता. ही लज्जास्पद बाब जेव्हा पीडित मुलाच्या इतर सहकारी मित्रांना समजली. तेव्हा मित्रांच्या मदतीने अत्याचार करणाऱ्याला गाठून त्याचा निर्घृण खून केला. सुरुवातीला पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तेव्हा खुनाचे कारण अस्पष्ट होते. दरम्यान, पीडित अल्पवयीन मुलाने आपल्यावर झालेल्या अत्याचाराची फिर्याद देत आपल्यावर अत्याचार करणारा दुसरा कोणी नसून ज्याचा खून झाला तोच आहे, असे सांगितले. त्यानंतर या प्रकरणात पीडित मुलगा अल्पवयीन असल्याने अत्याचार करणाऱ्या मृतावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक खोमणे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मनसेतर्फे अक्कलकोटमध्ये काढणार आक्रोश मोर्चा

**अक्कलकोट, दि. १ जून-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी नगरपालिकेवर गुरुवार दि. ४ जून रोजी सकाळी १० वाजता आक्रोश मोर्चा काढणार असल्याची माहिती मनसे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नगरपरिषद कंत्राटी सफाई कामगारांचे ४ महिन्याचे पगार त्वरित द्यावा, १५ महिने कंत्राटी सफाई कामगारांची पी एफ रक्कम ठेकेदाराने भरलेली नाही, ती त्वरित भरावी, शहरवासियांना दररोज पाणीपुरवठा झाला पाहिजे, शहरात रस्ते,गटार ड्रेनेजची कामे चांगली व्हावीत आदी मागण्यासाठी मल्लिकार्जुन मंदिरापासून नगरपालिकेपर्यंत हा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला शरणप्पा पाटील, आदर्श मळगी, अशोक जाधव, काशिनाथ मरतुरे, घमल्लिनाथ घंटे हे उपस्थित होते.

### हुलजंती येथून ट्रॅक्टरची चोरी; गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि.१ जून-**

हुलजंती येथे शेतातील घराजवळ ४ लाख रुपये किंमतीचा ट्रॅक्टर चोरट्यांनी नेला. या प्रकरणी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी शरणाप्पा शिवाप्पा कुंभारी (रा.हुलजंती) यांचा स्वराज कंपनीचा ७२४ मॉडेलचा ट्रॅक्टर नंबर एम.एच.१३ ई.एक्स. ३४६६ चार लाख रुपये किंमतीचा शेतातील घराजवळ दि.२७ मे रोजी संध्याकाळी उभा केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी फिर्यादीला सदरच्या ठिकाणी ट्रॅक्टर दिसून आला नाही. दरम्यान फिर्यादीच्या संमतीवाचून लबाडीने ट्रॅक्टर चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार प्रमोद मोरे हे करीत आहेत.

### जपान येथे होणाऱ्या कॉर्पोरेट क्लब संमेलनासाठी दीपक जगताप यांची निवड

**माढा, दि. १ जून-**



माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथील तसेच आयुर्विमा क्षेत्रात सोलापूर जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्वल करणारे एलआयसी ऑफ इंडियाचे विमा सल्लागार तथा कॉर्पोरेट क्लब सदस्य दिपक महादेव जगताप यांची जपानची राजधानी टोकियो येथे ३० मे ते ५ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कॉर्पोरेट क्लब संमेलनासाठी निवड झाली आहे. या अभ्यास दौऱ्यात विमा विषयक जपानी अत्याधुनिक तंत्रज्ञान याबरोबरच जगभरातील आयुर्विमा क्षेत्रातील संशोधन, आव्हाने आणि विमाधारकांना द्यावयाचा लाभ यावर मार्गदर्शन होणार आहे.

भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या देशातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या निवडक प्रतिनिधींमध्ये जगताप यांनी सातत्यपूर्ण विक्रमी यश, ग्राहकांप्रती प्रामाणिक सेवा, आधुनिक कार्यपद्धती आणि उत्कृष्ट व्यवसाय वाढ याच्या जोरावर हे मानाचे स्थान प्राप्त केले आहे. या अभ्यास दौऱ्याविषयी माहिती देताना जगताप यांनी सांगितले जपानमधील अत्याधुनिक विमा तंत्रज्ञान, ग्राहक सेवा पद्धती, डिजिटल व्यवस्थापन, व्यवसाय वृद्धीचे आधुनिक सूत्र तसेच जागतिक दर्जाच्या विमा संकल्पनांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. या अनुभवाचा उपयोग भविष्यात ग्रामीण व शहरी भागातील ग्राहकांना अधिक दर्जेदार, पारदर्शक आणि वेगवान सेवा देण्यासाठी होणार आहे.

### व्यवसायासाठी पाच लाख आण म्हणून विवाहितेचा छळ

**पती व सासू-सासऱ्यावर गुन्हा दाखल**

**सोलापूर, दि. १ जून-**



हुंडा व नवीन व्यवसायासाठी माहेरहुन पाच लाख रुपये आण म्हणून एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती सासू-सासऱ्याविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंदार - पती, सुरेखा - सासु, सुरेश - सासरे (रा. बी विंग फ्लॅट नं. ९०१, मोशी पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत आम्रपाली मंदार रानडे (रा.३०२, साई यशोदा हाईटस, विजापूर रोड, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ही दि. २४ जुलै २०२४ रोजी ते २१ जुलै २०२५ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपीनी हुंड्यासाठी तसेच नविन व्यवसायाकरीता माहेरहून ५ लाख रुपये घेवून ये म्हणून तिला शारीरिक व मानसिक त्रास देऊन जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . पोलीस हवालदार जाधव हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



### आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली महापालिकेला सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. १ जून-**

सोलापूर महापालिकेत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि महापौर विनायक कोंड्याल यांच्यात सोलापूर शहरतील सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.आज सोलापूर महानगरपालिकेत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सदिच्छा भेट दिली. महापौर विनायक कोंड्याल यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, नगरसेवक मनीष केत, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, किरण पवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. सोलापूर शहरतील सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.महापौर विनायक कोंड्याल विविध कामांची माहिती दिली.

# पश्चिम भागाच्या विकासाला चालना

## टेंभुर्णी-अकलूज एसटीचे उद्योगमंत्री सामंत यांच्या हस्ते उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १ जून-**

टेंभुर्णी-अकलूज (रांजणी, भिमानगर, आलेगाव बु., रुई, आलेगाव खुर्द, गार अकोले, बावडा मार्गे) या नव्या एसटी बससेवेचा आरंभ उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. माढा तालुक्याच्या पश्चिम भागातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे.



बससेवेच्या प्रारंभामुळे पश्चिम भागातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला आहे. उद्घाटनप्रसंगी शिवसेना पक्षाचे उपनेते राहुल शेवाळे, खासदार ज्योती वाघमारे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माढा लोकसभा संपर्कप्रमुख चंद्रहार पाटील आणि बससेवेसाठी पाठपुरावा करणारे शिवसेना नेते संजय कोकाटे उपस्थित होते.

पश्चिम भागातील नागरिकांचे शैक्षणिक, व्यावसायिक व दैनंदिन व्यवहार प्रामुख्याने अकलूज, टेंभुर्णी, पानीव आणि सराटी या भागांशी असतात. मात्र या परिसरात नियमित सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विद्यार्थी, महिला आणि वृद्धांना प्रवासासाठी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे या मार्गावर एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी होत होती.

लोकांच्या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोन महिन्यांपूर्वी विशेष बाब म्हणून ही बससेवा सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र रांजणी-भिमानगर ते गार अकोले या मार्गावरील रस्त्याचे काम सुरू असल्यानेती तातडीने सुरू होऊ शकली नव्हती. मात्र आता सुरु झाली.

यावेळी बोलताना संजय कोकाटे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत असून, त्यांच्यामुळेच ही महत्त्वाची मागणी पूर्ण झाल्याचे सांगितले.

बससेवेचे वेळापत्रक :
- सकाळी ९.०० वाजता - टेंभुर्णी ते अकलूज
- सकाळी ११.०० वाजता - अकलूज ते टेंभुर्णी
- दुपारी ४.०० वाजता - टेंभुर्णी ते अकलूज
- सायंकाळी ६.०० वाजता - अकलूज ते टेंभुर्णी

# जेईई ॲडव्हान्स्डमध्ये 'वालचंद'च्या विद्यार्थ्यांची भरारी

**आयआयटीच्या दिशेने दमदार झेप; सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून -**





देशातील सर्वाधिक आव्हानात्मक, स्पर्धात्मक आणि प्रतिष्ठेची मानली जाणारी जेईई ॲडव्हान्स्ड २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. वालचंद आर्ट्स ॲंड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचे अनिकेत खडके आणि रेवणेश सुतार यांनी यश मिळवत भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (आयआयटी) प्रवेश मिळवण्याचा मार्ग प्रशस्त केला आहे. त्यांच्या यशामुळे केवळ महाविद्यालयाचाच नव्हे, तर संपूर्ण सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव उंचावला आहे.

यशामुळे अनिकेत आणि रेवणेश हे सोलापूरच्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचे दीपस्तंभ ठरले आहेत. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून अत्यल्प विद्यार्थ्यांना यश लाभणाऱ्या या स्पर्धात्मक परीक्षेत त्यांनी मिळवलेले यश त्यांच्या अथक परिश्रम, स्वयंशिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे पाठबळ आणि शिक्षकांच्या दर्जेदार मार्गदर्शनाचे फलित आहे. यशाने वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेची, गुणवत्तापूर्ण अध्यापनाची आणि विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक दृष्टिकोनाची पुन्हा एकदा प्रभावी साक्ष दिली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या वालचंद शिक्षण समूहाने स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी निर्माण केलेले सक्षम शैक्षणिक वातावरण यशस्वी परिणामांच्या रूपाने दिसून येत आहे.

वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त इंजी. वैभव गांधी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, 'सोलापूरकर विद्यार्थ्यांमध्ये मेहनत, चिकाटी आणि ध्येयपूर्तीसाठी झटण्याची वृत्ती नैसर्गिकरित्या आहे. योग्य मार्गदर्शन, आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि सकारात्मक वातावरण उपलब्ध करून दिल्यास ते राष्ट्रीय स्तरावरही छाप उमटवतात. हीच भूमिका लक्षात घेऊन वालचंद शिक्षण समूह विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.'

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, भूषण शहा, पराग शहा यांच्यासह समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, समन्वयिका प्रा. सारिका महिंद्रकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

### माचणूर हद्दीत ट्रकमधील डिझेल चोरी

**मंगळवेढा, दि. १ जून-**

माचणूर हद्दीत सिमेंट घेवून कोल्हापूरकडे निघालेल्या ट्रकम धील १५० लिटर, १४ हजार ९३४ रुपये किंमतीचे डिझेल चोरुन नेण्यात आले. याप्रकरणी चोरटयाविरुध्द मंगळवेढा पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

ट्रक चालक नितीन रंदवे (रा.ब्रह्मपुरी) हा सोलापूरहून सिमेंट घेवून ३० मे रोजी पहाटे २ वाजता कोल्हापूरला निघाला होता. माचणूर हद्दीत ट्रक उभा केल्यानंतर चालकाने आपली दोन मुले ट्रकच्या केबीनवर संरक्षणासाठी झोपविली होती. या दरम्यान चारचाकी गाडी घेवून आलेल्या चोरटयांनी ट्रकच्या डिझेल टाकीमधील १५० लिटर १४ हजार ९३४ रुपये किंमतीचे डिझेल टाकीचे लॉक तोडून घेवून पोबारा केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मंगळवेढा पोलिस प्रकरणाचा तपास करत आहेत.

### सहा अल्पवयीन मुली पालकांकडे सुपुर्द

**पोलिस उपनिरीक्षक डॉ.आरती कणिरे यांची प्रशंसनीय कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १ जून-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागातून बेपत्ता झालेल्या सहा अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिस उपनिरीक्षक डॉ. आरती कणिरे यांना यश मिळाले आहे. मुलींना त्यांच्या आई वडिलाच्या ताब्यात दिले आहे. दोन व्यक्तींविरुध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

मंगळवेढा शहर व ग्रामीणमधून सहा अल्पवयीन मुली काही महिन्यापुर्वी उचेठाण, चोखामेळानगर, नागणेवाडी, साठेनगर, नंदूर या ठिकाणाहून बेपत्ता झाल्या होत्या. सदरचा तपास पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक डॉ.आरती कणिरे यांनी केला.

सदर मुलींचे मोबाईल लोकेशन व सीडीआर काढून सहा मुली विविध ठिकाणाहून मिळविण्यात आरती कणिरे यांना यश प्राप्त झाले आहे. दरम्यान



यामध्ये पांडुरंग सुनिल माने व चांद शेख यांच्याविरुध्द 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे तपासिक अंमलदार यांनी सांगितले.

डॉ.आरती कणिरे यांनी मंगळवेढ्याचा कार्यभार हाती घेतल्यापासून आत्तापर्यंत ३१ बेपत्ता मुली शोधून त्यांच्या पालकाच्या ताब्यात दिल्या आहेत.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवानिमित्त महिलांसाठी स्पर्धा

**एकता महिला मंचचा उपक्रम; मोफत दंत आरोग्य शिबिराचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १ जून-**

एकता महिला मंचच्या माध्यमातून मानेगाव (ता. बार्शी) येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जयंती महोत्सव, महिला मार्गदर्शन मेळावा, विविध स्पर्धा आदी उपक्रम पार पडले. उपक्रमांना महिलांचा उत्स्फुर्त प्रक्षतसाद मिळाला.



रविवार, दि. ३१ मे रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानेगाव येथे हा सोहळा अत्यंत थाटामाटात पार पडला. समर्थ डेंटल क्लिनिक (वैराग) यांच्या वतीने भव्य दंत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन केले होते. प्रारंभी मान्यवर आणि एकता महिला मंचच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन केल. मंचच्या पदाधिकाऱ्यांनी प्रमुख पाहुण्यांचा सन्मान केला.

वैराग पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रतापसिंह जाधव, समर्थ डेंटल क्लिनिकचे प्रमुख डॉ. शितल बोराडे, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, डॉ. गझल चौधरी, सुवर्णा आलाट, तसेच मंचच्या प्रमुख पदाधिकारी लक्ष्मी सुतार, आशा विभूते, रोहिणी डाके, रंजना गवळी, राणी गवळी, राजश्री बादगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. समर्थ डेंटल क्लिनिक (वैराग) यांच्या वतीने आयोजित मोफत दंत आरोग्य शिबिरामध्ये १०० महिला व मुलींनी लाभ घेतला. सर्व महिला व मुलींना मोफत टूथपेस्टचे वाटप केले.

महिलांसाठी आयोजित स्पर्धांमध्ये महिलांनी मोठा उत्साहाने भाग घेतला. विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. संगीत खुर्ची स्पर्धा: प्रथम- राणी गवळी, द्वितीय- अश्विनी डाके, तृतीय- मंगल डाके, उत्तेजनार्थ- रजनी घोंगडे. बिस्किट खाणे स्पर्धा: प्रथम- सुनिता जांभळे, द्वितीय- राजश्री बादगुडे. उखाणे स्पर्धा: प्रथम- आरती ताटे, द्वितीय- अश्विनी डाके, तृतीय- राजश्री बादगुडे असे निकाल लागले. कार्यक्रमादरम्यान रोहिणी डाके, रंजना गवळी आणि आशा विभूते यांनी महिलांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. समर्थ डेंटल क्लिनिकचे प्रमुख डॉ. शितल बोराडे यांनी दंत आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रभाकर क्षीरसागर यांनी आगामी काळातही सामाजिक हिताचे कार्यक्रम राबवण्याचे आयश्वासन दिले.

कार्यक्रमासाठी मानेगाव येथील एकता महिला मंचच्या प्रमुख रेणुका चौगुले, अश्विनी डाके, सुनिता जांभळे, संगीता डाके, रजनी घोंगडे, मेघा दिंडोरे, मनीषा कापसे, आविदा डाके, लोचना डाके, सविता डाके, सुरेखा डाके, अनिता डाके, मंगल डाके, इंदुमती मोरे, लक्ष्मी मोरे, रसिका डाके, संस्कृती डाके, वैष्णवी डाके, दुर्वा डाके, सृष्टी माळी आदी उपस्थित होत्या. प्रास्ताविक रजनी घोंगडे यांनी केले.

सूत्रसंचालन रोहिणी डाके यांनी तर आभार सुनिता जांभळे यांनी मानले.



### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाचा जागर करावा : महेश इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट. दि. १ जून-**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी १८ व्या शतकात स्त्री असूनही अतिशय कुशलतेने राज्यकारभार केला. काशी, गया, सोमनाथ, द्वारका, अयोध्या, ओंकारेश्वर यांसारख्या देशभरातील शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार, घाट, विहिरी, धर्मशाळा बांधून त्यांनी धर्माशी असलेली बांधिलकी जपली. सर्वांनी त्यांच्या कर्तृत्वाचा जागर करावा असे आवाहन श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

आज पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त स्विमींग ग्रुपच्या वतीने महेश इंगळे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रथमेश इंगळे, संतोष पराणे, कल्याणी गंगोडा, विद्याधर गुरव, रमेश शिंदे, श्रीकांत झिपरे, बाळासाहेब एकबोटे, बाबा सुरवसे, मनोज जगताप, ओमकार उटगे, विश्वनाथ देवरमनी, शिवशरण अचलेर, अशोक कलशेट्टी, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, सुनील पवार, ज्ञानेश्वर भोसले, कुमार हत्तुरे, रमेश कणमुसे, सचिन किरनळी, अमर पाटील, आदित्य गवंडी, तन्मय इचगे, समर्थ भोसले, अमोल महाडिक, तुषार मोरे, समर्थ स्वामी, सागर गोंडाळ, मनोज इंगोले, अमोल माने, शेखर आडवीतोटे आदीसह इंगळे मित्रपरिवार व स्विमिंग ग्रुप सदस्य उपस्थित होते.

# विद्यापीठाला स्वखर्चाने ६० रोपांची भेट

**वाढदिनी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जून-**

वाढदिवसाचा आनंद पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमातून साजरा करत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. यावेळी त्यांनी स्वखर्चातून सुमारे दहा फूट उंचीची ६० रोपे विद्यापीठाला भेट दिली.



कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डॉ. महानवर यांनी विद्यापीठ परिसर हरित आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी व्यापक वृक्षारोपण मोहीम हाती घेतली आहे. आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात तब्बल पाच लाख वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी संकल्पाच्या दिशेने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाबरोबरच सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि पर्यावरणप्रेमींच्या सहकार्याने आतापर्यंत सुमारे एक लाख ६८ हजार वृक्षांची लागवड केली आहे. त्यांचे संगोपन आणि संवर्धन विद्यापीठामार्फत नियमितपणे केले जात आहे.

पर्यावरण संवर्धनाबाबतची आपली बांधिलकी जपत डॉ. महानवर यांनी गेल्या वर्षीही वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणासाठी २५ हजार रुपयांची मदत विद्यापीठाला दिली होती. यंदाही त्यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त ६० मोठ्या आणि विकसित रोपांची भेट दिली. यामध्ये ५८ केशर आंबा, प्रत्येकी एक वड आणि पिंपळाचे रोपाचा समावेश आहे.

वृक्षारोपण कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्तेही वृक्षारोपण केले. कर्मचारी संघटनांच्या वतीने कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांना वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याच दिवशी वाढदिवस असलेल्या विद्यापीठातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही गौरव केला.

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी वाढदिवस, स्मृतिदिन, वर्धापनदिन यांसारखे वैयक्तिक आनंदाचे क्षण वृक्षारोपणासारख्या विधायक उपक्रमातून साजरे करण्याचे आवाहन केले.

## संक्षिप्त...

### ५ जून रोजी मोफत रक्त तपासणी शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : शहरातील नवजीवन वैद्यकीय सेवा प्रतिष्ठान लातूर लॅबोरेटरीच्या वतीने शुक्रवार दि. ५ जून रोजी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत सीबीसी, बीएसएस, टीएसएच आणि एचआयव्ही तपासणी मोफत करण्यात येणार आहे. याशिवाय रक्तदान करणाऱ्या दात्यांना हेल्मेट देण्यात येणार आहे.

### आनंदग्राम येथील अनाथाश्रमात अन्नदान सेवा



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १ जून : लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदग्राम, जि. बीड येथील अनाथाश्रमात अन्नदानाचा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमातून गरजू बालकांना भोजन दिले. रुपनारायण फर्टीलायझरचे संचालक तथा भाजप कार्यकर्ते उमेश सोमाणी यांचा सातत्याने

विविध उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचा नेहमीच पुढाकार असतो. लातूर ग्रामीणचे आ. रमेश कराड यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चास फाटा देत अन्नदानासारख्या विधायक कार्यातून सामाजिक जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने उमेश सोमानी यांनी अनाथाश्रमात अन्नदानाचा उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस साजरा केला.

# कवळी हिप्परग्यातील विकास कामांची आमदारांनी केली पाहणी

## शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान

तभा वृत्तसेवा

औसा दि. १ जुन : जलसमृद्ध औसा अभियान व एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत हिप्परगा व कवळी परिसरात सुरू असलेल्या नाला खोलीकरण, सरळीकरण व जलसंधारण कामांची आमदार अभिमन्यू पवार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कामांची सविस्तर माहिती घेतली तसेच परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर तत्काळ उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना त्यांनी सूचना दिल्या.

जलसमृद्ध औसा अभियानाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारणाची व्यापक चळवळ उभी करण्यात येत असून, हिप्परगा व कवळी येथे सुरू असलेल्या नाला खोलीकरण व सरळीकरण कामांमुळे पावसाचे पाणी अधिक प्रमाणात अडविणे आणि जमिनीत मुरविणे शक्य होणार आहे. परिणामी भूजल पातळीत वाढ होऊन परिसरातील बोअरवेल, विहिरी आणि अन्य जलस्रोतांना नवसंजीवनी मिळणार आहे. या कामांमुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढेल तसेच भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मोठी मदत होईल, असे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले.पाहणी दरम्यान आमदार अभिमन्यू पवार



यांनी सांगितले की, जलसमृद्ध औसा अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतकऱ्यांना शाश्वत जलस्रोत उपलब्ध करून देणे हा आहे. जलसंधारणाची कामे ही केवळ विकासकामे नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी आणि शेतीला स्थैर्य देणारी महत्त्वाची गुंतवणूक आहे. नाला खोलीकरण, सरळीकरण आणि जलसाठा निर्मितीमुळे परिसरातील शेती, पशुपालन आणि ग्रामविकासाला निश्र्चितच चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील औसा आणि तुळजापूर दोन तालुके सातत्याने अवर्षणग्रस्त परिस्थितीचा सामना करत आहेत. या पार्श्र्वभूमीवर आगामी काळात औसा तालुक्यातील ७३ अवर्षणग्रस्त गावांना जलसमृद्ध करण्याचा आपला मानस असल्याचे आमदार पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

जलसंधारणाच्या विविध उपक्रमांमुळे दुष्काळमुक्तीचा मार्ग अधिक सक्षम होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. क्रिएटिव्ह फाउंडेशन, टाटा मोटर्स फाउंडेशन, आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे जलसंधारण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून येत असून स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून या कामांचे स्वागत करण्यात येत आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून शाश्र्वत विकासाचा मार्ग निर्माण होत असल्याने या उपक्रमाबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले.

यावेळी शेतकऱ्यांनी आमदार अभिमन्यू पवार तसेच क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार यांचा सत्कार केला. जलसंधारणाच्या कामांबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार, हिप्परगा येथील सरपंच संतोष गोरे, माळकोडजीचे सरपंच जयशंकर विभुते, टाका येथील उपसरपंच अतुल शिंदे, सदाशिव जोगदंड, गणेश माळी, डॉ. देशमुख, विलास काटे यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि अभियानाशी संबंधित पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजीपाल्याचे दर वाढले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याच्या स्त्रोत मोठया प्रमाणात कमी झाल्याने भाजीपाला लागवडीचे क्षेत्रही घटले आहे. लातूरच्या रयतु बाजारात भाजीपाल्याची आयात मोठया प्रमाणात घटली आहे. त्यामुळे कोथींबर ६० ते ७० रूपये किलो प्रमाणे विक्री होत आहे. पालक १० ते १५ रूपये प्रमाणे पेंढी विक्री होत आहे. टोमॅटो ४० ते ६० रूपये प्रमाणे विक्री होत आहेत. शेपू २० रूपये पेंढी प्रमाणे विक्री होत आहे. भाजीपाल्याचे दर वाढल्याने नागरीकांच्या आर्थिक बजेटवर परिणाम होत आहे.

### डॉ. मनिषाताई होळकुंदे 'महाराष्ट्र भुषण' पुरस्काराने सन्मानित




तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि. १ जून : निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील एकता बहुउद्देशिय महिला मंडळ तथा आधार वृद्धाश्रमाच्या अध्यक्षा डॉ. मनिषाताई होळकुंदे यांना आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन नाशिक यांच्या वतीने 'महाराष्ट्र भूषण' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार फाउंडेशन चे अध्यक्ष गणेश विटकर आणि सचिव तेजस्विनी दिवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप सन्मानपत्र, मेडल, आणि मानचिन्ह देऊन येथोचित गौरव करण्यात आले.

डॉ. मनिषाताई होळकुंदे यांनी समाजातील विविध गरजूंना मदतीचा हात देत त्यांच्या जीवनातील अंधार दूर करण्यासाठी व त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी सदैव कार्य करत असतात. अनेक निराधार आजी आजोबांची जबाबदारी घेत वृद्धाश्रमाच्या माध्यमातून स्वतःच्या आई वडिलाप्रमाणे त्यांची सेवा त्या करतात. तर गोशाळेच्या माध्यमातून मुक्या प्राण्यांची सेवाही करत आहेत. या त्यांच्या सर्व कार्याची दखल घेऊन यापूर्वीही त्यांना इंग्लंड येथील संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तराचे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे तसेच समाजकार्यातील डॉक्टरेट पदवीही देण्यात आली असून आता या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आले आहे.

सदरील पुरस्कार वितरण सोहळा गुरुदक्षिणा सभागृह, कृषी नगर नाशिक या ठिकाणी संपन्न झाला या भव्य आणि दिव्य पुरस्कार सोहळ्यासाठी प्रसिद्ध उद्योजक अमोल गोटे भारतीय लष्करातील लष्कर प्रमुख कॅप्टन हडताळे, आणि विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेले मान्यवर यावेळी उपस्थित होते तसेच महाराष्ट्रासह परराज्यातील प्रशासकीय अधिकारी,मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी डॉ. मनिषाताई बोलताना म्हणाले की, मला मिळणाऱ्या प्रत्येक पुरस्काराने मला समाजकार्य करण्याची प्रेरणा व ऊर्जा मिळत असून माझ्या कार्याची दखल घेऊन विविध संस्थानी मला दिलेल्या पुरस्काराबद्दल मी आभारी असून या मिळत असलेल्या पुरस्काराबरोबर माझी जबाबदारीही वाढत आहे व सदैव मी या समाजकार्यात अशीच सेवा करत राहीन असे त्या म्हणाल्या.

## डॉ. अरविंद भातांब्रे यांचा नागरी सत्कार

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १ जून : तालुक्यातील उमरगा(हा) येथील जगदीश लोभे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर तातडीने उपचार करून त्यांचे प्राण वाचवणारे साई क्रिटिकेअर हॉस्पिटल, निलंगा चे संचालक डॉ. अरविंद भातांब्रे यांचा आज समस्त उमरगा ग्रामस्थ व लोभे परिवाराच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.



कोयत्याचे घाव वर्मी लागल्याने जखमी जगदीश लोभे रक्तबंबाळ अवस्थेत शेवटचा श्र्वास घेत होते. अशा अवस्थेत जखमी लोभे यांना निलंगा येथील डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या साई क्रिटिकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी डॉ अरविंद भातांब्रे यांनी त्यांच्यावर तातडीने प्राथमिक उपचार करून त्यांना स्वतः म्बुलन्स मध्ये उपचार देत लातूर येथे खाजगी रुग्णालयात दाखल केले. लातूर येथील तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने त्यांनी जखमी लोभेवर उपचार करून त्यांचा जीव वाचवला. मृत्यूशी झुंज देणाऱ्या जखमी लोभेवर उपचार करून त्यांना जीवदान दिल्याबद्दल डॉ अरविंद भातांब्रे यांचे ऋण फेडण्यासाठी आज समस्त उमरगा येथील गावकरी एकवटले आणि हनुमान मंदिराच्या साक्षीने कृतज्ञतेचा एक अनोखा सोहळा संपन्न झाला..

. हनुमान मंदिर, वाडी, उमरगा येथे हा भावपूर्ण सोहळा पार पडला. डॉ. भातांब्रे यांचे मंदिरात आगमन होताच ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी लोभे कुटुंबातील महिलांनी डॉ. भातांब्रे यांचे औक्षण करून त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना डॉ. भातांब्रे भावूक झाले. ते म्हणाले, मी माझे कर्तव्य केले. कोणताही डॉक्टर हीच तत्परता दाखवेल. पण उमरगा गावाने जे प्रेम दिले, ते मी कधीच विसरू शकणार नाही. हा सत्कार माझा नसून प्रत्येक डॉक्टरच्या सेवाभावाचा आहे.

या प्रसंगी डॉ. भातांब्रे यांनीही मोठ्या मनाचा परिचय देत सौ. लोभे ताई व श्री. जगदीश लोभे यांचा साडी-चोळी व शाल-श्रीफळ देऊन भर आहेराने सन्मान केला. संकटसमयी धीर न सोडणाऱ्या लोभे कुटुंबाचे कौतुक करून त्यांनी समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला. त्यांच्या या कृतीने उपस्थितांची मने जिंकली.

या वेळी लांबोटा जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी श्री. प्रमोदजी मरूरे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी श्री. परमेश्र्वर शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य श्री. महेशजी देशमुख, उपसरपंच श्री. चक्रधरजी शेळके, महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. महादेवजी आवाळे, सरपंच अमोलजी बिराजदार, चेअरमन आत्माराम लोभे, तंटामुक्त समिती अध्यक्ष श्री. माधवजी लोभे, श्री. पंडितजी रणखांब, श्री. रमेशजी लोभे,श्री. योगेश्जी मुळे,श्री.श्रीधरजी लोभे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला-पुरुष, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

'केस' न बघता 'माणूस' बघणाऱ्या डॉक्टरांच्या सन्मानासाठी संपूर्ण मंदिर परिसर गजबजला होता. सत्कार सोहळ्याने समाजात डॉक्टरांप्रती असलेला विश्र्वास व माणुसकीचा संदेश अधिक दृढ झाला

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : वंचित बहुजन आघाडी लातूर जिल्हा व युवक जिल्हा आघाडीच्या वतीने पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा सचिव प्रा. प्रशांत उघाडे यांनी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. प्रसंगी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नितीन गायकवाड, प्रा. कल्याण कांबळे, जिल्हा प्रवक्ते प्रा. चक्षुपाल कांबळे, बाबुराव गायकवाड, राजेंद्र सोनकांबळे, संतोष धायगुडे, भास्कर मस्के, बळीभाऊ सोनवणे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदगीरसाठी ४०० कोटींच्या ४ - लेन रिंग रोड ला मंजुरी

## माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नांना यश

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १ जून : उदगीर शहराच्या वाहतूक व्यवस्थेला गती देणारा आणि शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असून उदगीरसाठी सुमारे ४०० कोटी रुपये खर्चाच्या ४-लेन रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असल्याने उदगीर शहर व परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

उदगीर शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात अवजड व हलक्या वाहनांची वाहतूक होत असते. शहरातील वाढती लोकसंख्या, व्यापारी उलाढाल आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत होता. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि नागरिकांना होणारा त्रास यामध्ये वाढ झाली होती. ही समस्या लक्षात घेऊन आमदार संजय बनसोडे यांनी मागील अनेक वर्षापासुन शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून उदगीरसाठी स्वतंत्र ४-लेन रिंगरोडची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश मिळाले आहे.



मंजूर झालेल्या या रिंगरोडमुळे शहराबाहेरील वाहतूक शहरात न येता थेट आपल्या मार्गाने पुढे जाऊ शकेल. यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून प्रवास अधिक सुरक्षित आणि जलद होणार आहे. तसेच औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी विकासाला चालना मिळून उदगीर शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पामुळे शहराच्या विविध भागांना अधिक चांगली जोडणी मिळणार असून भविष्यातील वाहतूकीची गरज लक्षात घेऊन सदर रिंगरोड उदगीरच्या विकासाचा नवा अध्याय ठरेल, असा विश्र्वास व्यक्त केला जात आहे.

रिंग रोडच्या दोन्ही बाजूंना भविष्यात व्यावसायिक संकुले, औद्योगिक प्रकल्प आणि विविध विकासकामांना गती मिळण्याची शक्यता आहे.

उदगीर शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी रिंगरोड अत्यंत आवश्यक होता. नागरिकांची मागणी आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. शासनाने या मागणीची दखल घेत ४०० कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास मंजुरी दिली असून यामुळे उदगीरच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

या निर्णयाबद्दल उदगीर व परिसरातील नागरिक, व्यापारी, वाहनधारक आणि विविध सामाजिक संघटनांनी समाधान व्यक्त करत आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नांचे स्वागत केले आहे. शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने हा निर्णय ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

सदर रिंगरोड मंजुर केल्याने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, उदगीरचे सुपुत्र अमोल पाटील कौळखेडकर यांचे आ.संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

### पावसाळ्यापूर्वीच वसुंधरा प्रतिष्ठानची पर्यावरण जनजागृती मोहीम । 'एक व्यक्ती-एक झाड'चा प्रभावी संदेश

# उन्हाळ्यात वाहनांसाठी जागा शोधली, आता पावसाळ्यात झाडांसाठी जागा शोधा !

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ जून : वाढते तापमान, घटणारी हरित संपदा आणि बदलते पर्यावरणीय संतुलन याबाबत समाजात जागृती निर्माण करण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर यांनी पावसाळ्यापूर्वीच व्यापक जनजागृती मोहीम सुरू केली आहे. 'उन्हाळ्यात गाडी लावण्यासाठी जागा शोधत होतात ना? मग आता पावसाळ्यात झाडे लावण्यासाठी जागा शोधा' असा थेट आणि विचार करायला लावणारा संदेश असलेले आकर्षक फलक शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी लावण्यात आले आहेत.

या फलकांद्वारे 'एक व्यक्ती-एक झाड' ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली असून वृक्षलागवड आणि संगोपन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.



वड, कडुलिंब, गुलमोहर, बहावा, जांभूळ, आंबा, पारिजात व आवळा यांसारख्या पर्यावरणपूरक वृक्षांची माहिती देत त्यांचे सामाजिक, पर्यावरणीय व आरोग्यदायी महत्त्वही जनतेसमोर मांडण्यात आले आहे. वाढते प्रदूषण, भूजल पातळीतील घट, उष्णतेच्या लाटा आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्र्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, हा संदेश प्रतिष्ठानच्या या मोहिमेवून दिला जात आहे.

विशेष म्हणजे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच वृक्षलागवडीसाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून येत आ हे. वसुंधरा प्रतिष्ठानने उभारलेल्या या जनजागृती फलकांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चा सुरू झाली असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवी दिशा मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे, अशी माहिती या प्रतिष्ठानचे प्रा. योगेश शर्मा यांनी दिली.